निबंध
१६२५

# वादे वादे...

REFBK-0012291

श्री. के क्षीरसागर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत.
अनुक्रम ३४२८९ वि: निबंध
क्रमांक १२२५९ नों दि: २५।७।६३

निबंध
2
३४२८९
25/7/63

१२२५९

अनुक्रम 38229 वि: निबंध
क्रमांक 9820 नों दि: 24/7

# वाटे वाटे....

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 92229

श्रीकृष्ण के. क्षीरसागर

ल घु नि बं ध आ णि ल लि त नि बं ध

REFBK-0012291

सुविचार प्रकाशन मंडळ

प्रथमावृत्ति १९६२

सर्व हक्क सुरक्षित

मूल्य पांच रुपये

प्रकाशक

श्यामकान्त बनहट्टी

सुविचार प्रकाशन मंडळ

धनतोली, नागपूर १

४६१/४, सदाशिव पुणें २

मुद्रक

चिं. स. लाटकर

कल्पना मुद्रणालय

४६१।४ सदाशिव पुणें २

तीस वर्षांपूर्वीच्या मित्रमंडळाला
प्रेममय स्मृतींसह समर्पण

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. ये तो हमारा हय | १ |
| २. "वादे वादे –" | ७ |
| ३. सुखाचा शोध | १३ |
| ४. आकर्षक व्यक्तिमत्त्व | १७ |
| ५. कांहीं चोरवाटा | २८ |
| ६. माझी मैत्रीण, माझा मित्र | ३२ |
| ७. बोलण्याची कला आणि ऐकण्याची कला | ३७ |
| ८. कंटाळा | ४९ |
| ९. श्यामवर्ण | ६३ |
| १०. साहित्यिकांची जात | ६९ |
| ११. लक्ष्मण आणि सीता | ७६ |
| १२. पडद्याची महती | ८० |
| १३. गप्प बसायला काय घ्याल ? | ९१ |
| १४. निधर्मी कुंकू | १०५ |
| १५. एक नूतन विलास | ११४ |
| १६. परनिंदेची लज्जत | १२० |

# प्रास्ताविक

या संग्रहांत अन्तर्भूत झालेला जुन्यांत जुना ललित निबंध, मासिक मनोरंजनांत १९२७ मध्ये प्रसिद्ध झाला होता. तो निबंध, 'गप्प बसायला काय घ्याल ?' हा होय. मनोरंजनच्या संपादकांनी त्याला 'विनोदी लेख' या सदरांत घातलें होतें. परंतु ई. व्ही. ल्यूकास् या प्रसिद्ध निबंधलेखकाचे कांही निबंध त्या काळीं माझ्या डोळ्यापुढे असल्याने, मी मात्र या निबंधाला ललित निबंधच म्हणत असे. मी तो निबंध लिहिला, तेव्हा मी सातत्याने लिहीत राहीन असें मला वाटलें नव्हतें. त्यानंतर १९३१ च्या सुमाराला मी कांही आन्तरिक, तर कांही बाह्य, कारणांनी सातत्याने लिहावयाचें ठरविलें. मुंबई येथे, श्री. त्र्यंबक शंकर शेजवलकर यांच्या संपादकत्वाखाली निघूं लागलेल्या 'प्रगति' या नमुनेदार साप्ताहिकाकरिता मी लिहावें, असा लकडा कै. माधवराव पटवर्धनांचे— व

नंतर माझेहि–स्नेही श्री. गं. दे. खानोलेकर यांनी आरंभापासूनच लावला होता. ' प्रगति ' करिता लिहिलेल्या ललित निबंधांपैकी पहिला निबंध ' ये तो हमारा है ! ' हा होय. अर्थात् या संग्रहांतील जुन्यांत जुना निबंध १९२७ मधील आहे, तर नव्यांत नवे निबंध १९६२ मधील आहेत. ' निधर्मी कुंकू ' आणि ' पडद्याची महती ' हे निबंध १९६२ मधील आहेत.

ललित निबंधांना इंग्रजींत ' व्यक्तिगत निबंध ' हेंहि एक नांव आहे, हें लक्षांत घेतां, ' जितके लेखक, तितके लघुनिबंधांचे प्रकार ' हें सूत्र इंग्रजी वाङ्मयांत कां रूढ झालें असेल, याची सहज कल्पना होईल. खाजगी बैठकींत केलेल्या ' गुजगोष्टीं ' सारखें किंवा खेळकर चर्चेसारखें या लेखनप्रकाराचें स्वरूप असतें. या दृष्टीनेच मला हा संग्रह प्रसिद्ध करतांना तीस वर्षांपूर्वीच्या माझ्या मित्रमंडळाचें कृतज्ञतापूर्वक स्मरण झालें. नंतर पडलेल्या दुःखाच्या छायेमुळें तर, ती कृतज्ञता अधिकच गाढ झाली असल्यास नवल नाही. कारण माधवराव पटवर्धनांसारखे त्यांतले ज्येष्ठ मित्र — व एकदोन कनिष्ठ स्त्री–पुरुषहि––आज हा लोक सोडून गेलेले आहेत. श्री. गोपीनाथ तळवळकर व श्री. भय्यासाहेब उमराणी यांच्यासारखे त्या वेळचे स्नेही आजहि माझ्या नित्याच्या बैठकींतील मित्र आहेत. जीवनांत मला आजतागायत नवेनवे मित्र लाभले असले, तरी मित्र बदलण्याचा प्रसंग मजवर जन्मांत क्वचितच आलेला आहे !

ललित निबंध हा वाङ्मयप्रकार स्वैर असला, तरी ( गाण्याच्या परिभाषेंत सांगायचें झालें तर ) त्याचा म्हणून एक ' थाट ' आहे. त्याच्या स्वैरतेंतहि एक संगति असावी लागते. आज लघुनिबंध आणि लघुकथा त्यांची पुष्कळच गल्लत झालेली आढळते. व या दृष्टीने अनौपचारिकता आणि स्वैरता यांचें या लेखनप्रकारांतील स्थान मान्य करूनहि, या

प्रकाराच्या म्हणून कांही मर्यादा आहेत याची आठवण करून द्यावी लागते. एखाद्या महत्त्वाच्या विचाराशीं, दृष्टिकोणाशीं, बौद्धिक खेळ करणें, हें जरी या प्रकाराचें सामान्य स्वरूप असलें, तरी खेळणाराच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार, हें त्याचें अंगच अधिक महत्त्वाचें म्हणावें लागेल. लेखकाचें व्यक्तिमत्त्व जितकें बहुढंगी आणि आकर्षक, तितके त्याचे स्वैर निबंध वाचनीय होणार हें उघडच आहे. केवळ लघाळ सलगीची भाषा, आणि रूढ समजूत उलटी करून दाखविणें, एवढ्यावर लघुनिबंध सजविला, तर तो उथळ होतो. लघुनिबंधासंबंधीं अधिक विचार मी अन्य लेखकांच्या संग्रहांना लिहिलेल्या प्रस्तावनांत केला आहे.

तथापि आविष्कृत करण्यासारखें सम्पन्न व्यक्तिमत्त्व लेखकाजवळ असलें, तरीहि त्या आविष्काराला नेहमीच खेळाचें अथवा क्रीडेचें स्वरूप येईल असें नाही. पण ज्या प्रमाणांत त्या आविष्काराला विचार–क्रीडेचें स्वरूप येईल, त्या प्रमाणांत तें लेखन ललित निबंध अथवा लघु-निबंध या नांवाला पात्र होईल हें उघड आहे.

या संग्रहांतील कांही निबंधांसंबंधीं, या दृष्टीने थोडी कैफियत देण्याची जरूरी भासते. ‘साहित्यिकांची जात’ हा निबंध आजच्या जमान्यांत खुशाल लघुकथा म्हणून वावरूं शकेल. आणखी एक माझ्या दृष्टीने असलेला लघुनिबंध (‘आंतली गाठ’) मी माझ्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ‘सेतुपार्वती’ या कथासंग्रहांत अन्तर्भूत केला, तो यामुळेच. ‘कंटाळा’ या निबंधांत आत्माविष्कारापेक्षा आजच्या समाजाच्या मनो-रचनेचा आविष्कारच अधिक झाला आहे. अर्थात् त्यांत विचारांचा खेळ आहेच. तेंच वळण ‘आकर्षक व्यक्तिमत्त्व’ या निबंधाला लागलें आहेसें वाटतें. पण स्वैर आत्माविष्कार—“ A loose sally of the mind ” मध्ये हें सर्व सामावून जाईल, अशी आशा आहे. अशा स्वैर आत्मा-

विष्काराच्या आणि बौद्धिक विश्लेषणाच्या आकलनाबद्दल मला फारशी चिंता नाही. कारण आजच्या जमान्याला तें खाद्य परिचयांतलें आहे. परन्तु 'पड्याची महती' या निबंधांत मी एका जुन्या सामाजिक रूढीचा विचार प्रथम सौंदर्यशास्त्राच्या व नंतर गूढवादाच्या किनाऱ्या किनाऱ्याने केला आहे. यंदाच्या 'सुगंध'च्या अंकांत हा लेख प्रसिद्ध झाला, तेव्हा त्यांत केवळ जुन्या पड्याच्या चालीचा पुरस्कार आहे, एवढाच बोध एका परीक्षणलेखकाला झाला! ज्यांची दृष्टि इतकी ढोबळ आहे, त्यांच्याकरिता 'ललित निबंध' हा प्रकार नाही, एवढेंच येथे सांगितलें तरी पुरें आहे.

आज सर्वच निबंधलेखन मनमोकळ्या संभाषणासारखें रूप घेत आहे, ही गोष्ट लक्षांत घेणें जरूर आहे. आणि त्यामुळे जुना तत्त्वप्रतिपादनरूप निबंध आता नियतकालिक वाङ्मयांत तरी–अग्रलेखाखेरीज–क्वचितच भेटेल. या दृष्टीने ललित-निबंधाची छाया सर्वच निबंधवाङ्मयावर पडली आहे असें म्हणतां येईल.

पण लघुकथा व लघुनिबंध यांची—कांहीं लेखक आज करीत आहेत ती—गल्लत करण्याला मात्र कोणतेंच समर्थन नाही !

या संग्रहांतील व्यक्तिगत अनौपचारिक लेखन वाचकरूपी मोठ्या मित्र मंडळाला प्रिय होईल अशी आशा आहे.

हें निबंध, पुस्तकरुपाने प्रकाशांत आणण्याचें श्रेय अर्थात् 'सुविचार प्रकाशन मंडळा'ला आहे.

तुकाराम आश्रम
टिळकरोड पुणें २
१६–११–६२

श्रीकृष्ण के. क्षीरसागर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९२२२१
शाखा (स्थळ प्रत)

१

# ये तो हमारा हय् !

सुमारे चारपांच वर्षांपूर्वीची गोष्ट. मी सातारा येथील एका मुसलमान फोटोग्राफरकडे काढलेला एक फोटो तयार आहे कीं नाही, हें पाहण्याकरिता गेलों होतों. फोटो तयार नव्हताच. फोटोग्राफर साधारण कल्पना येण्याकरिता कच्ची प्रत दाखविण्याची धांदल करीत होता. मलाहि फोटो पाहण्याखेरीज कशाचीच घाई नव्हती. मी हातांत असलेलें कवितांचें पुस्तक उघडून बसलों. फोटोग्राफर आपल्या कामांत गुंतलेला व एवढ्या मोठ्या स्टूडिओंत दुसऱ्या कशाचाच व्यत्यय नाही, यामुळे आधीच ज्यांनी वेड लाविलें होतें अशा गज्जलांचे सूर मला न कळत माझ्या कंठांतून बाहेर पडूं लागले. शब्द उमटत नव्हते; पण सूर मात्र दुरूनहि ऐकण्याइतके मोठ्याने निघूं लागले.

फोटोग्राफर नांवानेच नव्हे, तर वृत्तीनेंहि ' आर्टिस्ट '--कलावन्त--

होता. त्याने ओळखीचा स्वर ऐकून चारा विसरणाऱ्या जनावराप्रमाणे कान टवकारले. त्याचें लक्ष हातांतील 'कॉपी'वरून उडालें.

"पुस्तक कसला आहे, साहेब?" प्रश्न मला प्रिय होता तरी उत्तर काय द्यावें याविषयी मात्र मी बुचकळ्यांत पडलों. मला वाटतें, कोणताहि वाचनव्यसनी मनुष्य आपल्या आवडत्या ग्रंथकाराविषयी प्रश्न ऐकण्यास उत्सुक असतो, तितकी नववधूहि आपल्या पतीविषयी प्रश्न ऐकण्यास उत्सुक नसेल. पण माझ्या हातांतील पुस्तकाच्या नांवावरून अगर कवीच्या नांवावरून एखाद्या आधुनिक वाङ्मयाच्या भोक्त्यासदेखील कांहीच बोध झाला नसता. मग या अर्धशिक्षित मुसलमानास काय होणार?

"पुस्तक होय? हें आमच्यांतील एक नवीन कवि..."

परंतु माझें उत्तर पूर्ण होण्याची वाट न पाहतां हातांतील काचेवर अंगांतील शर्टने घासपूस करीत तो समलेवाला 'आर्टिस्ट' माझ्या खुर्चीपर्यंत येऊन हातांतील पुस्तकांत डोकावूं लागला. पाहतां पाहतां त्याने हातांतील काच शेजारच्या मेजावर ठेवलीहि. व विचारपूस न करतां, जणूं फळीवरील पुस्तक उचलल्याप्रमाणे माझ्या हातांतील पुस्तक घेतलें. आणि गाण्यापेक्षा भावनेनेच अधिक खुललेल्या, नैसर्गिक तालबद्ध आवाजांत तो वाचूं लागला—

"बुझावूं मी ...... किती तूं तें
करावी मीं कशी हांजी.
...... कितीदा मंत्र उच्चारूं
तुझा मी तूहि हो माझी"

बटन दाबल्यानंतरचा विजेचा दिवा व आधीची नुसती काच यांत जेवढें अंतर, तेवढें त्याच्या आताच्या चर्येंत व आधीच्या चर्येंत पडलें होतें. पुस्तक बाजूला करून तो म्हणाला,

" मास्टरसाब, ये तो सब हमारा हय ! "

मला त्याचा आशय कळेना. मी त्यास फारशीविशारद कवि मराठींतील नवीन काव्य-प्रकार, वगैरेविषयी सांगूं लागलों. तो माझ्याकडे पहात होता. परंतु माझे शब्द त्याच्या कानांत शिरत होतेसे दिसलें नाही. तो आपला पुनः पुन्हा त्यांतील ओळी वाची व मादक पदार्थांची नशा चढल्याप्रमाणे, धुंद चेहरा करून म्हणे,—" ये तो हमारा हय ! "

पुण्यासारख्या ठिकाणीं कवीसमोर त्याच्याविषयी असे उद्गार निघते, तर गैरसमज होऊन खास खडाजंगी माजली असती व एखाद्या वृत्तपत्राचे रकाने कित्येक आठवडे अडवले गेले असते ! परंतु कवीविषयी अभिमान असला, तरी मी स्वतः कवि नव्हतों; व संभाषण साताऱ्या-सारख्या सौम्य शहराच्या एका शांत भागांत चाललें होतें. मी कुतूहलायुक्त निषेध करून म्हटलें,

" काय हो, हें तुमचं आहे म्हणतां, म्हणजे काय ? "

" मास्टरसाब, तुमच्या संस्कृतांतहि काव्य आहे. मराठींतहि असेल. फिर—ये तो हमारा हय ! "

अशा विषयावर बोलण्याइतपत प्रौढ मराठीची कमाई त्याच्याजवळ नव्हतीसें दिसलें. तो मधून मधून इंग्रजी शब्द वापरीत होता व इतक्यांतूनहि पडेल ती वाण हातवाऱ्यांनी व उर्दू शब्दांनी भरून काढीत होता. एकंदर अट्टाहासामुळे ऐकणाऱ्याच्या मनांत प्रतीतीपेक्षा सहानुभूतीच अधिक उत्पन्न होत होती.

आभाळ आल्यामुळे काचेच्या कौलांतून अंधुक दिसणाऱ्या प्रकाशाकडे हात करून तो म्हणाला, " तुमच्यांत काव्य असेल, साब ! —पण तुमचा काव्य, ये लाईट जसा डिम् हाय की नाही, तसा डिम्

—शांत—अंधुक असतो पहा. पण हें—" पुस्तक उघडून त्यांतील विवक्षित ओळींवर आपले लांब सडक कलाकुशल बोट ठेवून तो म्हणाला,

"ये जो मी अगर तूच्या निकरावर येऊन बोलायचा है—ये तो सब हमारा हय!"

तो फिरून वाचूं लागला.—

"फुलांचे गुच्छ हे नामी
बसू ये गे सुखारामीं
वसंतीं जीविताच्या मी
तशी तूं सोड नाराजी"—

बस! बिलकूल हमारा हय!"

तो मधून मधून उर्दू कवींच्या नादमधुर ओळी म्हणून दाखवी व त्यांचा गूढ सुफी अद्वैतपर अर्थ आपल्या घेडगुजरी भाषेंत स्पष्ट करून सांगे. त्या अस्सल काव्यभक्ताचे काव्यविषयीचे विचारहि वर्तमानपत्री काव्यचर्चेपेक्षा मला किती तरी जिवन्त वाटले. सर्वांत त्याने कविहृदयाला दिलेला फोटोच्या काचेचा दृष्टान्त मी कधीच विसरणार नाही. अखेर त्याच्या काव्यचर्चेवरून मला कळून आलें की, "ये तो हमारा हय्" मध्ये अनुकरणाच्या अथवा चौर्याचा संबंध नसून, त्या तीन शब्दांनी तो मुसलमान रसिक माझ्या आडवत्या कवीला जास्तींत जास्त पदवीला नेऊन बसवीत होता. त्याच्या मतें प्रेमगीतांतील हें उत्कटत्व व मनोविकाराचा अनिरुद्ध उमाळा केवळ फारसी व उर्दू काव्यांतच सापडणार व यांत कवीला अगर काव्यभक्ताला कमीपणा आणणारें कांहीच नव्हतें. सारांश, 'ये तो हमारा हय' हा त्याचा मोठ्यांत मोठा "कॉम्प्लिमेंट" होता.

केवळ पुस्तकी काव्यचर्चेत मी त्यास कधीच हार गेलों नसतों. तरी

त्याच्या त्या घेडगुजरी चर्चेने मला क्षणमात्र गुंग केलें, हें नाकबूल करतां येणार नाही. इतकेंच काय त्याच्या बेहोष वृत्तीचा. व साध्याच परंतु विचित्र प्रशंसोद्गारांचा विद्वत्ता-प्रचुर कोरड्या स्तुतीहून शतपट चिरस्थायी परिणाम माझ्या मनावर झाला व परवा अशाच एका प्रसंगीं त्या मुसलमान रसिकाचें शब्द न कळत माझ्या तोंडून निघाले व म्हणूनच त्या प्रसंगाची मला फिरून आठवण झाली. सामान्य स्तुतीचे शब्द कित्येक प्रसंगीं शुष्क, इतकेंच काय पण परकेपणाचे वाटूं लागतात. जेथे लेखक, मलाहि स्पष्ट उमगत नाही असें हृदयांत खोल दडलेलें रहस्य जणूं तळहातावर घेऊन मला दाखवितो, तेथे परक्यासारखी औपचारिक स्तुति कशी सुचावी ? सामान्य स्तुतीची अशा वेळीं वाचाच बसते व म्हणूनच या रसिकाचे अमळ विलक्षण शब्द ऐन वेळीं माझ्या मदतीला आले.

त्या दिवशीं मी एका प्रसिद्ध फ्रेंच लेखकाचें आत्मनिवेदन वाचीत होतों —

" एखादा मनुष्य अश्रुबिंदूंची कारणमीमांसा करूं लागेल तर मात्र जमणार नाही. किती तरी एकाच वेळीं उद्भवणाऱ्या पण परस्पर विरोधी विचारांचें व विकारांचें तें काव्यमय सार असतें ! अश्रू म्हणजे शेकडों वनस्पती एकत्र पिळून तयार केलेल्या पौरस्त्य देशांतील सुवासिक रसायनाचा एक थेंबच होय. कधी कधी तर अश्रुबिन्दु म्हणजे निव्वळ, मनोराज्याचा पेला काठोकाठ भरल्यावर बाहेर सांडणारा हृदयाचा पूरच असतो. मनुष्याला जें जें म्हणून दाखवावयाचें असतें अथवा जें स्वतःशींहि उच्चारणें शक्य नसतें — अस्पष्ट इच्छा, गूढ व्यथा, गिळलेलीं दुःखें, दडपून टाकलेली खळखळ, निःशब्द खेद, माणसाच्या भ्रामक शंका, अतृप्त मनोरथ, लाडक्या ध्येयावर पडलेले घाव, हृदयाच्या

गाभाऱ्यांत संथपणें साचणाऱ्या व नंतर वळचणीच्या पाण्याप्रमाणे हळूहळू ठिबकणाऱ्या शेकडों सूक्ष्म अंतर्वेदना ... मानवी अंतःसृष्टींतील एकूण एक गुप्त व्यापार एका क्षणिक दुःखोद्रेकांत विलय पावतात व तें दुःख अश्रुबिंदूचें रूप धारण करून डोळ्याच्या एका कोपऱ्यांत दृग्गोचर होतें!"

लेखकाचे आत्मनिवेदन अद्याप संपलें नव्हतें. मी मात्र पुस्तक मिटलें. लेखक व वाचक यांमधील देशकालाचें अंतर क्षणांत तुटलें. मी म्हणालों, "हें दूरदेशाच्या लेखकाचें आत्मनिवेदन कसलें ? —

**ये तो बिलकुल हमारा हय् !"**

२

# “ वादे वादे--”

नित्याप्रमाणे मी त्या दिवशीं माझ्या एका स्नेह्याकडे गप्पा मारण्याकरिता गेलों होतों. नुसतें स्नेह्याकडे म्हणण्याऐवजी ‘ कविमित्रा ’ कडे असेंच म्हटलें असतें, पण तसें सांगून टाकल्यास पुढील संभाषणाविषयीचें वाचकांचें कुतूहल बरेंच कमी होईल म्हणून मुद्दाम मोघम ठेवलें. तरी वाङ्मयजीवी मनुष्य असो कीं कोणीहि असो, अल्प परिचयावरून कोणाच्याहि विचाराविषयी अगर भाषणाविषयी बरोबर तर्क आगाऊ करतां येणार नाही. मनुष्याचे एरव्हींचे बोलण्याचे विषय आणि ‘खुषींत’ आल्यावरचे बोलण्याचे विषय यांत महदंतर असतें. पण खुषींत आल्यावर कोण कशावर बोलतो हा एक वेगळाच विषय होईल. तूर्त माझ्या खासगी अनुभवांतील म्हणून एक दोनच गोष्टींचा उल्लेख करतों. विवाहित तरुणी खुषींत आल्यास गोड गाऱ्हाण्याच्या स्वरांत ‘ तिकड ’च्या

कांही विचित्र तऱ्हा सांगेल; अविवाहित मुलगी लाडांत येईल, तर “ मला मुळीं लग्नच करायचं नाही ” असें ठिसूळ निश्चयी स्वरांत निक्षून सांगेल; आणि आजन्म अविवाहित राहण्याची प्रतिज्ञा केलेला तरुण कवि लाडांत आल्यास, सुनीताविषयी ?—भावगीताविषयी ?— छेः ! म्हणूनच म्हणतों तुम्हाला कल्पना नाही !— असा तरुण भीष्म लाडांत येतो तेव्हा आपल्या भावी पत्नीविषयी बोलतो !

आणि त्या दिवशीं आमचा तोच विषय चालला होता.

“ वास्तविक तुम्हाला ठाऊक आहेच माझी प्रतिज्ञा; तथापि तशी प्रतिज्ञा नसती तर मला......” अशी माझ्या मित्राने सुरुवात केली होती. आता, अशी प्रतिज्ञा असून पत्नीविषयी बोलणें निघावें आणि त्यास रंगहि यावा हें एक नवलच होतें. पण नवल कसलें ? तुमच्या ओळखीच्या मंडळींत असे कित्येक लोक असतील की ज्यांस पत्नी-समक्ष, कुठल्या तरी कुडबुड्या जोश्याने वर्तविलेल्या बहुभार्यायोगाचा विषय काढण्यांत मौज वाटते, तर कित्येक ‘ अति ’—आधुनिकांस क्रमप्राप्त पत्नीसमोर आपल्या माजी प्रियांसंबंधी बोलल्याशिवाय चैन पडत नाही. माझा मित्र प्रतिज्ञारूपी प्रथम पत्नीचा याहून तर अनादर करीत नव्हता ना ? शिवाय मी प्रथम सांगितल्याप्रमाणे मनुष्य खुषींत आल्यावर कित्येकदा टाकलेल्या विषयांकडे वळतो. खुषींत येतांच माझे कविमित्रहि लाडक्या प्रतिज्ञेवर आपखुषीने पडदा टाकून भावी अथवा ‘ संभावी ’ पत्नीविषयी बोलण्यास प्रारंभ करीत !

“ खरोखर तुम्हाला सांगतों, जर मला लग्न करायचेंच असतें तर मी रूप, पैसा वगैरेकडे विशेष न बघतां उत्कृष्ट हस्तक्षराची, बिनचूक व जलद बालबोध लिहूं शकणारी मुलगी पसंत केली असती. ”

आमच्या भेटीच्या प्रसंगाचे उघड उघड दोन वर्ग करणें शक्य

आहे. कांही भेटी केवळ अद्वैतपर असतात, तर कांही निव्वळ द्वैतपर असतात. अद्वैतपर बैठक केव्हा संपली हें आमचें आम्हासच समजत नाही; तर द्वैतपर भेटी ' केव्हा संपतात ' असें आमच्या शेजाऱ्या-पाजाऱ्यासहि होऊन जातें. त्या दिवशींची भेट दुसऱ्या वर्गांत पडली असती.

माझ्या स्नेह्याचे शब्द ऐकतांच मी एकदम तोंड देण्याच्या तयारीने सावरून बसलों.

" कां ? बायकोचा आणि हस्ताक्षराचा हो काय संबंध ? "

माझे स्नेही अजूनहि आपल्या खुषीच्या तंद्रींतच होते. व त्यामुळे प्रतिपक्षाने सामन्याची तयारी चालविल्याचें त्याच्या ध्यानांत आलें नाही.

" बस् ! आपण सांगावें आणि तिने लिहावें ! अहो, आमचे कम्पॉझिटर तर दुवा देतील पहा, खरोखरीच असें जुळून आल्यास ! " पहिल्याहून लाडांत येऊन माझे स्नेही म्हणाले.

" अहो, पण हस्ताक्षरासारख्या उपांगाला तुम्ही एवढें महत्त्व देतां आणि परस्परांच्या अभिरुचींची अथवा सलगीची कांहीच रूपरेषा सांगत नाही तोंपर्यंत तुम्हाला तिचा टाइपरायटरप्रमाणे – टायपिस्टसारखा देखील नव्हे – उपयोग करून घ्यायचा आहे असें कां म्हणूं नये ? भांडीं घासायला सांगणें अगर पाय रगडायला सांगणें देखील याहून चांगलें ! "

" भांडीं घासणें ?—आणि पाय रगडणें ? कोणत्या युगांत आहांत आपण ? लक्षांत ठेवा, मी नेहमीचाच आरोप फिरून करतों. तुम्ही युक्तिवादाच्या केवढ्याहि बढाया मारा, ऐन वेळीं तुमच्या पोटांतील जुन्याचा अभिमान बाहेर डोकावूं लागतो. भांडीं घासायला ती काय मोलकरीण आहे कीं काय ? आणि पाय रगडणें ?—मला नव्हतें वाटलें

स्त्रियांविषयी इतके हीन विचार तुमच्या मनांत असतील! बायको म्हणजे काय गुलाम कीं काय?”

पुढील वाद न दिलेलाच बरा. दोन्ही पक्षांनी आपापले खंदक खणले होते, व आपापल्या स्थानापासून रेसभरहि न ढळतां दोघांनी निकराचा मारा चालविला होता. आमच्या ‘नियतकालिक’ वादांत खरा मतभेद कितपत असतो, हें सांगणें कठीण आहे. कारण त्या दिवशींच्या वादांतच कां होईना, पहिलें वाक्य माझ्या मित्राऐवजी मी बोललों असतों तरी इतकाच कडाक्याचा वाद झाला असता. फरक काय तो कांही शब्दांचा. आमचे वाद मतभेदामुळे अगर स्वभावभेदामुळे होतात असें नाही. उलट स्वभावसाम्यामुळे होतात म्हणणेंच अधिक खरें!

आमच्या वादांतून इतरांना तत्त्वबोधच काय पण एका शब्दाचाहि बोध होणें कठीण! आमचा आम्हालाहि त्या बैठकीस मुळीच होत नाही. रणांगणावरील धुराचे लोट व नंतरचें तहाच्या प्रतिनिधींचें दरबारी हास्य यांत जेवढें अंतर तेवढेंच आमच्या वादाच्या कडाक्यांत आणि नंतरच्या शांत विचारांत असतें. वादानंतर शांत व नेमस्त तत्त्वबोध उभयपक्षास एकदमच दर्शन देतो. जातीय दंग्यानंतर मोटारींतून फिरकूं लागणाऱ्या पुढाऱ्याप्रमाणेच म्हणाना कांहीसें!

‘उद्या या गाढवाची गाठ घ्यावी कीं न घ्यावी?’ असा विचार करीत मी माझ्या मित्राकडून उठलों. परत जातांना माझी विचारसरणीच कशी निर्दोष होती याविषयीं मी माझी स्वतःचीच खात्री पटवीत होतों. आणि तसें पाहिल्यास वादांतील भेदक शब्दप्रहाराचा आणि पोकळ अस्तन्या मागे सारण्याचा भाग सोडल्यास, मुख्य मुद्दा विचारणीय होता.

कित्येकांच्या मतें पूर्वीच्या राहणीहून हल्लीच्या विलासी राहणींत स्त्रियांचे हाल फारच कमी झाले आहेत. आणि ज्या वेळीं एखादा काव्यात्मपति

राठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ३४२८९ दि: ...
क्रमांक ९८२७ नों दि २५।१।६३.



आपल्या पत्नीस प्राचीन काळापासून चालत आलेल्या कामाहून वेगळें काम सांगतो त्या वेळीं तर त्यास जणूं केवळ नावीन्यामुळेच तिचा उद्धार होत आहेसें वाटूं लागतें. माझ्या कांही मित्रांना तर—"पति वकील असल्यास पत्नीने केसची तयारी करून द्यावी; पति डॉक्टर असल्यास पत्नीने निदान औषधओळख करून घेऊन कॉम्पाउन्डरची तरी उणीव भरून काढावी; प्रोफेसर अगर मास्तर असल्यास पेपरचें ओझें हलकें करावें" असें वाटतें. इतकेंच नव्हे तर यांत काव्यमय जीवनाची कमाल वाटते ! कित्येकांनी तर काल्पनिक जीवनांत स्त्रियांकडून पतीची कौन्सिलांतील भाषणेंहि लिहविलीं आहेत !

आता ज्यास बौद्धिक सहजीवन म्हणतात तें शेकडा किती संसारांत शक्य आहे हा प्रश्न सोडल्यास, निव्वळ जुनीं कामें जाऊन (अथवा जुनीं जवळ जवळ आहेत तितकींच राहून !) नवीन कामें अंगावर पडण्यांत स्त्रियांना काव्य ( रोमान्स ) कितपत वाटेल हा प्रश्नच आहे. उदाहरणार्थ, माझ्या मित्राचेंच मनोराज्य घ्या. कल्पनावैभवाचे धनी इतरेजन आणि अक्षरें उतरण्यापुरती सत्ता पत्नीची अशी स्थिति असेल तर त्यांत बायकोस कितपत आनंद वाटावा ? बरें, समजा इतरेजनांइतपतच तिला माझ्या कविमित्राचें काव्य आनंद देत असेल, तर त्याच्या प्रती करून विशेष आनंद होईल, कीं गृहव्यवस्थेंतील अधिक वैयक्तिक सेवेंत विशेष आनंद होईल ? घरकामांत परक्यांचा संबंधच येत नाही. व यांतच कोणाहि जातिवंत स्त्रीला अधिक अभिमान वाटेल. पतीच्या सार्वजनिक कार्यांत मग ते लेखनाचें असो की खानावळ चालविण्याचें असो—मदत करण्यांत पत्नी अप्रत्यक्ष रीतीने एकाच्या सेवेचा, शुश्रूषेचा अगर सहकार्याचा करार ओलांडून अनेकांची सेवा पत्करते; अर्थात् तिला जुन्या काळाहून अधिक विलासाचे दिवस आले

असें समजलें तर बरोबर होणारच नाही. शिवाय काम कागदावर शाईने करावयाचें आहे कीं पाण्याने भांड्यांत करावयाचें आहे यावर त्याचें श्रेष्ठत्व नसून त्यांत तुम्हाला स्वतःची अक्कल चालविण्यास कितपत मुभा आहे यावर त्याचें श्रेष्ठत्व आहे; आणि घरकामांत निव्वळ कारकुनीहून वैयक्तिक कौशल्याला अधिक मुभा आहे हें कोणीहि मान्य करील. इतकेंच काय, पण घरकामांत "पुरुषांना काय समजतें?"–अशा विचाराने कित्येक स्त्रियांना मूठभर मांस चढतें, तेंहि नवऱ्याच्या कामांत "असिस्टंट" बनण्याने कसें चढेल? कोणाहि गृहिणीला पतीच्या सार्वजनिक जीवनापासून अगर आर्थिक व्यवसायापासून शक्य तों अलिप्त राहून त्याच्या शारीरिक पोषणाची व मानसिक समाधानाची स्वतंत्र कामगिरी हातीं घेण्यांत केवढा अभिमान वाटतो, याची जाणीव प्रतिज्ञेवर अविवाहित राहणाऱ्या कवीला नसते यांत तर आश्चर्य नाहीच, पण संसारसुखाचा अनुभव घेत असलेल्या लेखकासहि दिसून येत नाही हें आश्चर्य नव्हें काय?

आमच्या वादांतील मुख्य मुद्दा एवढाच होता. पण असें सांगितल्यास मी केवळ माझीच बाजू मांडून माझ्या मित्राच्या बाबतींत अन्याय करीत आहे असें समजण्याचें कारण नाही. कारण त्या दिवशींची माझी बाजू म्हणजे दुसऱ्या दिवशींची माझ्या मित्राची बाजू होय!

दुसरे दिवशीं माझा मित्र वरील विचार परोपरीने मांडीत होता व मी माझें पहिल्या दिवशींचें मत बाजूस ठेवून मधून मधून—

"तरी पण, —'आपण, सांगावें आणि तिने लिहावें'—ह्या दृश्यांत कांही तरी और आहे. बस्! आपलं तर त्या कल्पनेवरच प्रेम बसलं!" —एवढेंच म्हणत होतों!"

३

# सुखाचा शोध

त्या सालीं एका नातेवाइकाकडे सुटी घालविण्याकरिता म्हणून उन्हाळ्याचा महिना दीड महिना जाऊन राहिलों होतों. सुटींत पूर्ण विश्रांति घेऊन ताजातवाना होऊन परत जाण्याखेरीज माझ्या डोळ्यापुढे दुसरें कसलेंच तात्कालिक ध्येय नव्हतें. शारीरिक दगदग अथवा मानसिक श्रम यांपैकी कशाचाहि संभव दिसतांच मी कोणतेंहि काम हातीं घेत नसे. जेवणें, खाणें, फिरणें, वाचणें यांखेरीज मी कांहीच करीत नसे. इतकेंच काय पण माझ्याकरिता मात्र इतर बरीच मंडळी शक्य तेवढी दगदग सोशीत. परंतु त्याचा मी फारसा हिशेब करीत नसे अथवा हिशेब ठेवण्यास मला वेळच मिळत नसे. आढावाच घ्यावयाचा म्हटल्यास " आज मी स्वतःस कांही त्रास करून घेतला काय ? – शक्य तेवढें सुख लावून घेतलें कीं नाही ? " अशा तऱ्हेचा प्रश्न मी स्वतःस करीत असे.

वास्तविक इतपत निर्भेळ आत्मनिष्ठ होणें मला फारसें स्वाभाविक अगर सोपें वाटत होतें, असें नाही. तरी पूर्ण विश्रांति घेण्याबद्दल डॉक्टरांनी दिलेल्या सल्ल्यामुळे तसें करण्यांत मला थोडेसें उत्तेजन आलेलें होतें.

माझा प्रयत्न मनापासून चालला होता. पण त्याला यश कितपत येतहोतें हें मात्र सांगतां येणें कठिण आहे. केवळ सुखावह गोष्टी करण्याचें ठरविल्यामुळें दुःखदायक अथवा ज्यांतून त्रास होण्याचा थोडाफार संभव आहे अशा गोष्टींची संख्या वाढत आहे कीं काय अशी मला शंका येऊं लागली. ज्या गोष्टी एरव्ही माझ्या लक्ष्यांतहि येणार नाहीत त्या गोष्टींनी मनाला त्रास होऊं लागला व नवीन सुख-संशोधक दृष्टीमुळे तो त्रास मोठा दिसून मनांत अधिक वेळ घोळूं लागला. व पुढे पुढे तर ठरविल्याप्रमाणे मानसिक स्वास्थ्य मिळण्याऐवजीं माझे मूळचे मानसिक अस्वास्थ्य अथवा औदासीन्य अधिक वाढूं लागलें आहे कीं काय, अशीहि मला शंका येऊं लागली. सुटी संपूं लागली व फिरून मी आपल्या नोकरीच्या गावीं रुजू झाल्यावर कुठली विश्रांति व कुठलें मानसिक स्वास्थ्य ! झालें. स्वास्थ्य नाही या कल्पनेनेच माझें अस्वास्थ्य अधिक वाढूं लागलें, व उरल्या सुरल्या एकदीड आठवड्यांत सुख लावून घेण्याचा निर्वाणीचा उपाय मी शोधूं लागलों.

मी ज्या घरीं रहात होतों, तें माझ्या अगदी जवळच्या नातेवाइकाचें घर होतें. ते गृहस्थ माझ्याहून थोडे मोठे तरी साधारण तरुणच होते. घरांतील मिळवतेहि तेच होते. त्यांच्या दैनिक कार्यक्रमाकडे माझें सहज लक्ष गेलें व मी जवळ जवळ दचकलोंच ! पहाटे पांचपासून रात्री अकरापर्यंत त्यांना क्षणभरहि फुरसत नसे. व हा सर्व वेळ उपजीविकेचा उद्योग व घरांतील वडील मंडळी, मुलेंबाळें यांची बरदास्त यांतच जाई.

मी तर केवळ सुट्टीकरिता व तीहि केवळ आरामांत घालविण्याकरिता आलेला ! तेव्हा माझी बरदास्त हा एक नवीनच उद्योग त्यांना झालेला होता. मी दचकून मनांत म्हणालों, " अरे ! या प्राण्याला सुख किंवा स्वास्थ्य याचा लाभ घेण्याला तर राहोच, पण याचा विचार करण्याला तरी वेळ मिळतो का ? " पण माझ्या प्रश्नांतच मला उत्तर मिळालें. वैयक्तिक सुखाविषयी विचारच करण्याला वेळ नसल्यावर अस्वास्थ्याविषयी तरी विचार करण्याला वेळ कुठून येणार ? आणि ही स्थिति सुखाची कीं दुःखाची ? पण अशी शंका घेण्याला त्या गृहस्थाच्या आनंदी वृत्तीमुळे मला फारशी जागाच नव्हती. कारण माझ्यापेक्षा तर ते खास आनंदी व समाधानी दिसले. मी चकित झालों. मला सुखवृक्ष सत्यभामेच्या परड्यांतील पारिजातक वृक्षाप्रमाणे वाटूं लागला. वृक्ष सत्यभामेच्या परड्यांत, पण फुलें मात्र रुक्मिणीच्या घरीं ! ते गृहस्थ घरांतील लहानथोरांच्या सुखासाठी खस्ता खाणारे; पण घरांत त्यांच्याइतका आनंदी कोणीच नाही. आणि चोवीस तास स्वतःच्या सुखस्वास्थ्याच्या मागे लागलेला मी, पण माझ्याइतका खिन्न कोणीच नाही !

मला कळून चुकलें की माझी वाटच चुकली. सुखाच्या स्थानापासून उलट दिशेने मी दूरदूर चाललों होतों व सुखाचा शोध करीत होतों. कोणाला तरी—आपल्याखेरीज—सुख लावण्याचा प्रयत्न करणें हा एकच सुखाचा सोपा मार्ग होय. पण छेः ! हें मला थोडेसें वेदांतीपणाचें वाटूं लागलें ! आणि सुखाचा शोध घेतां घेतां वैराग्याच्या अरण्यांत शिरणें म्हणजे पराभव कबूल करणें नव्हें काय ? मी फिरून विवंचनेंत पडलों. पण दुसऱ्याचें सुख हेंच आपलें ध्येय बनविणें मला पूर्वीइतकें बिकट वाटेनासें झालें. इतकेंच काय—पण कोणताहि जाणता मनुष्य याच मार्गानें सुख मिळवतो असें वाटूं लागलें. दुसऱ्याचें सुख, हें वैराग्या-

त्मक ( Altruistic ) ध्येय न वाटतां, केवळ सर्वसामान्य धोरण आहे असें कळून आलें.

ज्या गोष्टीचें नांव काढतांच मनुष्य बिकट म्हणून घाबरतो तिचेंच आचरण सर्वत्र नकळत चाललेलें नाही काय ? दुसऱ्याकरिता स्वतःचें सुख बाजूला ठेवणें म्हणजे आपण वैराग्य समजतों. पण संसार म्हणजे तरी दुसऱ्याच्या सुखांत स्वतःचें सुखदुःख विसरण्याकरिता स्त्री-पुरुषांनी केलेला संघटित प्रयत्नच नव्हे काय ?

कोणीकडूनहि पाहिलें तरी मला सुखाची वाट एकच दिसूं लागली. वाट तर सापडली ! तथापि दीर्घकाल आत्मनिष्ठ बनून त्या वाटेपासून मी किती दूर वाहवलों होतों, व इतरांना अत्यंत सुलभ असलेली ती वाट दिसूनहि मला अखेर चोखाळतां आली कीं नाही, हा प्रश्न इतरांच्या दृष्टीने तरी फारसा महत्त्वाचा नाही.

४

# आकर्षक व्यक्तिमत्त्व

परवाच माझ्या एका परिचित जोडप्याकडे मी चहाला गेलों असतां त्या प्रेमळ पतिपत्नीचा दैनिक प्रेमकलहाचा कार्यक्रम चालू होता. प्रीतिविवाह झालेल्या जोडप्याकडे जाणारांवर नेहमीच एक धर्मसंकट ओढवतें आणि तें म्हणजे त्यांच्या भांडणांत बाजू घ्यावी कोणाची ? मी बहुधा नवऱ्याची बाजू घेणें सोयीचें समजतों; पण त्या दिवशीं मला त्या बायकोची बाजू घ्यावी लागली.

वादाचा विषय, दुपारींच सदर जोडप्याकडे येऊन गेलेला सुशिक्षित ' बिझिनेसमन् ' हा होऊन बसला होता. माझ्या शुद्धिवादी मित्रांचा रोष पत्करूनहि मी हा इंग्रजी शब्द वापरीत आहे; कारण सदर गृहस्थाला व्यापारी म्हणावें तर तो फक्त विमाएजंट होता. नुसता एजंट म्हणावें तर तो इतरहि अनेक धंदे करतो. ' धंदेवाला ' म्हणावें तर त्याच्या सुशिक्षित

बाण्याला शोभण्याइतका तो शब्द प्रतिष्ठित वाटेना. म्हणून सदर गृहस्थाने स्वतःचें वर्णन करतांना जो शब्द योजला असता तोच मीहि वापरला.

नवराबायकोंत वाद असा पडला होता : सद्रहू गृहस्थ ( बाकी त्या वादाचे मुद्दे सांगणेंच कठीण आहे ! ) ' सद्गृहस्थ ' होता कीं नाही याबद्दल नवराबायकोचें एकमत नव्हतें. तो हुशार होता कीं नाही, सुंदर होता कीं नाही, ' बिझनेसमन ' होता कीं नाही--सर्वच्या सर्वच वादांत पडलें होतें ! अशा वेळीं मी तेथे गेलों.

एका अर्थाने नवऱ्याचें म्हणणें खरें होतें. कारण सदर गृहस्थ ' एजन्सी 'च्या धंद्याला योग्य आहे असें त्या धंद्यांतील लोकांनीहि मान्य केलें असतें. बायकोचें म्हणणेंहि खरें होतें; कारण तो एजंट स्वतः आपल्या अंगीं जे गुण आहेत असे समजे आणि दाखवी, ते त्याच्या अंगीं नव्हते ! आणि नसलेले गुण दाखविण्याच्या त्याच्या धडपडीमुळेच तर तो अधिक अप्रिय होई.

सभागृह, विद्यालय, दुकान यांपासून तों कौटुंबिक संबंधापर्यंत सर्वत्र ' व्यक्तिमत्त्वा 'ची हरघडी आवश्यकता असते आणि हरघडी परीक्षा होत असते. एखाद्या पातळाचा रंग विटणार नाही हें आपल्या गिऱ्हाइकांस पटवितां आलें नाही, तर दुकानमालक नोकरास ' व्यक्तिमत्त्व ' ( पर्सनॅलिटी ) नाही, म्हणून नालायक ठरवील. बऱ्याचशा पदव्या असूनहि एखादा प्रोफेसर वर्गाचें लक्ष वेधून घेऊं शकत नसेल, तर त्याला सर्व असूनहि ' व्यक्तिमत्व ' नाही असें मानण्यांत येईल. अनोळखी अशा श्रोत्यांसमोर उभा राहणाऱ्या वक्त्यांतहि प्रथम व्यक्तिमत्व आहे कीं नाही याचीच परीक्षा होते. पण व्यक्तिमत्त्व म्हणजे काय म्हणून विचारलें, तर जितके श्रोते तितकीं उत्तरें येतील ! आणि वक्त्याने तोंड उघडण्यापूर्वीच त्याला ' पर्सनॅलिटी ' नाही असें जाहीर करणारा

एखादा तल्लख श्रोताहि थोड्याच वेळांत त्याच्या आकर्षणाच्या कक्षेंत दाखल होईल !

या थोड्या चमत्कारिक प्रश्नावर दोन माणसांचीं निदान दोन तरी मतें पडतात, हें खरें असलें तरीहि, प्रत्येक पिढींत मनावर छाप बसवणारे असे व्यक्तिमत्त्वाचे कांही ठळक नमुने आकार पावतात; आणि स्थूल मानाने मतें देणारे आणि नंतर बदलणारे लोक या चालू छापाचीच भाषा बोलत असतात.

आज पुणें, मुंबई, नागपूर वगैरे शहरांत व्यक्तिमत्त्वाचा जो चालू नमूना, ( लेटेस्ट मॉडेल ) आहे त्याचें चित्र रेखाटणें अवघड नाही; पण तें चित्र रेखाटतां रेखाटतां त्याचें व्यंगचित्र होऊं न देणें मात्र तितकेसें सोपें नाही ! निदान मला तरी तें अवघडच जाईल. कारण या आधुनिक व्यक्तिमत्त्वाची आज चलती असूनहि, मी त्याच्या आकर्षणकक्षेंत सामील होऊं शकत नाही. तरीहि पण व्यक्तिवाद आणि वैयक्तिक मतें जर कोठें बाजूला ठेवावीं लागत असतील, तर अशा बाबतींतच. कारण कोणतें नाणें चालू व्हावें, हा येथें प्रश्न नसून, कोणतें नाणें चालू आहे हा प्रश्न असतो.

अशा चालू नाण्यालाच त्या दिवशीं तो व्यवहारज्ञ पति मान्यता देत होता. आणि धंद्यापेक्षा अधिक व्यापक मूल्यांनी नकळत आकर्षिक होणारी ती पत्नी, पतीशीं वाद करीत होती. त्यांच्याकडे येऊन गेलेल्या सुशिक्षित धंदेवाल्याला रूप, बुद्धिमत्ता, बोलण्याची कला आणि आत्मविश्वास एवढ्या तरी देणग्या ईश्वराने नक्की दिल्या होत्या असें पतीचें म्हणणें पडलें; तर इतपतहि वर्गीकरण करूं न शकणारी अल्पशिक्षित पत्नी " इश्श ! ह्यांचं म्हणजे आपलं कांही तरीच ! " यापलीकडे आपल्या मतप्रतिपादनार्थ कांहीच प्रमाणें देऊ शकत नव्हती.

वस्तुस्थिति अशी होती, की वादविषय झालेल्या त्या सुशिक्षित धंदेवाल्याला रूप होतें; पण तें स्त्रीपार्ट करण्याला अधिक अनुरूप होतें. त्याला 'बुद्धिमत्ता' होती म्हणण्यापेक्षा, एक प्रकारची 'तरतरी' होती असेंच म्हणावें लागेल. कारण अल्प आणि सामान्य अशीच बुद्धि वरचेवर मुद्दाम वापरून दाखविणें, हा त्याचा विशेष होता. आणि ज्याला माझे सदर मित्र 'आत्मविश्वास' म्हणत होते, त्याला कुणीं कुणीं मूर्खपणाहि म्हटलें असतें! कारण सदर गृहस्थाच्या विधानांच्या ठामपणाला मुख्य आधार म्हणजे समोर बसलेले लोक आपल्याकडून कमी बुद्धीचे आहेत ही समजूत. अर्थात् कांही बैठकींत ही समजूत खरी असेलहि; पण तो सर्वत्रच तशा बाण्याने वागे, व त्यालाच कांही लोक आत्मविश्वास म्हणत.

आपण व्यक्तिमत्त्वाचा विकास करीत आहों अथवा आपणांस विशेष प्रभावी व्यक्तिमत्त्व आहे असें समजणारांची पुष्कळदा हीच चूक होते. ज्या आविर्भावाचा प्रभाव त्यांच्याहून कमी प्रतीच्या लोकांवर होतो, त्याचा प्रभाव सर्वांवरच होईल अशी ते कल्पना करतात!

अर्थात् व्यक्तिमत्वाचे सर्वांनाच मान्य होण्यासारखे असे कांही विशेष सांगतां येणार नाहीत असें नाही. व्यक्तिमत्वांत 'आकृति' अगर 'रूप' हें प्रधान होय यांत शंका नाही. कारण तोंडहि उघडण्यापूर्वी एखाद्या व्यक्तीचें जर कांही प्रथम आपल्या मनावर परिणाम करीत असेल, तर तें म्हणजे रूप अथवा आकृति होय.

पण 'रूप' म्हणजे तरी काय? आणि सर्वांनाच नक्की पटेल असें रूपाचें स्वरूप कोणतें? पुरुषांच्या रूपाबाबत तरी उंची, प्रमाणबद्धता आणि आरोग्य या गुणांना मी याच क्रमाने प्रामुख्य देईन. पण हे अगदी प्राथमिक व प्रमुख गुण अंगीं असूनहि मुळींच छाप न पडणारीं

माणसें सापडतील. आणि इथपासूनच शरीराबरोबर मनाच्या गुणांची आवश्यकता उत्पन्न होते. चालण्या-बोलण्याची ढब (बेअरिंग) म्हणून जी म्हणतात ती बुद्धीच्या आणि मनाच्या तरतरीवर अवलंबून असते. आणि तरतरी तर कित्येकदा बुद्धीवरहि अवलंबून नसते. कारण एखादा पढिक पंडित किंवा एखादा स्वतंत्र बुद्धीचा संशोधक हेदेखील प्रथमदर्शनीं निस्तेज, निर्जीव आणि मंद दिसतील.

जिला आपण सामान्यतः तरतरी म्हणून म्हणतों, ती क्रियाशक्ति (एनर्जी), कुतूहल, आणि जागृतता (ॲलर्टनेस) यांवर अवलंबून असते. आणि एखादे वेळीं बुद्धिमत्ता असूनहि क्रियाशक्ति आणि जागृतता तितकीशी नसल्यास मनुष्य मंद भासण्याचा संभव असतो. अर्थात् मनुष्य विशेष बुद्धिवान् असल्यास या बाह्यात्कारी मंदतेंतूनहि त्याची बुद्धि दिसून आल्याखेरीज राहत नाही. "प्रतिभावान् मनुष्य त्याच्या नजरेच्या वैशिष्ट्यावरून ओळखतां आलाच पाहिजे," असें शोपेनहौर या जर्मन तत्त्ववेत्त्याचें म्हणणें असे; पण शोपेनहौरच्या म्हणण्याला इमर्सनच्या "प्रतिभावन्तच प्रतिभा ओळखूं शकतो," या तत्त्वाचा छेद दिल्यास अखेर सर्वसाधारण व्यवहारांत प्रतिभेहून तरतरीलाच अधिक गिऱ्हाईक मिळेल हें सांगायला नको.

पण रूपांतहि वादग्रस्त मुद्दे नाहीतच असें नाही. गोरेपणा हें रूपाचें अवश्य अंग आहे कीं नाही? मी 'आहे' असें म्हणतों. माझे कांही मित्र 'नाही' असें म्हणतात. माझे कांही मित्र तर स्त्रियांच्या रूपालाहि गोरेपणाची गरज नाही असें म्हणतात. (पण पुरुषांना गोरेपणा नको म्हणणारे मित्र स्वतः वर्णाने गोरे आहेत आणि स्त्रियांच्या रूपांत गोरेपणाला आपण मुळीच किंमत देत नाही म्हणणारांनी निखालस गौरवर्ण वधूंचीच निवड केलेली आहे! त्यामुळे माझ्या मित्रांच्या म्हणण्यावर

वि: ............ दि: ............

माझा तितकासा विश्वास बसत नाही.) माझ्या माहितीच्या कांही सुशिक्षित स्त्रिया तर म्हणतात, की गोरेपणामुळे पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वाला गालबोट लागतें; गोरे पुरुष थोडे जनानी दिसतात म्हणे!

पण रूप आणि व्यक्तिमत्व यांत अंतर करायचें झाल्यास, गोरेपणाचा परिणाम भिन्नलिंगी व्यक्तीवर काय होतो एवढेंच पाहून चालणार नाही; तर सर्वसाधरण व्यवहारांत सर्वांवरच काय होतो हें पाहावें लागेल. आणि या दृष्टीने माझ्या या स्त्री-पुरुष मित्रांस मी असें दाखवून दिलें की, गौरवर्णाने रूपांत भर पडो अगर न पडो, 'इभ्रतींत' भर पडते. गौरवर्ण मनुष्य श्रीमंत आणि सुस्थित आहे असा आभास उत्पन्न होतो! आणि दुसऱ्याचा विश्वास आणि अनुकूलता अल्प सहवासानेहि मिळविण्याची शक्ति ही जर व्यक्तिमत्वाची कामचलाऊ व्याख्या केली, तर दैनंदिन व्यवहारांत गौरवर्णाचा असा खास उपयोग आहे असें मान्य करावें लागेल. अनोळखी दुकानांत खरेदी करीत असतां पैशाचें पाकीट घरीं विसरल्याचें आढळून यावें आणि अशा वेळीं गौरवर्ण गिऱ्हाइकास उधार अधिक बिनतक्रार मिळतें असें अनुभवास येईल.

मला कधी कधी असा भास होतो की, कित्येक लोक 'आत्मविश्वास' आणि 'गुंडगिरी' यांत थोडा घोटाळा करतात. कदाचित् बिचारे मूळचे गुंड नसून दुष्ट जगांत आलेल्या अनुभवांची त्यांच्यावर झालेली ती प्रतिक्रियाहि असूं शकेल; पण अनौचित्य, अधिक्षेप, औद्धत्य, धटिंगणपणा वगैरे 'गुण' त्यांनी प्रयासेंकरून संपादन केले आहेत, असा भास होतो. कदाचित् 'उद्धटासि व्हावें उद्धट' हें समर्थवचन त्यांनी आपलें ब्रीदवाक्य केलेलें असेल. पण तेवढ्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि वागणुकीचा अर्थ लागत नाही. कारण ते सर्वांशीच तसे वागतात.

कदाचित् वरील समर्थवचनास ते आणखी "Every man is a scoundrel unless proved otherwise." या इंग्रजी वचनाची पुस्ती जोडून आपलें वर्तन आणि व्यक्तिमत्त्व निश्चित करीत असतात. पण सुशिक्षित आणि सुसंस्कृत म्हणविणाऱ्या वर्गांनीहि हीं सूत्रें आपलीं ब्रीदवाक्यें केल्यास आकर्षकपणाऐवजीं उलटच परिणाम होण्याचा संभव अधिक !

नाकडोळ्यांचा ठसठशीतपणा हा मानसिक तरतरीचाच द्योतक असतो – निदान तरतरीचा आभास तरी खास उत्पन्न करतो. ठसठशीतपणा हा शब्द मी मुद्दामच वापरतों. कारण नाकडोळे रेखीव अगर सुंदर असूनहि मनुष्य मिळमिळीत, दुर्बल अगर उपेक्षणीय वाटूं शकतो.

उंची, आरोग्य, तरतरी एवढ्या प्राथमिक गुणांनंतर आपलें लक्ष मनुष्याच्या मानसिक गुणांकडे जातें व येथूनच मतभेदाचें क्षेत्र अधिकाधिक वाढत जातें.

आकर्षकता आक्रमक वृत्तींत आहे कीं समंजसपणांत आहे ? कमी बोलण्यांत आहे कीं अधिक बोलण्यांत आहे ? भरभर बोलण्यांत आहे कीं तोलून बोलण्यांत आहे ? भाबडेपणांत आहे कीं बिलंदरपणांत आहे ? मोकळेपणांत आहे कीं घुमेपणांत आहे ?

अथवा थोडें उघड बोलायचें झाल्यास 'गुंडपणां'त व्यक्तिमत्त्व अधिक कीं सौजन्यांत व्यक्तिमत्त्व अधिक ?

लहान मुलेंहि गौरवर्ण मनुष्याजवळ अधिक खुशीने जातात असें आढळेल. अशा स्थितींत कांही स्त्रिया कृष्णवर्ण पुरुषांना अधिक चाहतात अगर काही कवि 'श्यामले'वर कविता करतात, एवढ्यावरून गौरवर्णाला व्यक्तिमत्त्वांत महत्त्व नाही, असें म्हणतां येणार नाही.

पण आवाज आणि बोलण्याची ढब यांचें व्यक्तिमत्त्वांतील महत्त्व लोक घ्यावें तितकें लक्षांत घेत नाहीत, असें मला म्हणावयाचें आहे. किरटा, केता अथवा बायकी आवाज, तसेंच अस्पष्ट, तोंडांतल्या तोंडांत आणि 'लाडिक' बोलण्याची ढब असलेले लोक जेव्हा शिक्षक, प्रोफेसर अगर वकील यांसारख्या वक्तृत्वाच्या आणि व्यक्तिमत्त्वाच्या व्यवसायांत मी पाहतों तेव्हा मला उंची अगर धिप्पाडपणा यांनाहि निरुपयोगी करणारा असा हा एकच दोष आहे असें वाटतें.

कांही वर्षांमागे एक पदवीधर गृहस्थ माझ्या भेटीला आले. सदर गृहस्थाच्या अंगीं व्यक्तिमत्त्वास आवश्यक ते शारीरिक गुण होते. तें उंच, सुदृढ आणि नाकेले होते. त्यांचा वर्ण काळसरच होता पण काळा नव्हता. आणि ज्यांच्याबद्दल मला आदर आणि स्नेहभाव होता अशा गृहस्थांचा हस्तावलंब करून ते आलेले असल्याने, माझ्या मनाचा पूर्वग्रह मी त्यांच्यासंबंधीं अनुकूलतेकडेच झुकलेला होता. थोड्याच वेळांत आमचें बोलणें लेखन व लेखक याकडे वळलें; कारण त्यासंबंधींचाच कांही हेतु मनांत धरून ते मजकडे आले होते.

"तुम्ही लेखनाबद्दल मोबदला काय घेतां?" सद्गृहस्थांनी जणू उलट तपासणी व कानउघाडणी करण्याच्या सुरांत विचारलें.

"मी स्वतः अट अशी कोणतीच घालीत नाही. तथापि अगदी थोडींच नियतकालिकं मोबदल्याची भाषा करतात आणि तींहि मोबदला देतातच असं नाही." मीं त्या वेळच्या माझ्या लेखनव्यवसायाची स्थिति प्रांजलपणें सांगितली.

"मीहि लिहीत असें; पण हे संपादक-लोक मोबदला देत नाहीत. म्हणून मी लिहिणं बंद केलं!" सद्गृहस्थांनी माझ्यांतील व त्यांच्यांतील फरक दाखविण्याचा यत्न केला.

त्यांच्या लेखनाबद्दल मला अनुकूल अगर प्रतिकूल कांहीच म्हणायचें नव्हतें; कारण मीं तें वाचलेलेंच नव्हतें ! तथापि, लेखनविषयक स्वाभिमानाची त्यांची कल्पना मला मान्य नसल्याचें सांगणें मात्र मला जरूर वाटलें. मी म्हणालों, "माझ्यापेक्षा कितीतरी पटीनं गुणवान् आणि वयोवृद्ध लेखक आज विनामूल्य लिहीत आहेत, हें मला माहीत आहे. तसंच कांही उच्च दर्जाचीं मासिकं आज मोबदला देऊं शकत नाहीत हा त्यांचा दोष नसून तुम्हां-आम्हां वाचकांचा दोष आहे. शिवाय ज्यांच्या विचारांना आणि भावनांना किंमत आहे असे कित्येक लेखक व कवि, वेळच आली तर जाहिरातीच्या दरानंहि आपलं हृद्गत छापून घेतील, इतकी त्यांना आत्माविष्काराची आणि समाजशिक्षणाची गरज वाटते, हेंहि मला माहीत आहे. अशा स्थितींत मोबदला नाही म्हणून लेखन बंद करणारासंबंधीं मला आदर अगर सहानुभूति न वाटल्यास फारसं आश्चर्य नाही !"

माझ्या या उत्तरानंतर आपला स्वाभिमान आणि तडफ पटविण्याचे आणखी एकदोन प्रयत्न करून नंतर सदर गृहस्थांनी आपला मानस सांगितला. तो अर्थातच त्यांच्या 'पडून राहिलेल्या' लिखाणास स्थळ पाहून देण्यासंबंधीचा होता !

सदर गृहस्थाचें लेखन वाईट होतें कीं चांगलें होतें हें इथे अप्रस्तुत आहे. ते वृत्तीने उद्धट होते असा माझ्या वाचकांचा ग्रह झाला असल्यास – कारण प्रारंभीं माझाहि तसा ग्रह झाला होता !– तेंहि बरोबर आहे असें नाही. आमच्या मुलाखतीच्या शेवटीं असें आढळून आलें, की ते हाडाचे गरीब होते. मग त्यांच्या या सरबत्तीचा अर्थ काय लावायचा ? अशा प्रकरणीं कित्येकदा कॉरोनरच्या निकालांतील एक वाक्य मला मोठें सोयीचें वाटतें. आत्महत्येच्या कित्येक केसेसमध्ये

‘In a temporary fit of madness’ असा हे मॅजिस्ट्रेट निकाल देतात. वरील सद्गृहस्थांच्या बाबतींतहि तसाच निकाल द्यावा कीं काय असें माझ्या मनांत येतें !

पण हॅमलेटच्या वेडाप्रमाणे अशा औद्धत्याच्या वेडांतहि कांही शिस्त, कांही योजना आढळून येते. सदरहू गृहस्थांनी आपली बुद्धिमत्ता आणि आत्मविश्वास दाखविण्याकरिता म्हणून वर वर्णिलेली वर्तनपद्धति स्वीकारली होती; आणि जर पांचपैकी तीन ठिकाणीं त्यांना हवा असलेला परिणाम दिसून आला असेल, तर त्यांचें तरी चूक कसें म्हणावें ?

आणि माझाहि या बाबतींत कांही आग्रह नाही. तथापि त्यांनी बनविलेले व्यक्तिमत्व सर्वच ठिकाणीं प्रभावी ठरेल असें नाही, एवढेंच मला म्हणावयाचें आहे.

पण मुख्य प्रश्न उरतोच ! आपण आपली ढब, वागणूक व वृत्ति बनवितांना जगांत मूर्खांचें प्रमाण अधिक आहे असें गृहीत धरायचें कीं शहाण्यांचें ? विनीतींचें कीं अविनीताचें ? भावनाप्रधानांचें कीं भावना-न्यांचें ?

व्यावहारिक अपयशाचा धोका पत्करूनहि मीं या बाबतींत वर वर्णिलेल्या आधुनिक धोरणाच्या अगदी विरुद्ध धोरण सांगेन. “Every man is a gentleman unless proved otherwise.” या तत्त्वाने आपली वृत्ति आणि मूर्ति बनविणें मी पसंत करीन. कारण क्वचित् उलट अनुभव आल्यावर आपणांस आपलें धोरण बदलावें लागलें, तरी निदान आपल्या सदैवच्या वृत्तींना आणि उक्तींना कडूपणा आणि निबरपणा येण्याचें तरी त्यामुळे टळेल.

कारण एकदा आपल्या वृत्तींतील टवटवी आणि नाजुकपणा जाऊन

निब्ररटपणा आणि विटकेपणा आल्यावर मग व्यावहारिक यशाची गोडी चाखायला तरी आपल्याजवळ साधन कोणतें ? सौजन्य आणि सात्त्विकता यांचा बळी देऊन व्यवहारांत यश मिळविणें म्हणजे जीभ देऊन रस विकत घेण्यासारखें, वा भूक विकून अन्न खरेदी करण्यासारखेंच आहे !

पण हा प्रश्न अखेर जीवनांतील अंतिम मूल्यांचा ठरतो. आणि मी कोणतीं मूल्यें मानतों, हें माझ्या वाचकांना आता थोडेंफार माहीत झालें आहे असें मी समजतों.

५

# कांही चोरवाटा

He was so honest that he was simply rediculous
*Mark Twain*

गंभीर प्रश्न सोडून आज मी तुम्हांस भ्रातृभावाने चार किरकोळ गप्पा सांगणार आहे. त्यांचा काटेकोरपणें विचार न कराल अशी आशा आहे.

प्रबल मोगल सत्तेविरुद्ध मराठ्यांनी जय कसे मिळविले ? रोखठोक संग्रामांत त्यांना यशाची कितपत आशा होती ? जी गोष्ट संग्रामाची तीच कांही अंशीं नित्य व्यवहाराची. नेहमीच धर्मराजाची वृत्ति धरून चालत नाही, निदान धूर्तांशी धूर्त न बनल्यास फजीतीची वेळ येते. शिवाय भल्या माणसाशीं तरी सर्वच वेळीं धोपट मार्गाने वागून कार्य-भाग होत नाही. वेळ प्रसंग पाहून रंग पालटावा लागतो. कांही झालें

तरी सरळ चालायचें, मग वाटेंत विहीर असो कीं निवडुंग असो ! असे म्हणणारे वीर आहेत; पण त्यांच्या वागण्याची यथार्थता निदान सर्वांना तरी पटणें कठीण आहे.

'Truth has been waiting for a definition since the days of Pontius Pilate" म्हणजे बिचाऱ्या सत्याची व्याख्या ( ख्रिस्ताला फाशीं देणारा ) पायलेटच्या कालापासून आतापर्यंत कधीच जमलेली नाही, अशा अर्थाचे उद्गार पं. मोतीलाल नेहरूंनी एकदा काढले होते, त्यांतील तरी मर्म हेंच होतें. परंतु तो वाद जरी सोडून दिला, तरी चेष्टेंत देखील असत्य भाषण करायचें नाही म्हटल्यास मानवी जीवित फारच नीरस होईल. निर्भेळ सत्य ( Naked truth ) हें केव्हाहि नीरसच ठरेल. सत्यांत असत्याचें मिश्रण असल्याखेरीज मौज नाही.

याशिवाय सत्याप्रमाणेच मानवी स्वभावांत असत्याविषयीहि प्रेम उपजतच आढळतें, असें बेकन म्हणतो. कवी काव्याकरितां खोटें बोलतात, एकमेकांत सचोटीने वागणारे व्यापारी माल खपविण्याकरिता गिऱ्हाइकांशीं खोटें बोलतात, आणि तुम्ही आम्ही नित्य व्यवहारांत मौजेखातर खोटें बोलतों. आपणां सर्वांस याबद्दल पाप लागतें कीं काय कोण जाणे ! माझ्या मतें चित्रगुप्ताच्या वहींत दोन खातीं असावीं. एक White lie उर्फ 'शुभ्र असत्या' करिता; व दुसरें Black lie उर्फ 'कृष्ण असत्या' करिता. कोणाचा घातपात मनांत न अणितां वेळ मारून नेण्याकरिता योजलेल्या असत्यास White lie म्हणतात. आणि नीच हेतु मनांत धरून ज्या वेळीं मनुष्य असत्याचा अवलंब करितो तेव्हा त्यास Black lie असें म्हणतात.

त्याचप्रमाणे चांगल्या माणसाशीं वागतांना देखील कधी कधी

पेच योजावे लागतात. नाहीतर कार्यहानि, निदान कालहानि तरी खास होते. कित्येक गोष्टी शर्करावगुंठित केल्याशिवाय लोकांच्या पचनीं पडत नाहीत. यालाच हवें तर साखर पेरणें म्हणा!

पहिली गोष्ट म्हटली म्हणजे ज्याच्याशीं वागावयाचें त्याचें मर्मस्थान (weak point) माहिती असावें. पण तें ओळखावयाचें कसें? परिचयामुळे हें लहान मुलांना देखील ओळखतां येतें. साधारणतः प्रत्येक मनुष्यास स्तुति फार प्रिय असते. परंतु ती थोडया खुबीने करावी लागते. उदाहरणार्थ, ज्याला सरळ श्लोकहि नीट म्हणतां येत नाही त्यास "तुम्ही गातां फार उत्तम!" असें म्हणणाराची फजीती होईल. परंतु ज्याचा आवाज बरा आहे व ज्यास गाण्याचा थोडा नादहि आहे अशा मनुष्यास, "मला किनै तुमचा राग येतो बुवा! असा आवाज लाभला असून तुम्ही गायला कां शिकत नाही?" असें म्हटल्यास जें पुस्तक तें माणूस जन्मांत देणें शक्य नाही तें खुशाल तुमच्या स्वाधीन करुन "केव्हाहि आणून द्या–इतका कांही खोळंबा नाही" असें आणखी वर सांगेल. अशा वेळीं आपण खोटें बोललों काय? नाही! बरें, सरळपणें मात्र वागलों नाही!

आगगाडींत हातपाय पसरुन बसलेल्या बाईस जागा देण्यास सांगूनहि ती जागा देत नसल्यास तिच्या शेजारींच अजागळाप्रमाणे बसलेल्या तिच्या बाळ्याकडे पाहून "हा कोण? मुलगा वाटतं! अगदीं तुमच्यासारखा दिसतो हो!" अशी सुरुवात केल्यास जागाच काय पण थोडयाच वेळांत फराळाचें मिळण्याचाहि संभव असतो!

कोणाहि मनुष्यास त्याच्या मुलग्याची अगर भावाची सरळ निंदा केल्यास राग येईल. पण त्याऐवजी "तुमच्यांत या वयांत जो उरक आहे तो तुमच्या मुलग्यांत ऐन पंचविशींत नाही" अशी मांडणी

केल्यास पुढे त्याच्या प्रिय पुत्रास तुम्ही चक्क शिव्या दिल्या तरीहि तो म्हातारा " बसा की हो! तपकीर ओढून मग जा!" असा आग्रह करील!

अशा एक की दोन पुष्कळ खुब्या सांगतां येतील; पण तुम्हीच म्हणाल असले लुच्चेगिरीचे धडे आम्हांला कशाला? लुच्चेगिरी कीं सच्चेगिरी मला ठाऊक नाही. सहज नजरेस पडलेल्या खुब्या सांगितल्या. तुम्ही स्वतः जरी यांचा उपयोग केला नाहीत, तरी निदान दुसरे तुम्हांवर अशा तऱ्हेचें अस्त्र सोडूं लागल्यास, माझ्या ह्या लेखाच्या एखाद्या कलमाखाली तें येतें कीं काय, पहात चला. बाकी तसें पाहूनहि तुम्ही फसालच! कारण यांपैकी कित्येक अस्त्रें इतकीं अमोघ आहेत कीं, मीच हा लेख लिहिला ना? पण मी देखील यांना फसेन!

एखाद्या माणसास त्याचा कांही दोष दाखविणें असल्यास एकदम दाखवूं नये. थोड्या स्तुतीनंतर दोषाचा उल्लेख करावा. हा नियम विशेषतः सार्वजनिक ठिकाणीं फार उपयोगी पडतो. " आजच्या व्याख्यात्यांचे त्यांनी आज दिलेल्या सुंदर व्याख्यानाबद्दल अभिनंदन करण्याकरितां मी उठलों आहे" असें म्हणून थोडी खरीच स्तुति करून, पुढे त्याच्याच भाषणाच्या चिंधड्या उडविल्या तरी त्याला तितकासा राग येणार नाही!

आपणाहून मोठ्या योग्यतेच्या माणसास त्याचाच एखादा दोष दाखविणें असल्यास, ज्याचा विशेष हितसंबंध आड येत नाही अशा माणसाच्या तोंडीं तो आरोप घालावा. उदाहरणार्थ, आण्णासाहेबांवर आत्मप्रौढीचा आरोप करणें असल्यास " परवा त्या बापट बुकसेलरच्या दुकानीं विषय निघाला होता, मी सहज ऐकलें–म्हणे, अण्णासाहेब आता पूर्वीचे राहिले नाहीत!" असें म्हणावें!

## ६

# माझी मैत्रीण, माझा मित्र

मैत्रीची व्याख्या करणें कठिण आहे. मैत्रीची कसोटीहि एकच होईल असें नाही. तथापि रक्ताचें नातें, स्त्रीपुरुषांतील कामुक आकर्षण, आणि व्यावहारिक ऋणानुबंध, या तिहींहून मैत्रीचा संबंध वेगळा होय, हें ज्यानें ओळखलें त्याला मैत्रीची व्याख्या कळली असें म्हणण्यास हरकत नाही.

" जो अडचणीच्या वेळीं कामास येतो तो खरा मित्र " अशी एक प्रसिद्ध कसोटी आहे. पण ही कसोटी केवळ प्रापंचिक मंडळींनी ठरविलेली असावी. ज्यांचा अडचणीच्या वेळीं काडीचाहि उपयोग नाहीं, इतकेंच काय पण अडचणीच्या वेळीं ज्यांना टाळावें लागतें, असेहि लोक माझ्या आवडत्या माणसांत आहेत. ज्यांचा सहवास मला आवडत नाही, पण अडचणीच्या वेळीं मात्र मला ज्यांची व ज्यांना माझी आठ-

राठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
नुक्रम 34289 वि: निबंध
मांक 1427 नों दि 25/7/63


वण होईल अशाहि कांही व्यक्ति निश्चितपणें माझ्या डोळ्यापुढे उभ्या राहतात. व म्हणून मैत्रीच्या क्षेत्रांत मी "एकविधते" पेक्षा "बहुविधते" चा भोक्ता ( Pluralist ) आहे. नव्हे, प्रत्यक्ष अनुभवाने मला तसें बनविलें आहे. डॉ. जॉनसन् यांचे सर्व मित्र एकत्र गोळा केले असते, तर अत्यंत विचित्र आणि विभिन्न लोक एकत्र जमले असल्याचें दिसून आलें असतें, असें एकाने म्हटले आहे. मला कित्येकदा माझ्या मित्रांच्या बाबतींत तसें म्हणावेंसें वाटतें.

आणि असें होणें अगदीच स्वाभाविक आहे. आपल्या परिचयांतील व लोभांतील माणसांकडून आपल्या भिन्न भिन्न अपेक्षा असतात. जीवितांत आपली अडचण ओळखणारे लोक आपणांला जसे हवे असतात, तसेंच आपलीं मतें व आपल्या अभिरुचि ओळखणारे व चाहणारे लोकहि आपल्याला हवे असतात. त्यांना मी बौद्धिक स्नेही म्हणतों व त्यांच्याशीं, पैशाचा नव्हे, तर विचारांचा व्यवहार ठेवतों. पण मित्रांचा या दोहोंहून वेगळाच असा एक प्रकार असतो. त्यांची भूमिका व्यावहारिक साहाय्याचीहि नसते, कीं बौद्धिक समागमाचीहि नसते. ते मजवर माझ्या गुणांकरतां लोभ करतात असेंहि म्हणतां येत नाही. ते माझ्या पाठीराख्याची भूमिका घेतात असेंहि नाही. ते केवळ माझ्या अस्तित्वांत आनंद मानतात. माझ्या गुणांची अगर दोषांची त्यांना पर्वा नाही ! त्यांचा माझ्या कशावर लोभ आहे हेंच मी सांगू शकणार नाही. ते मजकडे कां येतात हेंहि मी सांगू शकणार नाही ! त्यालाच "आन्तरः कोऽपि हेतुः" असें म्हणतां येईल.

या शेवटच्या जातींत आणखी एक विचित्र पोटजात दिसून येते. या जातींतील मित्र माझ्या गुणावगुणांसंबंधीं नुसते उदासीनच असतात असें नाही; तर अभिरुचीने ते सर्वस्वी विरुद्ध टोकाचे असतात आणि तरी

त्यांना मजविषयीं व मला त्यांचेविषयीं एक प्रकारचें आकर्षण, एक प्रकारचा आदर वाटतो. अर्थात् माझे इतर स्नेही "तुम्हांला त्या माणसाचा सहवास कसा काय आवडतो कोण जाणे!" म्हणून आश्चर्य करतात.

अर्थात् मित्र मिळविणें ही एक कला आहे. किंबहुना मैत्री करण्याचा म्हणून एक स्वतंत्र उपजत गुण कांही माणसांत असतो. त्यालाच इंग्रजींत Genius for friendship असें म्हणतात. एक मात्र सांगून टाकलेलें बरें! नुसतें 'सोशल' असणें म्हणजे मैत्रीचा जन्मजात गुण नव्हे. आधुनिक मानसशास्त्राची परिभाषा वापरायची, तर असें म्हटलें पाहिजे की, 'सोशल' मनुष्य 'बहिर्मुख असतो. आणि बहिर्मुख अथवा 'एक्स्ट्रॉव्हर्ट' हा उत्कट मैत्री करूं शकणार नाही.

मजवर लोभ करणारांत स्त्रियांची संख्याहि लहान नाही. या बहुधा या शेवटच्या दोन प्रकारांतील असतात. म्हणजे त्यांचा मजवर कशामुळे लोभ आहे, हें तरी सांगतां येणार नाही; नाहीतर त्यांचा स्नेह आमच्यांतील वैधर्म्यावर आधारलेला आहे, असें तरी म्हणावें लागेल. ज्या काळांत मी, इतर कांही लोकांप्रमाणे, मैत्रीच्या क्षेत्रांत एकविधतेचा आग्रह धरीत असे, त्या काळांत मला "स्त्रिया मैत्रीला नालायक असतात," हें शोपेनहॉरचें मत ग्राह्य वाटे. कारण पुरुषांच्यासारख्या मैत्रीची मी स्त्रियाकडून अपेक्षा करी! व अर्थातच ती अपेक्षा व्यर्थ ठरे. कारण स्त्रीपुरुषांत Comradeship उत्पन्न होणें कठीण असतें. एक तर त्या तुमच्यावर अधिकार गाजवतील; नाही तर त्या "अंकित पदांबुजाची दासी" असल्याप्रमाणे लीनपणें वागवतील. कधी कधी त्या दोन्ही भूमिका आलटून पालटून करतील! पण पुरुष "दोस्त" ज्याप्रमाणे मोकळ्या निकोप बरोबरीने वागतो, तशा वागूं शकणार नाहीत. पण याचा अर्थ

स्त्रीपुरुषांत स्नेह असूं शकत नाही, असा मात्र मी करीत नाहीं.

कामुक आकर्षण आणि स्त्रीपुरुषमैत्री यांत मात्र फरक आहे. कामुक आकर्षणांत एक प्रकारचा जुलूम असतो. अशा आकर्षणांतील दोन्ही पक्ष कडक आणि असहिष्णु होत जातात. एकमेकांवर क्षणोक्षणीं उपेक्षेचा, औदासीन्याचा अगर बेइमानीचा आरोप करतात. मैत्रीचा संबंध अधिक थंड व उदार असतो. सुप्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता एपिक्यूरस 'मैत्री' ला नरजन्मांतील मोठ्यांत मोठें सौख्य समजे; तर उलट लैंगिक आकर्षणाला एक आपत्ति समजे.

पण याचा अर्थ स्त्रीपुरुषमैत्रींत लैंगिक आकर्षणाला मज्जाव असावा असें मी म्हणत नाही. त्यावर मुद्दाम बहिष्कार घालणें तर व्यर्थच ठरेल. ज्या स्त्रीपुरुषमैत्रींत कामुकता नाही, पण कोमलता मात्र आहे, अशा मैत्रीचे यत्न व प्रयोग कमी अधिक यशस्वितेनें केलेले मानवी संस्कृतीच्या प्रत्येक कालखंडांत आढळतात. कृष्ण आणि द्रौपदी यांच्या अपूर्व मैत्रींत या कोमल नात्याची परिसीमा झालेली आढळेल. सारांश, अशी मैत्री सोपी आहे असें समजण्याचा वेडेपणाहि मी करीत नाही; आणि ती अशक्य आहे असें मानण्याचा 'आधुनिकपणा' हि मी करीत नाही.

आपल्या व्यक्तिमत्त्वांत कांही आकर्षक भाग असणें; आणि दुसऱ्यांत तो असल्यास तो आपणांस झटकन् प्रिय होणें, या दोहोंत मैत्रीचें मूळ आहे. या दोन्ही गोष्टी आपणाजवळ असल्यास, जगांत मैत्रीला तोटा नाही. हो! पण आणखी एक गोष्ट आहे. व आधुनिक जगांत तर ती प्रथमच सांगून टाकली पाहिजे. मित्रांकडून फार अपेक्षा करणें हा मित्र गमावण्याचा एक खात्रीचा मार्ग आहे! "अमुक वेळीं माझ्या मित्रांनीच माझा घात केला...नाहीतर..." असें गाऱ्हाणें करणारे अनेक भेटतात; पण आपण स्वतःचा घात काय कमी करतों? आपल्या स्वतःत

अत्मघातकी दोष काय कमी असतात ? ज्या विश्वासूपणाची आपण स्वतःहि हमी देऊं शकत नाही, तो मित्रांत नाही, म्हणून मित्रहि गमावणें हें वेडेपणाचें नाही का ? आणि तरी, मित्रांनी केलेली निराशा ही केवढी प्राणान्तिक वेदना असते, हें मला ठाऊक नाही असें नाही ! उर्दू कवि नजीर अशाच घायाळ मनःस्थितींत म्हणतो...

**किससे रखना दोस्तदारी अय नजीर ?**
**दोस्तसे भी दोस्तदारी उठ गयी**

७

# बोलण्याची कला आणि ऐकण्याची कला

जेव्हा एखाद्या प्रसिद्ध पुरुषाचें स्वभावचित्र पाश्चात्य लेखक रंगवितात, तेव्हा त्याच्या संभाषणचातुर्याचाहि उल्लेख—अर्थात् त्याचें अंगीं संभाषणचातुर्य असल्यास!—करतात. कारण कोणाहि माणसाचे जे अगदी पहिले गुण आपल्या लक्षांत येतात त्यांत रूप आणि बोलणें हे मुख्य होत. किंबहुना बोलण्यापुढे रूपहि विसरून जातें आणि अशा प्रकारें डोळ्यांहूनहि आपण कानांना महत्त्व देतों म्हटलें तरी चालेल!

बोलण्यापुढे रूपहि विसरून जातें, हें मी दोन अर्थांनी म्हणतों. कित्येक माणसांची भाषणशैली इतकी आकर्षक असते, की तिजमुळे त्यांच्या रूपाभावाचा विसर पडतो; तर कित्येक माणसें तोंड उघडतांच

इतकीं उघडीं पडतात की त्यावेळीं त्यांना रूप चांगलें लाभलें असूनहि त्यांचें तोंड चुकवावेंसें वाटतें. शिवाय बोलण्याची कला ही अशी विचित्र कला आहे की, 'कला' म्हणतांच ज्यांच्या कपाळाला आठ्या पडतात, त्यांनाहि तिच्याशिवाय चालत नाही. आणि मोठमोठ्या लोकांच्याहि अंगीं ती असतेच असें नाही.

आपल्याकडेही हल्लीं समकालीनांचीं स्वभावचित्रें रेखाटण्याची, आठवणी लिहिण्याची पद्धत वाढत आहे. आणि त्या निमित्ताने कित्येक प्रसिद्ध व्यक्तींच्या संभाषणचातुर्याकडे अथवा त्याच्या अभावाकडे लक्ष वळत आहे. साहित्यिक म्हणून, पुढारी म्हणून वा कलावंत म्हणून ज्यांना प्रसिद्धि आहे, अशांच्या लक्षांत ही गोष्ट येऊन चुकल्यामुळे त्यांचें लक्ष स्वतःमधील या भागाकडे वळत आहे. आणि कित्येक तर प्रसिद्धीचें एक साधन या दृष्टीने संभाषणाचें एक तंत्रच बनवीता आहेत, असें आढळून येतें. अर्थात् त्यामुळे त्यांना हवी त्या प्रकारचीच प्रसिद्धि मिळेल असं नाही ! कारण संभाषणासंबंधीं आपल्याकडे कित्येक चमत्कारिक कल्पना आढळून येतात! कित्येकांचा कल जास्त बोलण्याकडे असतो. युद्धांत केवळ संख्याबलानें शत्रूचा पाडाव करण्याची म्हणून एक तऱ्हा असते, त्यावरून या मंडळींनी आपली पद्धत बसविली असावी. कित्येकांचा पुस्तकी बोलण्यावर भर असतो. कित्येक भयंकर जपून बोलत आहेत, याची श्रोत्याला सारखी जाणीव होते. तर कित्येक औपरोधिक बोलण्यांत हुशारी मानतातसें दिसतें. कित्येक न बोलतां बसून राहण्यांत मोठेपणा मानतात. बैठकींत बरीच मंडळी असतील, तर ही युक्तीहि करण्यास हरकत नाही. पण दोघांत एकजण घुमेपणाने बसल्यास मला थोडें कसेंसेंच वाटतें !

पण ज्यांच्या संभाषणाने आल्हाद होतो, असेहि लोक भेटत नाहीत

असें नाही. यांत लहान मोठे, प्रसिद्ध–अप्रसिद्ध सर्व तऱ्हेचे लोक असूं शकतील. पण माझ्या वाचकांनाहि सहज ओळख पटावी म्हणून मी प्रथम प्रसिद्ध व्यक्तीच घेतों. अर्थात् यांत अमुकच कां निवडल्या आणि अमूक कां वगळल्या अशी तक्रार मात्र चालणार नाही. ज्या प्रसिद्ध व्यक्तींचा आणि माझा परिचयच आला नाही, त्यांना मी वगळणारच. आणि ज्यांचा संबंध झाला अशाहि कित्येक व्यक्तींचा उल्लेख मला टाळावा लागेल.

प्रसिद्ध व्यक्तींपैकी ज्या व्यक्तीच्या संभाषणांत मला अनुपमेय आल्हाद होई अशा व्यक्तींत कै. माधवराव पटवर्धन यांचें नांव मी अग्रभागीं घालीन. बुद्धिमत्ता, विद्वत्ता, उत्कटता, विषयवैचित्र्य, वगैरे अनेक दुर्मिळ गुण माधवराव यांच्या संभाषणांत जितके आढळत, तितके मला दुसऱ्या कोणाहि प्रसिद्ध महाराष्ट्रीयाच्या संभाषणांत आढळले नाहीत. त्यांच्या माझ्या वृत्तींत आणि मतांत फारसें ऐक्य नसूनहि त्यांच्याशीं बोलण्यांत एकप्रकारचें सौख्य मिळे. मी अनेक बुद्धिमंतांशीं आणि विद्वानांशीं बोललों आहे. तथापि माधवरावांशीं बोलण्यांत जें एक मोकळ्या मैदानाचें आणि सोसाट्याचें वातावरण असें, तें मला कुठेहि आढळलें नाही. एखाद्या विषयावरील माधवरावांचीं मतें पटत नसली, नव्हे साफ चूक वाटली, तरीहि त्यांच्या प्रतिपादनशैलीचें आणि प्रामाणिकपणाचें तेज इतकें प्रबल असें की, सत्य आपल्या बाजूला असलें तरी सत्यप्रीति त्यांच्या बाजूला अधिक आहेसें वाटे.

माधवरावांना विनोद आवडे; आणि ते भाबडे व खिलाडू असल्याने क्वचित् त्यांच्या मतांचा उपहास करून विनोद केला तरी ते मनमुराद हसत, व फिरून आपलें म्हणणें सरळ रेषेंत मांडून दाखवीत. बोलतां बोलतां उसळून ते इंग्रजींत शिरले म्हणजे त्यांच्या अस्खलित आणि

ऐटदार इंग्रजीचा आनंद कांही वेगळाच असे! खाजगी बोलण्यांत ते भाषाशुद्धीचा आग्रह धरीत नसत हा मी एक महालाभच समजत असे. माधवरावांच्या बोलण्यांत क्वचित् एकाच कारणाने दोष उत्पन्न होई. ते सर्व माणसांना जवळ जवळ सारखींच सरळ समजत. स्वभाव लक्षांत घेऊन बोलण्याइतकी विनोदबुद्धि त्यांच्याजवळ नव्हती व त्यामुळे कित्येकदा अस्थानीं मोकळेपणा आणि औदार्य दाखविण्याचा दोष त्यांच्या हातून घडे.

तांब्यांचें बोलणें म्हणजे मूर्तिमंत काव्यप्रेम असें. ते प्रारंभीं अबोल व गंभीर वाटत; पण बैठक रंगल्यावर इंग्रजी मराठी कवितांच्या पंक्ति, तत्त्वप्रतिपादन, प्रतिस्पर्धी विचारसरणीवर हल्ला वगैरे सर्व प्रकार पहावयास सापडत. बोलतांना त्यांच्या डोळ्यांत जें विलक्षण तेज दिसे तें साधारणतः गूढवाद्यांखेरीज कोणाच्या डोळ्यांत दिसत नाही, अशी माझी समजूत आहे. तांबेहि मधेच उसळून इंग्रजी बोलत. तांब्यांच्या बोलण्यांत उत्कटता व आवेश असे. पण ते भोवतालच्या लोकांपासून अलिप्त आहेतसें वाटे. अर्थात् मनमोकळेपणाचा आनंद माधवरावांच्या बोलण्यांत अधिक मिळे.

माधवराव किंवा तांबे यांचे इतर गुण कोणतेहि असोत, बुद्धिमत्तेंत त्यांची बरोबरी करूं शकतील अशीं माणसें नसतात असें नाही. पण केवळ बुद्धिमत्तेनें संभाषण रंगत नाही. माधावरावांनंतरच्या पिढींतील माणसांच्या बाबतींत तर मी असें पाहिलें आहे, की बुद्धिमान माणसेंच संभाषणाचा आनंद देण्यास नालायक ठरतात! या मंडळींपैकी कांहींचा ठराविक विषय म्हणजे 'लेटेस्ट' इंग्रजी पुस्तकांचे उल्लेख. त्यांतहि रमून जाऊन एखादा विषय सहजगत्या विचारविनिमयाकरतां काढतील असें नाही. अखिल जग म्हणजे, latest पुस्तकें वाचण्याचें

एक शर्यतीचें मैदान आहे, अशी त्यांची कल्पना दिसते ! अर्थात् अशा संभाषणाचें पर्यवसान पुस्तकाच्या कॅटेलॉगची तोंडी आवृत्ति काढण्यांत होते ! कारण ' लेटेस्ट ' म्हटलें तरी प्रत्येक जण तींच पुस्तकें वाचील असें नव्हे. शिवाय ऐकणाराहि बहुधा या लेटेस्टच्या रोगापासून मुक्त नसल्याने तो आपली यादी बाहेर काढतो, आणि मग खऱ्या संभाषणाचा भुकेला श्रोता बहुधा तेथून काढता पाय घेतो !

अशा बुद्धिमंतांची आणखी एक कल्पना म्हणजे औपरोधिक भाषण म्हणजेच काय तो हुशार व विनोदी ठरण्याचा मार्ग! कित्येकजण बुद्धिपुरःसर स्वीकारलेल्या अब्रोलपणाची साथ या उपरोधोर्मीस करावयास लावतात. कदाचित् मंद बुद्धीच्या श्रोत्यावर या अस्त्राचा झालेला इष्ट परिणाम पाहून त्यांनी त्याचा सार्वत्रिक प्रयोग चालविलेला असतो कीं काय कोण जाणे! माधवराव पटवर्धनांच्या नेमकी विरुद्ध अशी ही तऱ्हा झाली ! माधवराव आपल्या समोर कुत्सित अगर निर्बुद्ध मनुष्य असला, तरी तितक्याच मोकळेपणाने आणि तितक्याच उत्कटतेने बोलत. तर हे उत्तरोक्त वर्गातील लोक मंदमति आणि कुत्सित लोकांकरिता तयार केलेले उपरोधास्त्र सर्रास सर्वांवर सोडतात. त्यांच्या या सवयीचें मूळ कदाचित् त्यांना त्यापूर्वी भेटलेल्या श्रोतृवर्गांत असेल. पण श्रोत्याच्या वृत्तीप्रमाणे आणि कुवतीप्रमाणे ज्याच्या संभाषणपद्धतींत बदल होत नाही, त्याची पद्धति मी जीवन्त पद्धति समजत नाही.

आणखी एक पद्धति म्हणजे ' अतिसावध ' संभाषण पद्धति ! या पद्धतीचे भोक्ते मत देतांना घाबरतील, स्तुति करतांना घाबरतील, साधें विधान करतांना सुद्धा घाबरतील. समजा, त्यांना असें म्हणायचें आहे की, " गटेचें आत्मचरित्र किंवा रोमाँ रोलाँ चे ' आय विल् नॉट रेस्ट् ' किंवा मॉरिस् हिंडस् एखादें पुस्तक...मी परवा वाचलें व तें मला फारच

आवडलें..." तर एकदम ते तसें म्हणून मोकळे होणार नाहीत; ते खाली मान घालून चोरट्या नजरेने तुमची चर्या न्याहाळीत म्हणतील "आपण रोमाँ रोलाँचें 'ऑय् विल् नॉट रेस्ट्' वाचलें असेलच." आणि समजा, तुम्ही तें वाचलें असलें, तर त्यांचा रोमाँ रोलाँविषयीचा उत्साह आणखी पन्नास टक्के कमी होईल! आणि तुम्ही वाचलें आहे कीं नाही याची आधी चौकशी करून ठेवण्यांत तरी जिला मी 'घाबरट-पणाची मनोवृत्ति' म्हणतों तीच असते. आपण एखाद्याचें मोठें कौतुक करायला जावें आणि लोकांना ती नवीन नसावी, मग त्यांत आपलें काय राहिलें?

आपण दुसऱ्याच्या हास्याचा अगर अनुकंपेचा विषय होऊं नये ही एकमेव काळजी वाहतां वाहतां, या मंडळींच्या जवळ जी काय अल्पस्वल्प उत्कटता आणि सहजता असेल तीहि कोळपून जाते. त्यांचें बोलणें म्हणजे भांडून अबोला धरलेल्या नवराबायकोंनी, अथवा नुकतेंच सुतक आलेल्या भावांनी वेळ घालविण्याकरिता मांडलेल्या बुद्धिबळाच्या डावा-सारखें असतें! डोक्यास शीण होऊन पुनः खेळाचा आनंद नाही तो नाहीच!

अशा प्रकारचा सावधपणा अधिकारारूढ लोक, सार्वजनिक पुढारी वगैरेंना भिन्न हितसंबंधाच्या लोकांशीं बोलतांना दाखविणें जरूर असतें; पण साध्या खेळीमेळीच्या बैठकींतहि जे लोक इतके जपून बोलतात, त्यांच्यापासून कोणाला कधी आनंद मिळत असेलसें मला नाही वाटत. शेक्सपियरच्या शब्दांत थोडा फरक करून सांगायचें झाल्यास मी "They would weep on their wedding day" असें म्हणेन!

संभाषणांत मोकळेपणा व उत्कटपणा यांना मी पाहिलें स्थान देतों.

पण याचा अर्थ जे भडाभडा एकसारखें बोलत राहतात, त्यांची संभाषण–पद्धति मला मान्य आहे असा नव्हे. कारण एक गोष्ट मला सांगितली पाहिजे. एकसारखें बोलून श्रोत्याला गुदमरवून टाकणाऱ्या मंडळींच्या जवळ मोकळेपणा आणि उत्कटपणा असतोच असें नाही. वर वर्णिलेल्या 'सावध-पद्धतींत' प्रतिपक्षाची मात न होऊं देण्याबद्दल जी 'परेशानी' असते तीच या 'धबधबा पद्धतीं'त असते.

कधी कधी केवळ तारतम्याच्या अभावामुळेहि हा अतिरेक होतो. अर्थात् उत्कटतेच्या खालोखाल तारतम्य व चातुर्य यांना महत्त्व आहे. तारतम्याच्या अभावामुळे अथवा अनजानपणामुळे, भाषणातिक्रमण कारणारांत, तरुण मंडळींची संख्या अधिक असते. एखादे वेळीं ही मंडळी एखाद्या माणसाबद्दल आदर दाखविण्याकरिता म्हणून भेटीला जातात आणि त्याचें मत आपल्यासंबंधी चांगलें व्हावें, त्याला आपली बुद्धिमत्ता दिसावी, म्हणून त्याच्यावर भाषणाची सरबत्ती सुरू करतात. यांत तारतम्याभावामुळे एकच चूक झालेली असते. ती ही की, बोलण्यापेक्षाहि ऐकण्यांत कित्येकदा अधिक बुद्धिमत्ता दिसून येते, हें ही मंडळी लक्षांत घेत नाहीत! विशेषतः आपल्याहून अधिक बुद्धिमान् आणि ज्ञानवान् मनुष्याकडे गेल्यानंतर, आपल्या भाषणाने त्यास आपली बुद्धिमत्ता दाखविण्यापेक्षा, आपल्या श्रवण-पद्धतीने ती दाखविणेंच अधिक सोपें व श्रेयस्कर असतें.

कारण ऐकण्याची कला ही बोलण्याच्या कलेइतकीच महत्त्वाची आहे. आणि या दोन कला परस्परावलंबी तर आहेतच! ऐकण्याची कला नाहीशी झाल्यास, बोलण्याची कला टिकणें शक्य नाही. माझ्याकडे माझे चाहते म्हणून आलेल्या कांही लेखकलेखिकांना ऐकण्याच्या कलेचें महत्त्व मला ऐकवावें लागलें आहे. बिचारे बुद्धिमान् आणि सज्जन होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.......... वि: ..........
.......... नों: दि: ..........


त्यांना माझा परिचय आणि माझें भाषण हवें होतें, म्हणून तर ते मुद्दाम ओळख करून घेऊन आले होते! पण उत्साहाच्या भरांत ते आपल्या आगमनाचा हेतूच विसरून गेल्यासारखे दिसले!

पण मला त्या मंडळींनी दिलेला मोठेपणा कदाचित् काल्पनिकहि असेल; आणि ऐकण्याची कला अंगीं नसल्याने माझ्या बैठकींत त्यांचें कदाचित् तितकेसें नुकसान झालेंहि नसेल. पण ऐकण्याची कला अलीकडे लुप्त होत चालली आहे हें मला पुण्यांतील एका प्रख्यात पंडिताच्या बैठकींतील अनुभवावरूनहि अनुभवास आलें. मी माझ्या एका विनोदी मित्राला एकदा गमतीने म्हटलेंहि होतें की, "दोन लुप्तप्राय कला" या विषयावर मी एकदा लिहिणार आहे. तो म्हणाला, "त्या कोणत्या?" "The art of listenig and the art of blushing: ऐकण्याची कला नाही म्हणून तरुण पुरुष ज्ञानाला मुकत आहेत आणि तरुणस्त्रिया सहजलभ्य अशा मोहकतेला मुकतआहे त!"

मी केवळ गंमत म्हणून बोललों असेन पण या दोहोंतहि साधारण-धर्म विनयाचा आहे. त्याच्या अभावामुळे आजच्या कित्येक तरुणांना आपल्याहून अधिक योग्यतेच्या व आपल्याहून वेगळ्या पिढींतील व्यक्तींकडून ज्ञानलाभ करून घेतां येत नाही, हें मी वर निर्देशिलेल्या पंडिताच्या बैठकींतच पाहिलें आहे. ज्याच्याशीं संभाषण केल्यास आजच्या पिढींत नाणावलेल्या विद्वानांसहि ज्ञानाचा लाभ होईल, त्याच्या-कडे अर्धेकच्चे तरुण येऊन श्रवणापूर्वीच खंडनास सुरुवात करतात व ज्ञानलाभास मुकतात, तेव्हा मला त्यांची कीव येते!

पण विनय आणि लज्जा यांचा केवळ अभिनय करून चालणार नाही. विनय म्हणजे मनाचा ताजेपणा, कोवळेपणा होय. तो अल्पवयस्कांत स्वभावतःच असतो. व्यक्तींचा आणि सृष्टीचा मोठेपणा पाहून आपल्या

कोवळ्या वयांत आपण मुग्ध आणि स्तिमित होतों. पण थोडें फार सज्ञान होतांच आपलें मन खुंटल्यासारखें व निब्बर बनतें. पण वस्तुतः तें तसें होण्याचें कांहीच कारण नाही. आपण वयाने वाढलों अगर शरीराने निब्बर झालों तरी महापुरुषांपुढे आणि महान् सत्यांपुढे आपण बालकच नसतों काय ? ही बालवृत्ति टिकविणें हेंच ज्ञानार्जनाचेंहि रहस्य होय; व स्नेहार्जनाचेंहि रहस्य होय. आजकाल अज्ञानवयांतच मनाने निबर झालेले तरुण आणि स्त्रीजन्माला येऊनहि पुरुषी आव आणणाऱ्या तरुणी यांचा जमाना आला आहे कीं काय असें वाटतें. या मानसिक ' निब्बर-पणामुळे ' ज्ञानाचीहि हानि होते आणि सौंदर्याचीहि हानि होते !

लज्जेचा आणि सौंदर्याचा विषय निघाल्यावर स्त्रियांमधील संभाषण-कौशल्यासंबंधी लिहिणें अपरिहार्यच आहे. सर्वसाधारण म्हणून सांगायचें झाल्यास स्त्रिया बोलण्यांत चतुर असतात — नव्हे, पटाईट असतात, हें कोणालाहि कबूल करावें लागेल. 'बायका' या माझ्या पुस्तकांतील 'बायका' या लेखांत, स्त्रियांचा हा गुण सांगितलाहि आहे. ज्या प्रख्यात पुरुषांच्या संभाषणपटुत्वाचा मी उल्लेख केला, त्यांच्या वर्गांत स्त्रियांना घालतां येणार नाही. ज्यांना इंग्रज लेखक Conversationalist म्हणून म्हणतात त्यांच्या बोलण्यांत बहुश्रुतता, चातुर्य, बुद्धिवैभव वगैरे गुणांसच महत्त्व असतें. पण स्त्रियांचें ' वाक्पाटव ' व्यावहारिक आणि मर्यादित क्षेत्रांत अधिक अनुभवास येतें. जेव्हा निश्चित विषय नसल्या-मुळे पृथ्वीच्या पाठीवरील कोणताहि विषय निघतो, अशा बैठकींत स्त्रिया पुरुषांपुढे टिकाव धरणार नाहीत. परंतु कौटुंबिक बैठकींत एखाद्या नियोजित समारंभाची चर्चा असूं द्या; नाही तर एखाद्या ऋणानुबंधी कुटुंबांतील नवराबायकोच्या तंट्यासंबंधीचा न्यायनिवाडा असूं द्या; नाही तर एखाद्या बहकलेल्या मैत्रिणीचा इतिहास निघूं द्या; — स्त्रिया

अस्खलितपणें वक्तृत्व करतील. त्या बोलण्यांत ओघ आढळेल, आत्मविश्वास आढळेल, आवेश आढळेल, अस्सल मराठीचा नमुना आढळेल.

शहाण्या स्त्रिया आपल्या वाक्चातुर्याचें क्षेत्र ओळखतात व त्याबाहेरचें विषय निघतांच मुग्ध आणि चकित अशा श्रोत्यांची भूमिका वठवून बलवान् प्रतिस्पर्ध्यालाहि अंकित करतात. तर उलट कित्येक स्त्रिया सर्वच क्षेत्रांत सारख्याच आत्मविश्वासाने आणि आवेशाने बोलण्याच्या भरीला पडतात आणि फसतात !

पण, ज्याला बौद्धिक संवाद म्हणतां येईल, अशा प्रकारचा संवाद आपल्याकडील विद्वान् गणल्या जाणाऱ्या लोकांच्याहि बैठकींत नांवापुरताच मिळतो. अर्थात् कोणी मुद्दाम ‘ विद्वान् ’ म्हणूनच त्यांची भेट घेण्याकरतां गेलें तर बौद्धिक विषय निघतील; किंबहुना ते, ते विषय मुद्दाम काढतील. परंतु एक तर त्यांचें बोलणें पुस्तकांकडे तरी वळेल, नाही तर ते मुद्दाम बौद्धिक वातावरण टिकवीत आहेत असें तरी वाटेल. व म्हणूनच पटवर्धन, तांबे यांच्या बोलण्याची महति मला विशेष वाटते. त्यांच्या संभाषणासारख्या संभाषणाचा लाभ मिळण्यास मनुष्य केवळ बुद्धिमान् असून चालत नाही, तर बौद्धिक व्यापारास त्याच्या जीवनांत पहिलें स्थान असावें लागतें. इतर बुद्धिमन्तांच्या बोलण्याची गत काय होते हें मी सांगितलेंच आहे.

बौद्धिक विचारविनिमयहि नसेल आणि कांही व्यावहारिक वाटाघाटहि नसेल तर बैठक रंगविण्यास हमखास हजर होणारे विषय म्हणजे लोकापवाद आणि विनोद. विनोद सर्वांसच साधतो असें नाही आणि तरी ज्यांना विनोद साधत नाही ते विनोदाचा नाद सोडतात असेंहि नाही. त्यामुळे तर संभाषणांत विनोदाचें स्थान फार महत्त्वाचें ठरतें. वस्तुतः ही

गोष्ट जितकी दुःसाध्य आहे तितकीच सुसाध्यहि आहे. सर्वांनींच बुद्धिप्रधान आणि पुस्तकी विनोदाची हाव कां धरावी? आनंदाच्या आणि गमतीच्या लहरींत असल्यास साधीं माणसेंहि सुंदर विनोद करून जातात; तर उलट मनांत आनंद नसतां ओढून आणि उकरून विनोद करणाऱ्या बुद्धिमन्तांची कीव येते!

विनोद करण्याची सर्वांत निकृष्ट पद्धति तुम्हांस माहीत आहे काय? नसल्यास ऐका. दैनिक आणि साप्ताहिक टाइम्समधील वाचलेला विनोद फिरून एकदा जबरदस्तीने भर बैठकींत श्रोत्यांना ऐकविणें!

संभाषणांत हमखास येणारा, राहतां राहिला विषय म्हणजे लोकापवाद-ऊर्फ स्कँडल्स्! लोकांच्या भानगडींसंबंधी कधीहि बोलूं नये हा नियम सांगण्याइतका मी भोंदूहि नाही, कीं तो पाळण्याइतका मी साधूहि नाही. मनुष्यस्वभाव हा सर्वत्र व सर्वकाळ सारखाच असणार! रहस्या-विषयी कुतूहल हा आपणां सर्वांचा स्वभावच असतो. आणि तरीहि त्या कुतूहलांतहि सरस–नीरस नसतेंच असें नाही. लोकापवादासंबंधी मनुष्य ज्या वृत्तीने बोलतो त्यावरून त्याचा स्वभाव ओळखतां येतो. कित्येक माणसें लोकांच्या गौरवासंबंधी अत्यंत चिकित्सेखोर आणि शंकित अशीं असतात; तर उलट लोकापवाद म्हटला की त्यांचीच आस्तिक्य बुद्धि आणि श्रद्धा जागृत होते! तसेंच दर बैठकींत एक तरी पहिल्या प्रतीचा लोकापवाद सांगतां आला नाही, तर दिवस वाया गेला असें ते समजतात. ही विकृत वृत्ति सोडल्यास, लोकापवादास संभाषणांत स्थान आहे व राहणारहि हें कबूल केलें पाहिजे. मीं असे एकदोन पट्टीचे बोलणारे पाहिले आहेत–ते प्रख्यात साहित्यिक आहेत–की, जे ओळीने दोनदोन तीनतीन तास प्रख्यात व्यक्तींची कुलंगडी, विश्वास बसलाच पाहिजे इतक्या 'दस्तऐवजी' पुराव्यानिशी पुरवूं शकतात!

ऐकण्याच्या कलेचें माहात्म्य मी वर वर्णन केलेलें आहे; पण " न ऐकण्याची " म्हणूनहि एक कला आहे असें मला वाटतें; व तिचा उपयोग मी अशा प्रसंगीं करतों.

संभाषणपटु म्हणून अशा मंडळींची ख्याति झालेलीहि मी पाहिली आहे. उत्कट आणि बौद्धिक संभाषण आपल्याकडे दुर्मिळ; आणि अशा संभाषणाचे भोक्ते तर त्याहूनहि दुर्मिळ — आणि म्हणूनच माधवराव-तांबे यांच्या संभाषणकलेची आठवण मला विशेषच होते !

८

# कंटाळा

माझ्या आजच्या विषयाचा वाचकांना प्रथमदर्शनीं बोध होणार नाही. विवेचनाचा कांही भाग वाचल्यावरहि कदाचित कांही वेळ या विषयासंबंधी आकर्षण वाटणार नाही; " कंटाळा " येईल ! पण तसें झाल्यास लेखकाला तें हवेंच आहे, हें प्रारंभींच सांगून ठेवणें बरें.

कारण वाङ्मयापासून शालेय शिक्षणापर्यंत, दैनिक गृह्य कार्यक्रमापासून तें प्रवासादि नैमित्तिक कार्यक्रमापर्यंत सर्वत्र, आपणां आधुनिक मानवांना नावीन्य, प्रक्षोभत्व आणि उद्दीपकत्व यांची अनावर तहान लागून राहिलेली असते. आपल्या या नावीन्यतृष्णेचा अनिष्ट परिणाम आपल्या कलेवर, वाङ्मयावर, शिक्षणपद्धतीवर, सार्वजनिक वक्तृत्वावर सर्वांवरच झाला आहे व नित्य अधिकाधिक होत आहे. कादंबरींत हरिभाऊंच्या सारखीं दीर्घ वर्णनें नकोत, व्याख्यानांत गंभीर प्रस्तावना नको,

लेखांत "एकदा मी माझ्या मित्राकडे" यासारख्या चिमणी-कावळ्याच्या सुरुवातीखेरीज दुसरी सुरुवात नको! फार काय? पुस्तकावर हाताला जणू लुसलशीत त्वचेचा स्पर्श होत आहे, असें भासविणारी तिरंगी कामुक स्त्री–शरीराकृति नसेल, तर आम्हांला तें पुस्तक हातांत घ्यायला नको! कारण तें पुस्तक न जाणो गंभीर व कंटाळवाणें असेल!

सारांश, आपली स्थिति सदैव तोंडांत चॉकोलेट चघळणाऱ्या लाडावलेल्या रडव्या पोरासारखी झाली आहे. प्रारंभापासून उथळ उद्दीपन असल्याखेरीज करमणुकीचा पदार्थहि हातीं घेणें आपल्या जिवावर येतें. धावपळीखेरीज दिवस घालविणें आपल्याला जड जातें.

ज्यांत भडकपणा नाही, नावीन्य नाही, उद्दीपकता नाही तो पदार्थ अगर कार्यक्रम आपणा शहरवासीयांना अधिकाधिक अप्रिय, नव्हे, असह्य होत चालला आहे.

या उलट जुन्या काळच्या लोकांची स्थिति पाहा. फार कशाला, आजच्या काळांतहि खेड्यांतील लोकांची स्थिति पाहा. वर्षावर्षांत नाटकसिनेमा नाही, दैनिक वृत्तपत्राचें दर्शन नाही, सभासम्मेलनें नाहीत, की त्यांच्या निमित्ताने बाहेरच्या प्रसिद्ध व्यक्तींचें दर्शन नाही. तेच ते चेहरे, तेच ते उद्योग, आणि वर्षसहा महिन्यांनी येणारे तेच ते प्रायः धार्मिक उत्सव! पाणवठ्यावर किंवा गावांतील एकुलत्या एका देवळांत, सकाळीं संध्याकाळीं त्याच त्या माणसांच्या भेटी व्हायच्या, त्याच त्या सामान्य घरगुती बातम्यांची देवघेव व्हायची. पोषाख, चालचलणूकहि वडील-माणसांच्या भीतीने तीच ती ठेवण्याची पराकाष्ठा व्हायची! अशा मंद आणि मेलेल्या वस्तींत खून, मारामारी, स्त्रियांचें अपहरण यांच्या निमित्तानेच काय तें बोलायला तरी चटकदार विषय मिळायचे! एरव्ही, "आमच्या सोयऱ्याच्याकडे उद्या पक्ष आहे" "बंडोपंताची बगडी

शोधा (स्थळ प्रत)



बाळंतीण झाली म्हणे!" "काल रात्रीं दोनच्या पुढे पावसाचे चार शिंतोडे पडले, तेव्हा तुम्ही जागे होतां का?"... या पलीकडे बोलायला विषयच नसणार! खेड्यांतील स्त्रियांची स्थिति तर आपणाला याहूनहि असह्य भासेल. एका तरुण गृहिणीला दुसऱ्या तरुण गृहिणीच्या घरीं तांदूळ निवडण्याच्या किंवा पोहे कांडण्याच्या निमित्ताने जायला सापडलें, तर मुकादमाचा डोळा चुकवून तंबाखू खायला सापडलेल्या येरवडेकरा-इतका आनंद होतो! आणि अशी चोरटी संधि साधून कुठल्या तरी पडक्या वाड्याच्या मागील चौकांतील पडवींत तासन्तास हलक्या आवाजाने बोलत बसणें, यांत तरी 'सेन्सेशन्' तें काय? शहरांतील स्त्रीला तें जीवन चार दिवसहि साहवणार नाही!

सामान्यतः आपण आधुनिक शहरवासी लोक खेड्यांतील लोकांची कींव करतों. जुन्या पिढ्यांचीहि कीव करतों.

आपण आधुनिक जीवनांत नावीन्य व चटकदारपणा आणला आहे याबद्दल अभिमान बाळगायचा असला, तर खुशाल बाळगावा; परंतु जुन्या लोकांची कींव करण्यापूर्वी मात्र आपण पुरता विचार केलेला बरा. कारण आपल्या चटकदार राहणीने आपण कदाचित् मानसिक दृष्ट्या दुबळे व परावलंबी झालेले असूं, तर उलट कंटाळवाण्या राहणीने जुने लोक अधिक चिवट व दमदार राहिले असतील. कांहीहि न करतां, कांहीहि न घडतां, कोणींहि नवें न भेटतां, कोणतीहि भडक बातमी वाचायला न सापडतां, आपण शहरवासी लोक एक आठवडाभर राहूं शकलों तर,... 'आत्मिक' हा शब्द मी तूर्त मुद्दाम टाळतों!...आपले मानसिक व शारीरिक बल वाढलेलें असेल. प्रथम कांही दिवस आपणांस कसेंसेंच वाटेल, आणि असा एक महिना काढावा लागेल असें अगाऊ कळलें, तर आपण निम्मे भीतीने मरूं आणि निम्मे त्या एकान्तवासाची

तरतूद करण्याची धडपड करून मरूं, पण प्रत्यक्ष तसा काळ काढल्यानंतर मात्र आपलें बळ वाढलेलें आढळून येईल.

मी माझा एक वैयक्तिक अनुभव सांगतों. महात्मा गांधींच्या खुनानंतर पुण्यांत अचानक कर्फ्यू ऑर्डर जारी करण्यांत आली व ती ओळीने बहात्तर तास टिकणार असें कळलें. नाटक, सिनेमा, सभा, व्याख्यानें तर राहोतच, पण दैनिक वृत्तपत्राचेंहि दर्शन नाही. एक रस्ता ओलांडून समोरच दिसणाऱ्या उपाहारगृहांतील चहा घेणेंहि नाही. हा हुकूम आधी आठ दिवस जाहीर झाला असता, तर तरतूद आणि साठवण करतां करतांच माणसें घामाघूम झालीं असतीं. परंतु प्रत्यक्ष नाकेबंदी झाल्यावर बहात्तर तास हात जोडून बसणें केवळ शक्य झालें, इतकेंच नव्हे, तर त्या तीन दिवसांनंतर माणसें अधिक ताजीतवानीं दिसत होतीं. कारण आपणांलाहि चहाशिवाय राहणें शक्य आहे, हें अनेक चहाबाजांना आढळून आलें होतें! रात्रीं नऊ वाजतां झोपलें तरी आपल्याला झोप लागूं शकेल, हें झोपेची कुरकुर करणारांना कळून आलें होतें! इतकेंच काय, पण दोन दिवस ओळीने व सक्तीने कंटाळवाणें घालविल्यास आपल्याला तिसऱ्या दिवशीं अधिक टवटवी वाटते, हेंहि आढळून आलें होतें!

आधुनिक काळांत आपण आकर्षणाचीं म्हणून काढलेलीं साधनें सुखांत भर घालणारीं नसून करमणुकींत भर घालणारीं आहेत.

सुख आणि करमणूक, नैसर्गिक आनंदाचा लाभ, आणि वेळ घालविण्याकरिता काढलेलीं अस्वाभाविक व अनावश्यक साधनें, यांत आपण फरक केला पाहिजे. आधुनिक जीवनांत आपण खऱ्या सुखाची भर फारच थोडी घातली आहे. उलट शारीरिक उद्दीपन आणि क्षणिक आत्मविस्मृति यांच्या युक्त्याच फार काढलेल्या आहेत. व त्यामुळे

मादक पदार्थांची चटक लागलेला मनुष्य जसा हळूहळू दुबळा व परावलंबी होत जातो, तसे आपण दुबळे होत चाललों आहों. तसेंच, आपली उद्दीपित होण्याची शक्तीहि हळूहळू कमी होत चालली आहे. दहा आण्यांचें तिकिट काढतांच पडद्यावर पाहायला मिळणाऱ्या शृंगार-चेष्टा; एक आण्याचें वृत्तपत्र घेतांच ठळक ठशांत वाचायला मिळणाऱ्या खाजगी खुनाच्या व आंतरराष्ट्रीय कत्तलींच्या वार्ता; रस्त्यांत पाऊल टाकतांच पाहावयाला सापडणारे नटवे आणि फॅशनेबल स्त्री–पुरुष; अहोरात्र ऐकूं येणारा रेडिओ; सजवून सज्ज ठेवलेला सार्वजनिक बगीचा, या सर्वांच्या सुलभ सान्निध्यांतहि आपण जांभया देऊं शकतों! आणि यांच्यापासून दूर एक दिवस काढायचा म्हटला कीं आपल्या अंगावर काटा येतो.

शिकागोमधील एखाद्या अट्टल गुन्हेगाराने– " करमेना, दिवस कांही केल्या जाईना, म्हणून मी ही धाडसी घरफोडी करायचें ठरविलें " अशी कैफियत दिली आहे कीं नाही माझ्या स्मरणांत नाही. परंतु गुन्ह्याच्या बातम्या चवीने वाचणाऱ्या कित्येक वाचकांच्या संग्रहीं अशीहि एखादी ' केस ' असणें अशक्य नाही. मोठे गुन्हे सोडले, तरी छोटे गुन्हे तरी वेळ घालविण्याकरतां होतात यांत शंका नाही. स्वतःसंबंधीं बडबड व स्वतःखेरीज सर्वांची, शत्रु-मित्र असा भेदभाव न धरतां, निंदा हा कार्यक्रम तरी मला वाटतें, ' कंटाळ्या 'च्या धास्तीमुळेच बहुतेक ' सभ्य ' लोक हातीं घेतात. त्यांतील परनिंदेला ' गुन्हा ' असें नांव देण्याबद्दल देखील कित्येक वाचक मला हसतील. अन् स्वतःसंबंधी बडबडींत तर कोणालाच पाप दिसणार नाही. पण " फुकाचे मुखीं बोलतां काय वाचें। दिसंदीस अभ्यन्तरीं गर्व साचे। " हें समर्थांचें वचन आपणांला विसरतां येणार नाहीं.

पाप असो कीं नसो, वाचाळता ही बहुधा वेळ व कंटाळा घालविण्याचें साधन म्हणूनच आपण पत्करतों.

बारीकसारीक व्यसनें, हीं तर उघड उघड कंटाळा घालविण्याकरिताच असतात.

वस्तुतः साध्या सुपारीइतका निरुपयोगी पदार्थ दुसरा कोणता असेल? बिचारींत ना रस ना गीर! ती धड ना आंबट ना गोड! पण आजच्या भडक करमणुकी ज्या काळीं नव्हत्या, त्या काळांत सामान्य माणसाला बिचारीचा केवढा आधार असे? ओसाड खेड्यांतील पिढीजाद पडक्या वाड्याच्या भकास दिवाणखान्यांत बसलेला एखादा खेडवळ इनामदार, तिसऱ्या प्रहरची वामकुक्षी संपल्यापासून रात्रीं नवाला पानावर बसेपर्यंतचा वेळ कसा काढावा या चिंतेने परेशान असे! तोंच, त्याला त्याच्या चंचीचें स्मरण होई; आणि सुपारी काढून ती कातरायला सुरुवात करण्यापासूनच त्याचा 'वेळ जायला' सुरुवात होई. त्यांतच दुसरा एखादा चंचीवाला घटका दोन घटकांनी त्याच्या वाड्याकडे वळला, तर मग काय, आधुनिक मुंबईकराला नवें 'पिक्चर' लागल्यावर 'वेळ जाण्या'ची जितकी हमी वाटते, तितकी त्याला वाटे! मला तर कधी कधी असें वाटतें की, इतकी लहान, इतकी रुक्ष, आणि इतकी कठीण अशी ही वस्तु, माणसाला कठीण प्रसंगीं केवढा आधार देते, हें पाहूनच आपल्या पूर्वजांनी तिला धार्मिक विधींत देवाचेंच काय, पण अर्धांगीचेंहि स्थान घेण्याचा खास अधिकार दिला!

पान, सुपारी, तंबाखू, विडी, सिगारेट, वायफळ वाचाळता, या सर्व गोष्टींचा जन्म तर उघड उघड वेळाचें व 'कंटाळ्याचें ओझें हलकें करण्याकरिताच आहे. पण त्याहून अधिक निंद्य ठरलेल्या व उघड पापांत अगर गुन्ह्यांत मोडणाऱ्याहि कित्येक गोष्टींचा जन्म 'वेळ न

...२९.... दि: ...फेब्रु...
१४२७ ... नों दि. २४।७।६३.



जाण्या 'च्या या धास्तींतच आहे. पुष्कळसें 'फ्लर्टिंग' ( लघाळपणा ); बरीचशी स्त्रीपुरुषविषयक असभ्यता; कित्येक विनयभंगहि, निरुद्योगी आणि भकास मनःस्थितींतूनच जन्म पावतात. हेंच सत्य ' रिकाम्या मनांत सैतान मुक्कामाला येतो ' या अर्थाच्या इंग्रजी म्हणींत ग्रथित झालेलें आहे. माणसांच्या मनांत 'कलि' केव्हा प्रवेश करतो व त्यांत केवढा धोका असतो, या प्रश्नाशीं मला आज या लेखापुरतें तरी, कांही कर्तव्य नाही. शांत, स्तब्ध, प्रक्षोभशून्य जीवन घालविणें माणसाला किती जड जातें, व त्या स्तब्धतेची असह्यता कमी करण्याकरिता तो भयंकर गोष्टी देखील कशा पत्करतो, एवढेंच मला इथे पाहायचें आहे! ज्या कॉलेजमधील शिक्षणाचा सर्वंच तरुणांना एवढा लोभ वाटतो, जें न मिळाल्यास ते स्वतःला दुर्दैवी समजतात, व तें ज्याला मिळालें असेल त्याचा हेवा करतात, त्या शिक्षणामधील देखील मिळमिळींत स्तब्ध भागाचा त्यांना असह्य 'कंटाळा' येतो. दोन महत्त्वाच्या तासांच्या दरम्यानची पांच मिनिटें; वाचनालयांत वाचीत असतांनाचा शांत वेळ; फार काय आपला विषय अत्यंत आकर्षक करणाऱ्या प्रोफेसरांच्या तासांतीलहि मधलींच चार दोन मिनिटें त्यांना इतकीं असह्य होतात, की त्यांच्यांतील कांही उच्छृंखल जीव तारुण्यांतील प्रमुख वृत्तीला खाद्य शोधूं लागतात!

वर्गातील मुलींची असभ्य चेष्टा करण्याचे मूळहि कंटाळ्यांतच आहे. अर्थात् जीं मुलें स्वतः उच्छृंखल नाहीत, व ज्या मुली स्वतः शालीन व सभ्य आहेत, त्यांनाहि आपला सभ्यतेचा बाणा न सोडतां वैचित्र्य लाभल्याबद्दल मनांतून हलकें वाटत असेल कीं काय कोण जाणें!

संथ आणि रुक्ष भासणाऱ्या चोवीस तासांच्या दिवसांत, अशा सौम्य पापांनी वैचित्र्य आणणाऱ्या व्रात्य माणसांना आपण चलाख व चेष्टेखोर म्हणतों.

अन् जोंपर्यंत त्यांच्या चेष्टा व युक्त्या सौम्य आहेत, तोंपर्यंत आपण त्यांची गणना क्षम्य करमणुकींत अथवा सुपारीसारख्या निरुपद्रवी व्यसनांत करतों.

पण प्रक्षोभाची भूक ही अफूच्या किंवा दारूच्या तलफेसारखी असते. जितकी भागवावी, तितकी ती वाढतच जाते. निदान प्रक्षोभाखेरीज जीवन घालविणें अधिकाधिक असह्य होतें.

अधिक रग आणि उत्साह असलेलीं माणसें प्रक्षोभाचे अधिकाधिक धाडसी प्रयोग करून पाहतात. मोठीं व्यसनें, मोठी वैषयिकता, व मोठीं पातकें यांचा आसरा पुष्कळदा अशाच लोकांकडून व केवळ वेळ घालविण्याकरतांच घेतला जातो. या साध्या दिसणाऱ्या आधुनिक संकटाचा विचार करतांना रसेल् यांनी प्राचीन मानवाच्या जीवनांत मृगयेला केवढें महत्त्वाचें स्थान होतें हें दाखवून दिलें आहे. तसेंच कंटाळा घालविण्याला केवळ सुखद गोष्टींचाच उपयोग होतो असें नव्हे, तर अत्यंत तापदायक गोष्टींचाहि उपयोग हमखास होतो, हेंहि कांही प्रक्षोभक उदाहरणांनी दाखवून दिलें आहे. फाशी जातांना कोणीहि मनुष्य जांभई देतांना आढळणार नाही! ( आणि आढळला तर त्याचा बेडरपणा असाधारण असला पाहिजे ! ) पार्लमेंटमध्ये निवडून गेल्यावर पहिलेंच भाषण करणाऱ्या सभासदाच्या मनावर त्या प्रसंगाच्या महत्त्वाचा एवढा ताण असेल की, तो जांभई देणें शक्य नाही. ( पण अशा अपूर्व उत्कंठेच्या प्रसंगींहि इंग्लंडमधील एक लॉर्ड थंडपणें जांभई देऊं शकल्याचें नमूद आहे ! अर्थात् या स्थितप्रज्ञतेबद्दल इंग्लंडच्या त्या खानदानी प्रतिनिधिसभेने त्या लॉर्डसाहेबांचें कौतुक केलें ! )

'कंटाळा' या मनोविकाराची ही बाजू लक्षांत घेतली असतां, ज्या काळांत आधुनिक शहरी करमणुकी नव्हत्या, त्या काळांत या प्रबल मानवी

रोगाचें दमन तत्कालीन रानटी परिस्थितीच बरेचसें करीत असेल हें उघड आहे. स्वस्थतेच्या काळीं आधुनिक शहरांतील भरवस्तींत, रात्र करमणुकीअभावीं जितकी असह्य होईल, तितकी जुन्या काळीं खेड्यांत होणें शक्य नव्हतें. कारण अंथरुणांत अंगाला कांही गार लागतांच सापाचें चित्र डोळ्यापुढें उभें राही; तर मांजराने खडबड केली तरीहि लगेच नुकत्याच पडलेल्या दरोड्यांतील फरशी कुऱ्हाड डोळ्यांसमोर उभी राही! सारांश, त्या काळीं रात्र घालविणें ही एक संथ आणि मिळमिळीत गोष्ट नसून, मनाला ताण पाडणारी गोष्ट होती; तर कोणताहि बरावाईट प्रकार ( Incident ) न होतां रात्र पार पडणें ही एकमेकांचें अभिनंदन करण्याची गोष्ट होती! व म्हणूनच मला वाटतें, जुन्या काळांत रात्रीपेक्षा दिवसच अधिक कंटाळवाणे जात असतील.

तथापि मृगयेची सार्वत्रिकता, आणि नैसर्गिक संकटांनी वेढलेलें दैनंदिन जीवन, या दोन कारणांमुळे प्राचीन मानवी जीवन कितीहि रोमांचकारी असलें, तरी स्त्रीपुरुषांच्या वाट्याला-विशेषतः स्त्रियांच्या वाट्याला–वैचित्र्यशून्य दिनक्रम बऱ्याच मोठ्या प्रमाणांत येत असला पाहिजे.

आर्वाचीन काळांत जिला आपण सुखसोयींची समृद्धि म्हणून म्हणतों, तिच्यामुळेच आपणाला ऐत्या, घरबसल्या मिळणाऱ्या वैचित्र्यांची वाजवीपेक्षा फाजील सवय होऊन बसली आहे. व त्या सवयीमुळेच वैचित्र्यहीन, प्रक्षोभहीन, नावीन्यशून्य अशा स्थितींत चार दिवसच काय, पण चार तास घालविणेंहि आपल्याला प्राणसंकट होऊन बसलें आहे.

नेहमीच्या रविवारच्या जोडीला एकच दिवसाची सुटी आली, तरी मुंबईकरांची किती धावपळ उडते हें पाहण्यासारखें आहे. त्या दिवशीं

अंधेरीला राहणारे लोक कल्याणच्या मित्रांकडे जाण्याच्या तयारींत असतील, तर डोंबिवलीला राहणारें जोडपें चेंबूरला जायला निघालेलें आढळेल. कित्येक जण तर त्या दोन दिवसांच्या 'रजेंत' पुण्याला जाऊन येतील. आणि या सर्व धावपळींत कोणत्याहि आकस्मिक कारणाने, विशेषतः एखादा नावडता पाहुणा येत असल्याचें पत्र आल्याने, खीळ पडल्यास, त्यांना ते रजेचे दोन दिवस, दोन वर्षांच्या सजेचे दिवस वाटल्याखेरीज राहणार नाहीत.

आपण युरोप-अमेरिकेंतील उत्साही व उल्हासी लोकांचीं वर्णनें तिकडील यात्रा करून आलेल्या आपल्या बांधवांकडून ऐकतों. ते लोक म्हणे, दीड दिवसाची साप्ताहिक सुटी समुद्रकाठच्या गावीं मजेंत घालविण्याची तयारी आठआठ दिवस खपून करीत असतात! एक दिवस मजा करण्यारतां आठ दिवस खपण्यांत 'मजा' ती काय, हा प्रश्न वेगळा. या कष्टसाध्य सुखाच्या बाबतींत मला आमच्या या मेहनती सुखवाद्यांशीं वाद घालावयाचा नाही. पण मला या सर्व जीवनक्रमांत जो मुख्य धोका वाटत आला आहे, तोच धोका बर्ट्रांण्ड रसेलसारख्या जडवादाच्या व बहिर्मुखतेच्या कट्टया भोक्त्यालाहि वाटत आहे, हें पाहूनच हे चार अ-पुरोगामी विचार मांडायला मला धीर आला. या पाश्चात्य मंडळींनी झोपेसारख्या निरुपयोगी व नीरस क्रियेची कांही आधुनिक साधनांनी विल्हेवाट लावली, आणि तेच सहासात तास धावपळींत किंवा सिनेमा पाहण्यांत घालविले, तरी माझी तक्रार नाही. पण कोणत्याहि कारणाने, करमणुकीच्या अभावाने किंवा शरीराच्या अपंगतेने किंवा वार्धक्याने, या मंडळींना जर जन्मभर टाळलेला स्वतःचाच सहवास सोसण्याची वेळ आली, तर कसें काय होईल ?

ते स्वतःपासून कसें काय पळून जाऊं शकतील, हा प्रश्न मला थोडा

अवघड वाटतो. इतकेंच नव्हे तर दैववशात या मंडळींना उद्दीपक व प्रक्षोभक जीवन अनेक वर्षें ओळीने आणि निर्वेधपणें मिळालें, तरी हें जीवन हितपरिणामी आहे काय? व स्वाभाविक आहे काय, हा प्रश्न उरतोच!

सामान्यतः अशी कल्पना असते की, बहिर्मुख मनुष्य हा कांहीतरी खटाटोपांत, उद्योगांत मग्न असतो, तर अंतर्मुख माणूस बाह्य उद्योगाशिवायहि केवळ विचारांत, चिन्तनांत, एकांतांत रममाण होऊं शकतो. तसेंच आधुनिकांची अशीहि एक लाडकी कल्पना आहे की, 'अंतर्मुखता' ऊर्फ 'Introspection' हें रोगट मनोवृत्तीचें लक्षण आहे. परंतु आधुनिक शहरांत आपण ज्या बाह्य धडपडींनी स्वतःला वेढून घेतों, त्या बाह्य धडपडी निरोगीपणाच्याहि द्योतक नाहीत कीं बहुर्मुखतेच्याहि द्योतक नाहीत. एखाद्या प्रक्षोभक उद्योगांत अडकवून घेतलें नाही, कीं जर आपलें मन आपणाला खायला उठत असेल, तर केवळ त्या 'बाह्य' उद्योगामुळे मी आपणाला बहिर्मुख म्हणूं शकत नाही. तुमचें लक्ष तुमच्या स्वतःच्या सुखावर, दुःखावर, करमणुकीवर, एकटेपणावर इतकें खेचलें गेलें आहे की, ती असह्य व्यग्रता टाळण्याकरिता, तुम्ही हवा तो उद्योग हातीं घेत आहां, असा याचा अर्थ होतो. माणसाची धडपड धावपळ, हावरेपणा, वखवख कमी करण्याकरिता आपण त्याला थोडी मनाची एकाग्रता करायला सांगतों, थोडें अंतर्मुख व्हायला सांगतों; तर रसेल त्याच्या अगदी विरुद्ध टोकाचा इलाज याच लोकांना सांगतांना दिसतात. ते म्हणतात, स्वतःत गर्क असण्याऐवजीं बाह्य जगांत थोडा आनंद घेण्याला शिका. पण 'बाह्य' जगांत आनंद घेणें म्हणजे एकसारखी कांही तरी धडपड करणेंहि नव्हे, कीं इंद्रियांना तृप्ति व मनाला नावीन्य पुरवील अशा तऱ्हेचा बाह्य जगाचा उपभोग घेणेंहि नव्हे.

आधुनिक मनुष्य स्वतःत व्यग्र असतो, या अर्थाने अंतर्मुख आहे. पण स्वतःपासून आनंद घेण्याच्या दृष्टीने मात्र तो अंतर्मुख नाही. तसेंच जीवन सह्य होण्याकरिता तो बाह्य वस्तूंवर व प्रक्षोभावर अवलंबून असतो, या अर्थाने तो बहिर्मुख आहे; पण बाह्य वस्तूंच्या केवळ दर्शनांत अगर चिंतनांत आनंद मानण्याइतका मात्र तो बहिर्मुख नाही. तात्पर्य, तो खरा बहिर्मुखहि नाही आणि खरा अंतर्मुखहि नाही !

खरी गोष्ट अशी आहे की, स्वतःकडे वळल्यास त्याला दुःखें, काळज्या व एकटेपणा यांची भीति वाटते. तर बाह्य जगाकडे पाहिल्यास त्याला त्यांत ‘ तोचतोचपणा ’ भासूं लागून अरुचि व विषण्णता घेरूं लागते. पण तेंच बाह्य जग उपभोगाच्या रूपाने किंवा प्रक्षोभाच्या रूपाने मात्र त्याला सह्य होऊं शकतें; रिझवूं शकतें ! याचाच अर्थ या लोकांना स्वतःचें मन व निसर्ग या दोहोंपासूनहि पळत सुटावेसें वाटत असतें !

पण अमर्याद आनंद व ज्ञान देण्याचें साधन असें मानवी मन; व अमर्याद सौंदर्याचें निधान अशी बाह्य सृष्टि यांपासून मनुष्याने पळावें तरी कां व जावें तरी कुठे ? क्षणोक्षणीं नवें रूप धारण करणाऱ्या आणि स्वतःच्या घराच्या खिडकींतून दिसणाऱ्या स्वच्छ भारतीय आकाशाचें दर्शन कंटाळवाणें वाटून हे लोक क्षुद्र कॅरम खेळणें, बेचव सोडा वॉटर पिणें, कृत्रिम थंड पेयें पिणें वगैरेंत मन रिझवण्याचा यत्न करतील.

याचाच अर्थ त्यांना क्षणिक वैषयिकतेंत स्वतःला व सृष्टीला डुबविणें एवढा एकच, जीवित सह्य करण्याचा, मार्ग माहीत असतो.

पण जीवित सह्य करण्याचे हे मार्ग टिकाऊहि नसतात, कीं बिनधोकहि नसतात. कृत्रिम प्रक्षोभाचीं वा इन्द्रियसुखाचीं साधनें जितकीं वापरावीं तितकीं मिळमिळीत व बेचवच वाटूं लागतात. त्यांच्यांतील तीव्रता वाढविणें याचा अर्थ इंद्रियांची अधिकाधिक झीज करणेंच होय.

व अशा प्रकारें व्यसनी मनुष्य ज्या उतारावरून घसरत असतो व घसरण्यांतच विरंगुळा व धुंदी मानतो, त्या उतारावरूनच प्रक्षोभाच्या अथवा excitement च्या मागे लागलेला मनुष्यहि घसरत असतो !

प्रत्येक मनुष्याला स्वतःच्या किंवा सृष्टीच्या चिंतनांत आनंद मानतां येईलच असें नाही. पण ही नैसर्गिक प्रसन्नतेची अवस्था गमावलेली असल्यास, दररोज नव्या व वाढत्या वैषयिक प्रक्षोभाची तरतूद करून ठेवणें हें आधुनिकतेचेंहि लक्षण नव्हे कीं सुरक्षिततेचेंहि लक्षण नव्हे. तो उघड उघड व्यसनीपणाचा एक नवा प्रकार आहे, हें आधुनिक जग जितक्या लवकर ओळखील तितकें चांगलें.

पण excitement ऊर्फ वैषयिक प्रक्षोभक तर घातुक ठरत आहेत; आणि प्रक्षोभकाच्या आणि धावपळीच्या अभावीं तर जीवन असह्य होत आहे. अरुचि, उद्वेग, एकलेपणा, अनाथपणा, जीवनविद्वेष, यांचीं भुतें जिवाला घेरीत आहेत, तर मग आधुनिक मानवाने करावें तरी काय ? वैचित्र्याचीं, प्रक्षोभाचीं किंबहुना कैफाचींहि असतील नसतील तेवढीं साधनें वापरणें, किंवा आत्महत्या करणें हे दोनच मार्ग उरत नाहीत काय ?

होय ! आज आधुनिक जगांत आपण ज्या पद्धतीने विचार करीत आहों, त्या पद्धतीने पाहतां, प्रक्षोभमग्न जीवन, Life of sensations किंवा आत्महत्या एवढे दोनच मार्ग दिसतात.

आणि आपणां गरीब सालस भारतीयांपेक्षा ज्यांना शतपट सुखसाधनें उपलब्ध आहेत, अशा पाश्चात्य देशांतील लोक पुष्कळदा ‘ प्रक्षोभ पुरे पडत नाहीत ’ म्हणून आत्महत्या करतांना दिसत आहेत !

यांतून मार्ग कोणता तें उघड आहे. प्रक्षोभशून्य, आळणी जीवनाची मुद्दाम थोडी थोडी सवय ठेवणें ! करमणुकी, नावीन्यें, वैचित्र्यें यांचा

आपण आधुनिक शहरी जीवनांत इतका मारा करीत आहों की, संथ धोपटमार्गी जीवन आपणाला भयप्रद वाटूं लागलें आहे. स्वस्थ बसणें म्हणजे जणूं अंधारकोठडी वाटूं लागली आहे.

आपल्या मुलांना आपण नाना तऱ्हेचे खेळ, नाना तऱ्हेचीं पुस्तकें, नाना तऱ्हेच्या चळवळी पुरवितों, तें तर ठीकच आहे. पण त्यांत आता आणखी एक उपयुक्त उद्योग शिकविणें जरूर आहे व तो म्हणजे कांही न करतां बसणें! एकाच जागीं बसणें, एकाच शहरांत राहणें, एकाच तऱ्हेचें खाणें, हें त्यांना भयंकर वाटतां उपयोगी नाही.

माणसें तुरुंगांतूनहि वजन वाढून बाहेर पडतात आणि सर्व सुखांनी आणि स्वातंत्र्यांनी परिवेष्टित असतांहि खंगत जातात, यांतील इंगित आपण लक्षांत घेणें जरूर आहे. फार काय, वैचित्र्य व सुखोपभोग यांची रुचि टिकविण्याकरिताहि, माफक प्रमाणांत कंटाळवाणें व रुक्ष जीवन पथ्य म्हणून सेवन करणें जरूर आहे!

९

# श्याम वर्ण

तुम्हि थोराचे अहां, परंतु काळे कां हो ? मी गोरी !
( स्त्री–गीत )

कल्पना साधारणतः स्वैर समजण्यांत येते. पण तीहि केवळ कल्पनाच होय ! स्वतःस कल्पनेच्या साम्राज्याचे अधिपति समजणाऱ्या चित्रकारास व कवीस, कल्पना ही केवळ नांवापुरतीच स्वैर आहे असें प्रत्ययास येतें. काल्पनिक जग प्रत्यक्ष जगावर उभारलें जात असल्यामुळे, कल्पनेच्या स्वैरत्वास आळा घातल्याखेरीज चालत नाही. नाटककारांच्या कल्पनेच्या अपत्यांचा तोंडावळा निर्मितीच्या वेळीं त्यांच्यासमोर असलेल्या नटाप्रमाणे आपोआपच होत जातो. नायिकेचें वय " सुमारें सोळा " असावें असें कोणत्या नाटककारास वाटत नाही ? परंतु ज्या

नटाकडे तें काम जाणार त्याचें वय चाळीसच्या आसपास असल्यास धूर्त नाटककार पोक्त नायिका रंगविण्याचेंच ठरवील! खुद्द शेक्सपियरला सुद्धा आपल्या 'मंडळीं' तील मंडळींचा मगदूर पाहून पात्रें रंगवावीं लागत! आता, या मानाने कादंबरीच्या विस्तीर्ण क्षेत्रांत कल्पनेचा वारू थोडा सैल सोडतां येतो हें खरें; तरी तेथे देखील लेखकास बाह्योपाधि नसतात असें नाही. माझ्या एका मित्राची एक कादंबरी पूर्ण होऊन प्रकाशकांच्या हातीं पडल्यानंतर, केवळ एका अनपेक्षित कारणामुळे त्यास त्यांतील कित्येक वर्णनें बदलावीं लागलीं! कादंबरींतील कांही प्रसंगांचीं चित्रें प्रकाशकांनी एका प्रसिद्ध चित्रकारास काढावयास सांगितलीं होतीं. चित्रें काढून झालीं. ब्लॉकहि तयार झाले आणि मग माझे मित्र जागे झाले. आणि पाहतात तों त्यांची नायिका व चित्रकाराची नायिका यांचा कांहीच संबंध नाही! संतापाच्या व दुःखाच्या आवेगांत ते प्रकाशकास म्हणाले, "आपल्या चित्रकारास सांगा की हीं चित्रें आपल्याकडेच राहूं द्या." प्रकाशकास लेखकाइतकें भावनाप्रधान होऊन चालणारच नाही. ते शांतपणें म्हणाले, "खर्चाच्या व श्रमाच्या दृष्टीने पाहतां, आपणच आपल्या नायिकेस थोडी फिरून रंगविल्यास आमच्यावर उपकार होतील!"

सुदैवाने मला या दोन्ही बाबतींत असला कटु अनुभव आलेला नाही. तथापि कल्पनेच्या कढीभातांत कल्पनेचेच खडे कसे लागतात, याचा मात्र अनुभव आहे. केवळ काल्पनिक शंकाकुशंकांनी माझीं काल्पनिक चित्रें मोडून जातात. माझ्या कल्पनाचित्रांत विघ्न आणणारी नेहमीची शंका म्हणजे नायिकेचा वर्ण कोणता ठरवावा! कित्येकांस ही बाब क्षुल्लक वाटेल; पण अशा क्षुल्लक बाबींनाच कल्पनासाम्राज्यांत कोण महत्त्व चढतें. परवा मी असेंच एक कथानक हातीं घेतलें होतें आणि

"आमची मृणालिनी यावेळीं यौवनाच्या देहलीवर उभी होती. तिचा वर्ण ..." एथपर्यंत लिहिलें आणि माझा टाक मला न कळत माझ्या शिथिल हातांतून गळून खाली पडला. मीं खिडकींतून दूर रस्त्याकडे पाहूं लागलों. माझ्या डोळ्यांपुढून काळ्या व गोऱ्या दोन्ही वर्णाच्या अनेक युवती येऊन गेल्या. आणि केवळ रंग ठरत नाही, म्हणूनच त्या दिवशीं माझी नायिका रंगू शकली नाही!

आणि यामुळेच माझ्या डोक्यांत हा वाङ्मयांतील वर्णभेदाचा प्रश्न विशेष जोराने उद्‌भूत झाला. सामान्यतः सर्वांप्रमाणेच माझाही कल गौरवर्णाकडे अधिक आहे. तथापि अल्पप्रमाणांत का होईना, वाङ्मयांत श्यामवर्णाचें माहात्म्य असावें याचें मात्र मला कौतुक वाटतें. नवीन लेखक कदाचित टूम म्हणून आपल्या चित्रांत हा सवंग परंतु (वाङ्मयांत) दुर्मिळ रंग वापरीत असतील. परंतु प्राचीन व अभिजात कवींनींहि कित्येकदा अनपेक्षितपणें याचा उपयोग केलेला पाहून आश्चर्य वाटतें. कृष्ण काळा; द्रौपदी काळी; व्यासहि काळे! रामाचाहि वर्ण घनश्याम. भवभूती आपल्या लवाच्या श्यामवर्णाचें वर्णन तर गौरवर्णाहूनहि बहारीचें करतो. आता या सर्वच व्यक्ति ऐतिहासिक गणून व त्यांचा वर्ण खरोखरीच काळा होता असें समजून वरील प्रकारचें एक सुलभ स्पष्टीकरण देतां येईल. तथापि ही गोळी अनेक दृष्टींनी गिळण्यास कठीण आहे. एक तर आमच्या प्राचीन कवींना ऐतिहासिक सत्याची फारशी कदर होतीसें दिसत नाही. शिवाय आपल्या प्रिय स्त्रीपुरुषांच्या महत्त्वांत भर टाकण्याकरिता अद्‌भुत वर्णनांचीहि मदत घेणाऱ्या कवींस, मनांत असतें तर, काळ्याचें पांढरें सहज करतां आलें असतें. पण ठिकठेकाणीं त्यांनी केलेल्या श्यामवर्णाच्या रसभरित वर्णनावरून तो वर्ण त्यास प्रिय वाटत असे असेंच दिसून येतें.

माझ्या एका ' मनोविश्लेषणनिष्णात ' मित्रास यांत आणखीहि एका भानगडीचा शोध लागला. महाभारतांतील प्रधान व्यक्ति काळ्या कां ? तर व्यास कृष्णवर्ण होते म्हणून ! पण मला हें स्पष्टीकरण खोडसाळपणाचें वाटतें. शिवाय वाल्मीकि मुनींच्या वर्णाचा नक्की तपास लागेपर्यंत हाहि सिद्धान्त लंगडा पडणार. महाभारताचा कर्ता कृष्णवर्ण, म्हणून कृष्ण, अर्जुन, द्रौपदी वगैरे मंडळी काळी. परंतु राम, लव वगैरे कृष्णवर्ण कां ? अर्थातच एखादा विद्वान् वाल्मीकि मुनींचा वर्ण काळा ठरवीपर्यंत माझ्या मानसशास्त्रज्ञ मित्रांचें म्हणणें मला मान्य करतां येत नाही. माझ्या मतें नावीन्यप्रियतेमुळे असो कीं कशामुळे असो, जुन्या व नव्या सर्वंच मोठमोठ्या कवींत कृष्णवर्णाविषयीं आवड दिसून येते. प्राचीन व अर्वाचीन वाङ्मयांतील कृष्णवर्ण व्यक्तींची जंत्री देऊन हा लेख ' विद्वत्ताप्रचुर ' ऊर्फ कंटाळवाणा करण्याचा माझा विचार नाही. तरी माझ्या अनुमानाला अनुकूल अशीं कित्येक उदाहरणें वाचकांच्या डोळ्यांपुढून आधीच येऊन गेलीं असतील.

व्यास, वाल्मीकि वगैरे प्राचीन आर्यावर्तातील कवि सोडले तरी, अर्वाचीन काळांत रवीन्द्रनाथांच्या कित्येक अत्यंत परिणामकारक स्त्रीपुरुषचित्रांचा वर्ण काळाच आहे. आधुनिक कवींतील अत्यंत लोकप्रिय अशा माधव ज्यूलियन् या महाराष्ट्रीय कवींनीहि ' श्यामले ' ची रसभरीत वर्णनें केलीं आहेत. स्त्रीगीतांत कृष्णाच्या काळ्या रंगाचें सर्वत्र दिसून येणारें स्तोम तर प्रसिद्धच आहे. पण अर्वाचीन भारतीय वाङ्मयाच्या बाबतींतहि माझे शास्त्रज्ञ मित्र फिरून मानसशास्त्राच्या दृष्टीने स्पष्टीकरण करतील. कृष्णासारख्या केवळ अलौकिक लोकप्रियतेच्या व्यक्तीचा वर्ण घनश्याम असल्यामुळे, भाविक अथवा अभाविक सर्वच भारतवासी लेखकांच्या मनावर श्यामवर्णाचा अनुकूल ठसा उमटणें साहजिक आहे.

पण केवळ सुप्रसिद्ध उदाहरणच घ्यायचें म्हटलें तरी युरोपियन-लेखकांतहि श्यामवर्णाविषयी गूढ आवड दिसून येईल. शेक्सपियरच्या वैयक्तिक आवडी निवडी व भावना शेक्सपीयरच्या सुनीतांतच सापडल्या तर सापडतील असें विद्वानांचें मत आहे. आणि अशा लोकोत्तर कवीच्या भावनापूर्ण सुनीतांजलीची अधिष्ठात्रि देवताहि कोणी एक अज्ञात कृष्णवर्ण व्यक्तीच होती.

अर्थात् गौरवर्ण कितीहि राजमान्य असला, तरी कित्येक महाकवींवर श्यामवर्णाची मोहिनी कां पडावी, याचा उलगडा एखाद्या ऐतिहासिक अथवा मानसशास्त्रीय प्रमेयाने होणार नाही. 'कवयोऽप्यत्र मोहिताः' असेंच या बाबतींत म्हणावें लागेल. तत्त्वज्ञांनी तर याही पुढे मजल गाठली आहे. कवी निदान गौरवर्णाचा सामान्यतः गौरव करून श्यामवर्णाविषयी केवळ अपवाद म्हणून अभिरुचि दाखवितात. परंतु अर्वाचीन काळांतील प्रसिद्ध जर्मन तत्त्ववेत्ता शोपेनहौर तर काळा रंगच नैसर्गिक रंग होय असें प्रतिपादितो! गोरीं माणसें म्हणजे जवळजवळ पांढऱ्या उंदराइतकीं अनैसर्गिक होत असें त्याचें मत आहे. "गौरवर्ण पाश्चात्य लोक" हा शब्दप्रयोगच त्याच्या मतें विचित्र होय. कारण गोरी माणसें म्हणजे एका दृष्टीने मूळ रंग विटून तयार झालेलीं होत, असें त्याचें अनुमान आहे! पण कित्येकांस हाहि शास्त्रीय शोधाचा अतिरेक वाटेल. शिवाय गोरा रंग मूळचा असो कीं हवापाण्यामुळे बनलेला असो, निसर्गतःच सर्वांस प्रिय असतो ही गोष्ट शौपेनहौर यासहि नाकबूल करतां आली नसती. तथापि त्याच्या विलक्षण सिद्धान्तामुळे आमच्या कवींच्या मनांतील वेळीं अवेळीं दिसून येणाऱ्या श्यामवर्णाविषयीच्या अभिरुचीसच पुष्टी मिळते एवढें मात्र खास.

वाङ्मयांत कृष्णवर्णाला मिळतें तेवढें तरी महत्त्व कां मिळावें, असें

कुतूहल वाटल्यावरूनच वरील विचार सुचले. श्यामवर्णाची तरफदारी करण्याचा माझा विचार नाही व त्याची जरूरहि नाही. नाहीतर एखादा मानसशास्त्रज्ञ वाचक वरील विवेचन वाचून "लेखकाने श्यामवर्णाचीच बाजू कां सजवावी ?" या प्रश्नासहि एखादें मानसशास्त्रीय उत्तर सुचवावयाचा !

# १०

## साहित्यिकांची जात

त्या दिवशीं ती आणि मी इतके भांडलों व अखेर इतके विषण्ण व उद्विग्न झालों, व एकमेकांना आणि त्याहूनहि स्वतःला इतकें विटलों, की यापुढे आम्ही एकमेकांचें तोंडहि पाहाणार नाही, आणि दुनियेलाहि पहिल्यासारखें हसत मुख जन्मांत दाखविणार नाही असें मला निश्चित वाटलें. स्वतःला विसरण्याकरिता वाचनलयांत गाडून घ्यावें म्हणून मी बाहेर पडलों. मला समोरच्या दोन पावलांपलीकडील दिसत देखील नव्हतें, इतका मी अन्तःसृष्टीच्या अंधारांत बुडलों होतों. इतक्यांत चौकांत आडव्या रस्त्याने घाईघाईत पण ऐटींत चाललेली सुंदर स्त्री माझ्या अगदी जवळून गेली. सुंदर स्त्री आज कितीहि जवळून गेली तरी ध्यानभंग होण्यासारखी माझी मनःस्थिति नव्हती; पण कानांतील ईयरिंग्ज, पाठीवरील वेणी आणि पायांतील जनानी स्लिपर

यांमुळे अशा स्थितींतहि माझें कुतूहल जागृत झालें.

ती स्त्री म्हणजे सकाळीं मला व अर्थात् जगालाहि विटलेली माझी स्त्रीच होती !

विषण्ण मनःस्थिति स्त्रीविषयक विचारांना फारशी अनुकूल नसली, तरी स्त्रीविषयक क्रोधाला व उद्वेगाला ती फारच अनुकूल असते, असा मला अनुभव आला. मी क्षणभर त्या वाहनांनीं गजबजलेल्या चौकांतच उभा राहिलों. उद्वेगाने एक निःश्वास सोडला. राग व तिरस्कार यांनी माझे ओठ थरथरत होते. शक्य असतें तर मीं माझा तिरस्कारयुक्त क्रोध तेथें व्यक्तहि केला असता. ज्या मला माझी स्त्री जगापलीकडे मानीत असे, त्या मला विटल्यानंतरहि तिला जगांत जगण्यासारखें काय उरलें ? ... तर शरीर सजवून भिकार जगाच्या डोळ्यांत भरणें !

त्या दिवशीं मी वाचनालयांत कांहीच वाचूं शकलों नाही. वाचण्याचा प्रयत्न व्यर्थ होत आहे, हें ध्यानांत येतांच ओळखीचे चेहरे टाळून मी वाचनालयाच्या मागील बाजूच्या प्रशस्त ग्यालरींत जाऊन बसलों. वाचनालयाच्या कारकुनाकडून चारदोन कागद मागून घेतले. डोक्याच्या टोपीची घडी मांडीवर ठेवून त्यावर कागद धरून लिहिण्यास सुरवात केली. "प्रेमाचें चांचल्य" हा लघुनिबंध एका बैठकींतच लिहून काढला !

प्रक्षुब्ध मनःस्थितीमुळे निबंध अर्थातच सुंदर वठला. निबंध लिहून होतांच माझें मन हलकें आणि उल्हसित झालें. सकाळचे विषण्ण विचार आठवेनासेहि झाले. पावलें झपाझप पडूं लागलीं. ज्यांना मी मघांशीं टाळीत होतों, त्यांचेकडे पाहून मी मधुर स्मित करूं लागलों. थोड्याच वेळांत, हातांत लिहिलेल्या कागदांची घडी धरून मीं घराचा रस्ता धरला. पण रस्ता माझ्या घराचाच होता, असें मात्र नव्हे. कुठे तरी वेगाने जाऊन पोहोचावयाचें एवढेंच माझ्या डोक्यांत होतें. जिकडून माझें घर

जवळ नव्हतें अशा एका रस्त्याने, पण त्वरेने माझीं पावलें पडत होतीं. अखेर माझ्या पत्नीच्या माहेरच्या चौकांत येऊन दाखल होतांच, माझीं पावलें नकळत तिच्याकडे, तिच्या बंगल्याकडे वळूं लागलीं. नेहमींप्रमाणें ग्यालरीकडे अपेक्षेने डोळे वळणार, तोंच मला फिरून अन्तःस्थ उद्वेगाची जाणीव झाली. जिच्या प्रिय दर्शनाने मला इतःपर सुख होणें अशक्य, म्हणून मी सकाळीं जिला कंटाळलों होतों, तिच्याकडेच माझ्या बौद्धिक अपत्याच्या कौतुकाच्या अपेक्षेने मी चाललों होतों! जगाला विटलेली माझी राणी पावडर आणि इयररिंग्ज्मध्यें रंगू शकते हें पाहून मी उद्विग्न झालों होतों; पण जगाला विटलेला मी, स्वतःच लेख लिहून आणि त्याच्या कौतुकाला भुकेजून, मला विटलेल्या पत्नीकडेच कौतुकार्थ निघालों आहे, हें पाहून माझ्या मनाचें काय झालें असेल?

लेनिन "Literary type" "साहित्यिक जात" हा शब्द उथळ, पोरकट व चंचल मनाचा वाचक म्हणून वापरीत असे, याची मला क्षणभर आठवण झाली; व मी या 'साहित्यिकांच्या जाती'वर म्हणजे स्वतःच्याच जातीवर विचार करूं लागलों. शरमेची गोष्ट म्हणजे, कानांत ईयररिंगज् व पायांत स्लिपर् घालून मुरडत जाणारी स्त्री, आणि आपलें हृदय मोहक शब्दांत रंगवून जगाच्या मोहबतीची वाट पाहणारा साहित्यिक, यांत मला अन्तर दिसेना. माझें अन्तःकरण स्वतिरस्काराने भरून गेलें. आम्हां साहित्यिकांची जात आहे तरी कसली, हा प्रश्न माझें मन व्याप्त करूं लागला. मी सकाळचा उद्वेग व नंतरचा उल्हास दोन्हीहि विसरलों आणि स्वजातीचें विश्लेषण करण्यांत गर्क झालों.

मनुष्यजातीला जे गुण बहुमोल वाटत आले आहेत, त्यांत बुद्धिमत्ता आणि रसिकता यांस पहिलें स्थान आहे. बुद्धीने मनुष्यास बाह्यसृष्टीचें यथार्थ आकलन होतें, तर रसिकतेमुळे योग्य वस्तूपासून आनंदाचा

लाभ घडतो. हे दोन्हीहि गुण साहित्यिक म्हणविल्या जाणाऱ्या व्यक्तींत भरपूर असतात. पण यांतील दुसरी शक्ति ही केवळ यांत्रिक शक्ति नाही. रसिकता व तिजपासून होणारा आनंद म्हणजे प्रकाशासारखी वस्तु आहे. तिचें अस्तित्वच मुळीं दुसऱ्याच्या आनंदाला कारणीभूत होणारें आहे. व यामुळे साहित्यिकांचा आनंद हा इतरांच्या आनंदास कारणीभूत होतो. जेथे साहित्यिक किंवा गुणी लोक आहेत, तेथे आनंद असणारच. आणि जगांतून गुणी लोक नष्ट होतील, तर जगांतील आनंद नष्ट होऊन, जग "जड जगत्" या नांवाला, मनुष्यप्राण्यांनी भरलेलें असूनहि, प्राप्त होईल. अशा विचारांनी डोकें भरून जातांच, माझी छाती गर्वाने फुगली व मी नकळत 'आम्हांला वगळा; गतप्रभ झणीं होतील तारांगणें!' वगैरे ओळी म्हणूं लागलों.

मग मला स्वतःचा एवढा तिरस्कार कां वाटला? आणि आनंदाचा स्वयमेव निर्झर असूनहि माझ्यावर सर्वथा अनुरक्त असलेल्या स्त्रीस माझा वीट कां आला? हे प्रश्न मला फिरून त्रस्त करूं लागले. मला वाटूं लागलें, आनंदाची पैदास करणारा साहित्यिक हा उंची अत्तरें तयार करणाऱ्या कारखानदाराप्रमाणे आहे. लोकांना जाड्या भरड्या कापडाची ददात असतां हा आपलें मूल्यवान् अत्तर घेऊन त्यांच्याकडे जाईल, तर ते लोक त्याचा तिरस्कारच करतील. विशेषतः त्याच्या स्वतःच्याच घरांत जेव्हा साध्या अन्नवस्त्राची वाण असेल, तेव्हा तर त्याची बायको त्यास माझ्या बायकोप्रमाणेच धारेवर धरील व अखेर त्यास ती विटून जाईल.

मला या सर्व गोष्टी रीतसर व सुसंगत वाटूं लागल्या. मी स्वतःच्या बायकामुलांस अन्नवस्त्र देण्याऐवजीं, अखिल जगाला, आजच्याच नव्हे तर भावी जगाला, म्हणजे पुढच्या पिढ्यांना आनंद देण्यांत गर्क राहिल्यास माझ्या बायकोने रागावूं नये तर कोणी रागवावें?

मी स्वतःपुरत्या तरी अवश्य गोष्टी मिळून हातींपायीं धड व सुखी रहावें अशी तिची इच्छा असल्यास गैर तें काय ? क्षणोक्षणीं स्वतःलाहि विसरणाऱ्या वेड्या रसिकास तिनेहि भानावर आणलें नाही तर आणणार कोण ?... विचार करतां करतां माझ्या पत्नी-विषयीचा माझा सकाळचा राग पार कोठच्या कोठें गेला व मन प्रेमाने व कृतज्ञतेने भरून गेलें. माझ्या पत्नीविषयीं मला केव्हाहि विशेष प्रेमभाव उत्पन्न होतांच मला आमच्या पहिल्या प्रेमाच्या दिवसांची आठवण होते. ते गोड वेडाचे, ते जगाला विसरण्याचे, ते पावसाचे दुर्दिन देखील, दारें लावून घेऊन चोवीस तास घरींच काढावयास सापडल्यामुळे, सुदिन भासावयाला लावणारे– प्रेमाचे– विकाराचे– मोहाचे–मोहनीचे मुग्धतेचे दिवस मला एकदम आठवले ! कोणत्याहि आनंदाच्या, दुःखाच्या, रागाच्या...कोणत्याहि स्थितींत मला क्षणैक त्या विकारांत शिरून त्याचेंहि रहस्य हस्तगत करावेसें वाटतें. आणि मला–मजसारख्या बुद्धिमंतालाहि–क्षणभर मूर्ख बनविणारा हा गुलाम आहे तरी कोण, हे पहावेंसें वाटतें. आणि म्हणून आज बरेच दिवस मला आपलें मोहक तोंड दाखविणाऱ्या त्या माझ्या तारुण्यांतील सोबत्याला–माझ्या आणि माझ्या प्रियेच्या काममोहाला–मी आज असाच जवळ घेऊन छेडूं लागलों ! माझी वेडी सु. * * माझ्या कोणत्या गुणावर लुब्ध झाली ? ... रूप म्हणावें ... संपत्ति ... छे, मला माझ्या या आत्मसमालोचनांत बहुतेक अवगुणच आढळूं लागले... हो, पण या बाबतींत तिचीच साक्ष अधिक विश्वसनीय. ती नेहमी म्हणे, मला तुमच्या बुद्धीने ... अर्थात् तुमच्या शब्दाशब्दांत व्यक्त होणाऱ्या मार्मिकतेने, रसिकतेने व बुद्धिमत्तेने भुरळ पाडली. मला त्या वेळीं केवढा गर्व वाटे ! आणि जगानेहि थोडाफार तोच अभिप्राय व्यक्त करतांच, तो गर्व मला यथार्थहि वाटे. आणि आज

मला त्याच माझ्या बुद्धिमतेविषयी, चिकित्सकतेविषयी एक निरुपयोगी हत्यार म्हणून तिरस्कार वाटत होता. पण त्याहून आश्चर्य मला तिचें वाटूं लागलें. मी चालतां चालतां थबकून जवळ जवळ मोठ्यानेच म्हणालों, “ वेडे ! ...तूंच ना माझ्या या गुणांची एवढी चहा केलीस ? आणि तूंच आज त्यांचा व त्यांच्याखातर माझा राग करीत आहेस ? ”

मीं अखेर मनाशीं असें ठरवलें कीं, ज्यांनी साहित्यिकांचा सहवास पत्करावा, साहित्यिकांचें प्रेम पत्करावें, त्यांनी त्यांचें व्यवहारांतील अपयश, दारिद्र्य वगैरेहि पत्करलेंच पाहिजे. पण येथेंहि माझ्या विवेचक-बुद्धीने मला हरकत घेतली. वाङ्मयांत प्रतिभावंत, आणि व्यवहारांत—क्षुद्र क्षुल्लक बाजारी उलाढालींत देखील—यशस्वी अशा शेक्सपियर—पासून शॉपर्यंत होऊन गेलेल्या भाग्यवंत साहित्यिकांचीं चरित्रें माझ्या डोळ्यापुढें उभीं राहिलीं. व फिरून अयशस्वी व व्यवहारपराङ्मुख साहित्यकांविषयी अनादर वाटूं लागला. पण छे, स्त्रियांतहि शूर अनेक असतील; पण भीरुत्व हा त्यांचा विशेष आणि भूषणीभूत विशेष आहे. स्त्रियांत धीट व निर्भीड अनेक असतील, पण लज्जा, संकोच यांनीच त्या अधिक शोभतात. वीर असून हिशेबी व धूर्त अनेक असतील; पण बेपर्वा भाबडेपणा हाच वीरांना अधिक शोभादायक होय. आणि म्हणूनच व्यवहारदक्ष साहित्यिक अनेक होऊन गेले असले, तरी व्यवहाराविषयी बेभान असणारे साहित्यिकच मला अधिक रम्य वाटतात. आणि म्हणूनच मी माझ्या प्रिय सु...ला इतका प्रिय झालों. अरेरे, मग ती मजवर इतकी कां बरे रागावते ?

ती मजवर लोभ कां करती झाली, याच्या उत्तराइतकेंच तिने मजवर रागवावें कीं नाही, या प्रश्नालाहि मला स्पष्ट उत्तर मिळालें. ती बुद्धिमत्तेवर लोभ कां करती झाली ? तर ती स्वतः बुद्धिमान होती म्हणून...आणि तिने

मजवर कां रागावूं नये, तर गुणवंताचें गुणवंताशिवाय चालणार नाही म्हणून! मला विटून काय ती एखाद्या यशस्वी शिंप्याला किंवा सराफाला जाऊन चिकटणार ?...माझ्या सहवासाचे दुःखमिश्रित आणि म्हणूनच मधुरतर सुख, हेंच तिचें परम निधान होय...आणि तिचा कठोर, पण प्रेमामुळेच कठोर, असा हितमंत्र हाच माझा परम मंगल गायत्रीमंत्र होय! स्वतःचा स्वार्थ विसरून जगाच्या सुखांत भर घालणारे साहित्यिक जसे धन्य, तशी सुखाबरोबर दुःखहि पत्करून साहित्यिकावर प्रेम करणारी माझी प्रियाहि धन्यच होय. मी फिरून म्हणूं लागलों......

" आम्हांला वगळा, गतप्रभ झणीं होतील तारांगणें ! "

पण आतां मात्र ' आम्हांला ' या पहिल्या शब्दाचा अर्थ मी एकवचनी घेत नसून, द्विवचनी (साहित्यिक व रसिक, अर्थात मी व माझी प्रिया !) घेत होतों.

फिरून मी विचाराच्या तंद्रींत वाट चुकून माझ्या पत्नीच्या दाराशींच येऊन ठेपलों होतों. पण आता मला तिच्या कौतुकाची प्रतीक्षा करण्यांत कमीपणा वाटत नव्हता !

# ११

## लक्ष्मण आणि सीता

" प्रेम हवें कीं आदर हवा असा प्रश्न केल्यास विचार–प्रधान मनुष्य आदर हवा म्हणेल, तर विकार–प्रधान मनुष्य प्रेम पसंत करील. आदरांत सलगीचा अंतर्भाव होत नाही व सलगीच्या अभावीं अन्योन्य विश्वास क्वचितच आढळतो. अर्थात् व्यवहारी दृष्टीच्या मनुष्यास आदराचें नातें प्रेमाच्या नात्याहून अधिक सोयीचें वाटतें. प्रेमाच्या मनुष्यास आपणांवर कित्येक हक्क प्राप्त होतात, तर आदरांत अनेक वेळा दुरून दंडवतावर भागतें. तथापि आदर आणि प्रेम यांची अशी फारकत केलेली कित्येकांस मान्य होणार नाही. मला स्वतःलाहि आदरयुक्त प्रेमाचें नातें सर्व नात्यांहून अधिक सुखकर वाटतें. तरी या दोन भावनांचे नेमकें सुखोत्पादक मिश्रण बनविणें कठीण असतें. कित्येकदा आदरांत प्रेम आहेच, असें आपण धरून चालतों; तर कित्येकदा प्रेमांत आदराचा अंतर्भाव झाला

...२८२९ ... वि: निबंध
... २६९२० ... नों. दि. २१।७।६३.



आहे असें समजतों. परंतु कसोटीची वेळ येतांच, निष्प्रेम आदर कोरडा पडतो; तर आदरहीन प्रेमहि 'अतिपरिचयादवज्ञा' या कोटीला जातें. व अशा रीतीने भ्रमाचा भोपळा फुटतो.

सामन्यतः धूर्त, व्यवहारज्ञानी व दूरदर्शी धर्मोपदेष्टे आदराला अधिक प्राधान्य देतात. हें आपल्याकडील कौटुंबिक आचारनियमावरून दिसून येईल. पतिपत्नी, पितापुत्र व अनुषंगाने निर्माण झालेलीं इतर नातीं यांमधील वागण्याच्या नियमांचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास, आपल्या पूर्वजांनी आदरावरच अधिक भर दिला असल्याचें दिसून येईल, व तसें करणेंच अधिक व्यवहार्य आहे, हें कोणताहि मनुष्य कबूल करील. कारण धर्माज्ञा म्हणून आदर वागविणें एक वेळ शक्य होईल, पण प्रेम कोणाच्याहि आज्ञेंत रहात नाही हें प्रसिद्धच आहे. येवढ्यावरून निष्प्रेम आदरावर संसारांत धकेल, असें मानण्याची मात्र चूक होण्याचा संभव आहे. पण कठिण प्रसंगीं प्रेमाची जोड नसल्यामुळे रुक्ष आदर उघडा पडून दगावल्याचींहि उदाहरणें आढळतात.

अशा शास्त्रोक्त आदराचे आदर्श आपल्या पुराणग्रंथांत विशेष आढळतात व अशाच एका प्रसंगावरून मला वरील विचार सुचले. लक्ष्मणाला सीतेचे केयूर व कुंडलें माहीत नव्हतीं, व नूपुर मात्र ओळखतां आले, या रामायणांतील प्रसंगाचें आपण सर्व मनसोक्त कौतुक करतों; व दीर आणि भावजय यांच्या नात्याचे आदर्श म्हणून या प्रसंगाचा पुनः पुन्हां उल्लेखहि करतों. लक्ष्मण व सीता यांचे संबंध आदबीचे असले तरी सलगीच्या प्रेमाचे नव्हते, हें या प्रसंगावरूनच उघड होतें. तथापि आरंभीं म्हटल्याप्रमाणे प्रेम आणि आदर यांचें केवळ श्रेयस्कर मिश्रण बनविणें नेहमी साधतेंच असें नाही. सीता व लक्ष्मण यांच्या संबंधाचें असेंच झाल्याचें दिसून येईल. लक्ष्मणाच्या शालीनतेचें अथवा पाप-

भीरुत्वाचें भावी पिढ्या कितीहि वर्णन करोत, त्याच्या स्वतःवर त्यामुळे एक वेळ दुरधर प्रसंग आल्याचें दिसून येते.

प्रसंग प्रसिद्ध आहे. मायावी मृगाने राचंद्रासारखा आवाज काढतांच सीता फसली व लक्ष्मणास रामाच्या रक्षणकरिता जाण्याविषयी आग्रह करूं लागली. लक्ष्मण मृगरूपधारी राक्षराच्या मायावीपणाने फसलेला नव्हता, व म्हणून रामाने त्याजवर टाकलेलें सीतारक्षणाचें कार्य सोडून जाण्यास तयार नव्हता. लक्ष्मण व सीता या दोघांच्याहि मनांत प्रामाणिकपणें एकाच प्रसंगाविषयीं सर्वथा विरोधी विचार आले; अशावेळीं सामान्य परिस्थितींत कोणत्याहि भावजयीने दिराच्या शहाणपणावर विश्वास ठेवून आपल्या मनाचें समाधान करून घेतलें असतें. मग आदर्शभूत भ्राता म्हणून प्रसिद्ध असलेला व राजधानी सोडून केवळ बंधुप्रेमाने वनवासाला प्रवृत्त झालेला लक्ष्मण, सीतेच्या विश्वासास पात्र होऊं नये हें आश्चर्य नव्हे काय? पण केवळ नूपुरांपर्यंतच ज्याची मर्यादा त्याच्यावरील विश्वास ऐन वेळीं डळमळल्यास आश्चर्य कसचें? ज्या गुणाची पापभीरुत्वाच्या व शालीनतेच्या दृष्टीने आज हजारों वर्षें चहा होत आहे, त्याच गुणाचें दारिद्र्य प्रस्तुत कसोटीच्या प्रसंगीं प्रकट होऊन, आदराने प्रेमाचा कार्यभाग होईलच असें नाही, हें सिद्ध झालें नाही काय? प्रस्तुत प्रसंगीं साध्वी सीता आपल्या धर्ममूर्ति भर्तृबंधूस म्हणते—"अनार्या, दुष्टा, कुलपांसना, तुझ्या मनांत खचितच रामानें मरावें असें आहे....पण यांत आश्चर्य काय? सावत्र बंधू असेच वरवर गोड बोलून पाठीमागून गळा कापतात. माझा गुप्त अभिलाष पोटांत धरून किंवा भरताशीं संगनमत करून तूं रामाच्या मरणाचीच वाट पहात आहेस......"

अरेरे! लक्ष्मणासारख्या पुण्यात्म्यास, मातेप्रमाणे मानलेल्या भ्रातृ-

जायेच्या तोंडून असे शब्द ऐकावे लागले, यावरून सीता व लक्ष्मण यांच्या नात्यांत कांहीतरी वैगुण्य होतें, हें आपल्या पुराणाभिमानासहि कबूल करावें लागेल. आदराची दृष्टि पायावर खिळलेली असते; तर प्रेमाची दृष्टि निष्पापपणें डोळ्याला डोळा भिडवूं शकते. आणि हृदयाने ठाव सोडल्यावर पायांकडे पहात केलेल्या भाषणाचा काय परिणाम होणार ?

आदि काव्यांतील आदर्श चित्रांत दोष काढण्याचा माझा हेतु नाही. व असला तरी सफल होणें शक्य नाही. उलट कोणताहि गुण अतिरेकाला गेल्यास दोषप्राय कसा होतो हें दाखविणेंच अभिजात वाङ्मयाचें ध्येय असतें व उदात्त व सूचक प्रसंगाच्या साहाय्याने हें कार्य त्यांत साधलेलें असतें. धूमावृत वन्हीप्रमाणे उज्ज्वल व निष्काम कर्म देखील दोषग्रस्त कसें होतें, हें महाकवींच्या लिखाणांतील रम्य प्रसंगांतून चीत्रित केलेलें असतें. त्यांच्या अनेकार्थसूचक काव्यप्रसंगांतून योग्य बोध घेणें आपल्या अल्पमतीवरच सोपविलेलें असतें. व रामायणांतील या दैवदुर्विपाकाच्या प्रसंगांतून पुण्यमार्गी संतास पुण्याचरणामुळेहि क्वचित् दुःखें सोसावीं लागतात, पण त्यामुळे ते ध्येयच्चुत होत नाहीत, याहून दुसरा काय बोध आपण घेणार ?

पण "प्रेम कीं आदर" या प्रश्नाचें उत्तर आपणांस काय मिळतें ? गुंतागुंतीच्या कौटुंबिक संबंधांत आदराचें स्थान कोणतेंहि असो, प्रेमाचें कार्य कोरड्या आदराने नेहमी होईलच असें नाही.

आदराची धाव पायापर्यंतच !

१२

## पड्याची महती

“ तुम्हे सितारोंने बेइख्तियार देखा है
शरीर चांदने भी बार बार देखा है ।

मगर मिरी निगहे शौक को शिकायत है
के इसने तुमको फ़क़त एक बार देखा है ॥ ”

( तुला ताऱ्यांनी मनमुराद पाहिलें आहे; चावट चंद्रानेहि तुला पुन्हा पुन्हा पाहिलें आहे...... परंतु माझ्या अभिलाषी नयनांची तक्रार आहे की, त्यांनी तुला फक्त एकदाच पाहिली आहे. )

—अख्तर शीरानी

मला वाटतं, तो चित्रपट ' महाराणी येसूबाई ' हा असावा. इतर कित्येक ऐतिहासिक चित्रपटांप्रमाणे या चित्रपटांतहि काल्पनिक प्रणय-प्रसंगांनी मुख्य इतिहासावर आक्रमण केलं आहे, अशी माझी तक्रार होतीच. आणि तरीहि या चित्रपटांतल्या त्या काल्पनिक प्रणयी जोडप्यांत झालेला एक संवाद मला नेहमी आठवतो. त्यांतील प्रियकर आपल्या प्रेयसीला—आजच्या फॅशन्‌प्रमाणे—नांवाने हाक मारतो. चार–दोनदा ऐकून घेऊन ती खेडवळ प्रेयसी—नांव बहुधा ' सरू '—त्याला म्हणते—

' नांवानं हाक मारूं नाही ! '

प्रियकर विचारतो— " कां ? काय होतं ? "

ती उत्तर करते " चव राहात नाही ! "

इतक्या सोप्या आणि इतक्या थोड्या शब्दांत आज विवाद्य ठरलेल्या एखाद्या प्रश्नाचं उत्तर देणं कोल्हापुरांतील मराठमोळा भाषेलाच शक्य आहे, असं मला वाटतं ! वास्तविक याच प्रश्नाचं उत्तर प्राचीनांनी संस्कृत सुभाषितांनंहि दिलं आहे—

**आत्मनाम गुरोर्नाम नामातिकृपणस्य च ।**
**श्रेयस्कामो न गृण्हीयात् ज्येष्ठापत्यकलत्रयोः ॥**

स्वतःचं नांव, गुरूचं नांव, अत्यंत चिक्कू माणसाचं नांव, सर्वांत मोठ्या मुलाचं नांव आणि पत्नीचं नांव—एवढी नांवं घेऊं नयेत, असा एक जुना दंडक आढळतो. या दंडकाचा अर्थ, अति आदर आणि अति तिरस्कार या दोहोंच्याहि स्थानांचा उच्चार आपण तोंडाने करायचा टाळतों, किंवा टाळावा, एवढाच. पण तो कां ? हें मात्र स्पष्ट दिलेलं आढळत नाही.

नेपोलियन् म्हणत असे, मी जर ओळीनं तीनदा पॅरिसच्या एखाद्या नाटकगृहांत दिसलों, तर लोकांना माझी किंमत कमी वाटूं लागेल. पण याचं कारण काय ? आपण आपल्या आदरस्थानांचं नांव उच्चारणं कां टाळतो ? नेपोलियन् स्वतःचं दर्शन जास्त सुलभ होऊं नये म्हणून कां खबरदारी घेत असे ? जुने लोक बायकोचं नांव कां घेत नसत ? राजे-रजवाड्यांच्या नांवाचा तर उच्चार करीतच नसत, पण त्यांच्यांसमक्ष त्यांना द्वितीय पुरुषांतहि संबोधीत नसत. 'तुम्ही अनुज्ञा द्या' किंवा 'आपण आज्ञा द्या' असं देखील न म्हणतां, 'श्रीमंतांनी अनुज्ञा द्यावी' 'खाविंदांनी आज्ञा करावी' असा तृतीय पुरुषी, म्हणजेच अप्रत्यक्ष उल्लेख करीत. 'लाचार', 'तोंडपुज्या', अशा पौर्वात्य लोकांतच ही चाल होती असं नव्हे, तर 'स्वातंत्र्य–प्रिय' अशा पाश्चात्यांतहि होती. 'युवर् हायनेस्' 'युवर् एक्सेलन्सी' 'युवर् मॅजेस्टी' यांसारख्या दरबारी संबोधनांची संख्या भारतीय भाषांपेक्षा इंग्रजींतच अधिक आढळेल. पण नांव न घेण्याचा, उघड संबोधन टाळण्याचा हा प्रकार काय म्हणून ? 'आदर...' 'आदब...' 'परंपरा...' शंभर कारणं दिलीं जातील ! पण 'येसूबाई' या चित्रपटांतल्या त्या खेडवळ उपनायिकेनं जें उत्तर दिलं, तितकं समर्पक, सूचक आणि खोल उत्तर मी तरी कुठे ऐकलेलं नाही. '**चव राहात नाही !**'

जीवनांतल्या सुंदरांत सुंदर, आवडत्यांतल्या आवडत्या गोष्टींचा उपभोग, 'चव राखून' घ्यायचा असतो, असा तर त्या खेडवळ मुलीच्या उत्तराचा अर्थ नसेल ? इंग्रजींत 'जीवनरूपी पक्वान्न खाण्याची कला' अशा अर्थाचा एक शब्दप्रयोग आहे. ('Eating the cake of life') इतकंच नव्हे, तर आधुनिक काळांतल्या माणसांना हें पक्वान्न चाखायचं कसं तें कळत नाही, असंहि इंग्रजींत म्हटलेलं आढळतं.

जीवन सुंदर आहे, रुचिर आहे, चवदार आहे, पण त्याची चव राखणं, तें जीवन जगणारांच्यावर—तुमच्या आमच्यावर—आहे. हाच त्या मुलीच्या खेडवळ उद्गारांचा अर्थ नसेल ना ?

जुन्या पडद्याच्या चालीची गोष्ट निघाली की, आपण ती चाल 'मुसलमानांपासून घेतली;' 'मुसलमानी राज्यकर्त्यांच्या अत्याचारांमुळे ती चाल पडली' इ. खुलासे घाईघाईने करतों ! – म्हणजेच कुणी तरी शाळाखात्यांतल्या इतिहासपंडितानं इंग्रजी पुस्तकांतून उचललेले खुलासे पोपटाप्रमाणे पाठ म्हणतों. त्यामुळे पडद्याच्या चातलींल्या सौंदर्याचा विचार करण्याचं आपल्या मनांतच येत नाही ! जी चाल त्या क्रूर परकीय आक्रमकांमुळे आम्हांला पत्करावी लागली, ती दुष्टपणाचीच असली पाहिजे, असं आम्ही ठरवल्यामुळे, तिच्या सौंदर्याचा विचार करणं आम्हांला अशक्य होऊन बसलं आहे. पण पडद्याच्या चालीचं मूळ स्त्रियांच्या शीलरक्षणांत नसून सौंदर्यवर्धनांत आहे. एक तर प्राचीन संस्कृत वाङ्मयांतसुद्धा 'अन्तःपुर,' 'असूर्यम्पश्या,' 'अवगुण्ठनवती' हे शब्द आढळतातच. राजघराण्यांतल्या स्त्रिया राजवाड्याच्या आंतल्या चौकाच्या बाहेर येत नसत; त्यांना सूर्यदर्शन देखील घडत नसे, व ही त्यांच्या मोठेपणाची खूण म्हणून सांगितली जाई. त्या बाहेर पडल्या, तरी त्यांनी आपल्या अंगावर बुरखा घेतलेला असल्यामुळें त्यांचं वर्णन 'अवगुण्ठनवती' असं केलेलं आढळतं. बुरखा आणि पडदा यांचा उगम मुसलमानांच्या अत्याचारांत नसून भारतीयांच्या संस्कृतींत आहे, असं प्राचीन संस्कृत वाङ्मय वाचणाराला दिसून येईल. स्त्रियांना पडद्यांत आणि बुरख्यांत ठेवायच्या, तें त्यांना कोणी पळवून नेईल म्हणून नव्हे, तर त्या पुरुषांत फार मिसळल्यानं त्यांच्या सहवासांत 'चव' राहात नाही म्हणून !

जीवनरूपी मिष्टान्न खाण्याच्या कलेंत – किंवा संसाररूपी ‘ खेळ खेळण्या ’च्या कलेंत – म्हणा हवं तर, खुषीच्या लपवालपवीचं स्थान किती महत्त्वाचं आहे, याचा विचार तर्कपूजक आणि ‘ प्रगति ’–पूजक आधुनिकांनी कधीच केलेला नाही. ‘ स्वातंत्र्य ’ हें त्यांचं ध्येय आहे. अन् बुद्धिवाद हें त्यांचं एकमेव शस्त्र आहे. पण स्वातंत्र्य हेंहि एक ‘ साधन ’ आहे, ही गोष्ट आमचे स्वातंत्र्यपूजक आधुनिक विसरतात. जीवनाचं रहस्य हस्तगत करणं, जीवनाचा आनंद लुटणं हें ‘ साध्य ’ आहे. स्वातंत्र्य हें त्याच्या अनेक साधनांपैकी एक साधन आहे. अन् ‘ प्रगति ’ ही काय भानगड आहे, हें तर माझ्यासारख्या सौंदर्यवाद्यांना कळतच नाही ! कारण शहरांतली गर्दी वाढणं, रस्त्यावरचे अपघात वाढणं, रोगांची संख्या वाढणं अन् ॲटम् बॉम्‌चा घातकपणा वाढणं, हें सर्व ‘ प्रगतीं ’तच अन्तर्भूत होत असतं ! जी प्रगति जीवनांतलं सौंदर्य वाढवीत नाही, ती दुर्गतीकडे जाणारी द्रुतगति होय, असं मला तरी वाटतं !

निदान जीवनाचा खेळ खेळायला असल्या औद्योगिक प्रगतीचा उपयोग नसून, तो खेळ शक्या तेवढ्या लवकर संपवण्याला कदाचित् तिचा उपयोग असलाच तर आहे, असं मी मानतों. पण तें कांहीहि असो, मानवी जीवनांत ‘ धावण्या ’चं स्थान कोणतं, तें यंत्रपूजक पाश्चात्यांनी ओळखलं असलं, तरी लपण्याचं, शोधण्याचं — अन् शोधल्यानंतर सापडण्याचं स्थान कोणतं, याची त्यांना अलीकडे विस्मृति झाली आहे खास. जीवन ही एक धावण्याची शर्यत आहे, असं यंत्रपूजक, ‘ पण्यपूजक ’ पाश्चात्यांनी एकोणिसाव्या शतकापासून ठरवून टाकलं आहे. ‘ रेस् ’चीसुद्धा गम्मत, ती एक ‘ क्रीडा ’ मानली तरच आहे ! खेळांतली स्पर्धा म्हणून पळण्यांत जो आनंद आहे, तो

आनंद वाघ मागे लागला असतां पळण्यांत नाही. आजच्या पाश्चात्य जगाची प्रगति वाघ मागे लागलेल्याच्या ' प्रगती ' सारखी आहे !

जीवन म्हणजे भयभीतांची पळापळ नसून क्रीडातुर लोकांची ' आँख मिचौली ' आहे, ही प्राचीनांची भावना होती. लपण्याचं, गुप्ततेचं, आणि पडद्याचं महत्त्व खेळ खेळणारांनाच समजू शकतं. जीव घेऊन पळणारांना फक्त पळण्याचं – म्हणजेच ' प्रगती 'चं — महत्त्व माहीत असतं. "**पूछिये मयकशोंसे लुत्फे शराब । ये मजा पाकबाज क्या जाने ?**" शराब पिण्यानं होणार आनंद, शराब पिणारांनाच विचारा. त्याची मजा नीतिबाज लोकांना कुठून कळणार ? आजच्या गर्दीच्या, वृत्तपत्रांच्या, चित्रपटांच्या आणि अतिपरिचयाच्या जगांतून जर कोणती एक बहुमोल चीज नाहीशी झाली असेल, तर ती म्हणजे — अन्तर, आडपडदा, अन् रहस्य ! पण पडद्याशिवाय रहस्यमयता नाही; रहस्याशिवाय कुतूहल नाही; कुतूहलाशिवाय आदर नाही ! — आणि आदराशिवाय जीवनाला ' चव ' नाही ! पण आजच्या जीवनाची सर्व धडपड मात्र सर्व पडदे फाडण्याकरतां, – सर्व जीवन उघड करून टाकण्याकरतां आहे. पुरुषाला स्त्रीबद्दल कुतूहल नाही; स्त्रीला पुरुषाबद्दल गूढ भय ( म्हणजेच आदर ! ) नाही; मुलांत आणि आईबापांत इष्ट असं अन्तर उरलं नाही ! कनिष्ठाला वरिष्ठांबद्दल भय नाही; रयतेला सरकारबद्दल धाक नाही. सर्वांनी सर्वांचा अंदाज घेऊन टाकला आहे;— वजन जोखून टाकलं आहे ! किंबहुना कुणाला कुणाची अपूर्वाई वाटू नये हाच जणू आजच्या सवंग प्रसिद्धी साधनांचा हेतु आहे !

या देशांत विद्यापीठें स्थापन झाल्याला शंभर वर्षं झालीं. त्यानंतर सुमारे पंचवीस वर्षांनी आगरकरांसारखे नास्तिक आणि पंडिता रमाबाईसारखी बाटलेली आस्तिक, यांनी स्त्रियांना दास्यमुक्त करण्याची चळवळ

हातीं घेतली. या देशांतले पुरुष स्त्रियांना तुच्छ लेखण्यांत आणि निरक्षर ठेवण्यांत पुरुषार्थ मानीत, हें खरं आहे. ती स्थिति जायला हवी होती हेंहि खरं आहे. पण स्त्रियांचा छळ बंद करणं म्हणजे स्त्रियांना पुरुषांच्या क्षेत्रांत आणून ठेवणं, असा या दोघा पंडितांनी अर्थ केला. त्यानंतर कै. धोंडो केशव कर्वे यांना जपानमधल्या एका स्त्रीशिक्षणविषयक चोपड्या-मुळे स्त्रियांकरिता वेगळं विद्यापीठ काढण्याची कल्पना सुचली. पण हे सगळेच बुद्धिवादी आणि उपयुक्ततावादी असल्यानं, स्त्रीचा आणि पुरुषाचा उपयोग त्यांना सरासरी एकच, – म्हणजे द्रव्यार्जन करणारं सजीव यंत्र एवढाच–वाटत होता. त्यामुळे पुरुषांत आणि स्त्रींत असलेलं अंतर शक्य तेवढं कमी करणं एवढंच त्यांचं उद्दिष्ट होतं. स्त्रीपुरुषांच्या आकर्षणाची या रुक्ष तर्कपंडितांना फारशी खबर नव्हती. या तिघांत जी स्वतः स्त्री होती, ती तर बुद्धीनं आणि पांडित्यानं पुरुषापेक्षा पुरुष होती. अन् शिवाय तिच्या तर्कटीपणांत धर्मान्तरिताच्या धर्मवेडेपणाची भर पडलेली असल्यानं, तिचीं मूल्यंच कृत्रिम बनलेलीं होतीं. एखादी स्त्री पुरुषांच्या दास्यांतून मुक्त होण्यापेक्षाहि, ती धर्मवेडाच्या नव्या दास्यांत पडण्यांत तिला अधिक आनंद होता. अर्थात् या सर्वच सुधारकांना स्त्रीपुरुषांचं आकर्षण आणि त्याचं समाजसंस्थांतलं स्थान यांचा विचार करण्याइतपत कल्पनाशक्तीहि नव्हती, कीं मनाचा तोलहि नव्हता. त्यामुळे महाराष्ट्रांतल्या सुधारकांनी स्त्रियांच्या दास्याबरोबरच स्त्रियांना स्त्रीत्वाचीहि इतिश्री करण्याचा चंग बांधला. स्त्रियांना पुरुषांचें शिक्षण घेण्याचा, पुरुषांत मिसळण्याचा हक्क मिळाला; पण पुरुषांवर गुप्त हुकुमत चालवण्याचा, पुरुषाला केवळ आपल्या अस्तित्वानं प्रेरणा देण्याचा त्यांचा हक्क नाहीसा झाला !

हें आकर्षण आणि ही प्रेरणा, गुप्त म्हणण्यापेक्षा अप्रत्यक्ष असते.

पुरुषांना प्रत्यक्ष प्रोत्साहन देण्याचंहि कार्य रजपुतांच्या आणि मराठ्यांच्या इतिहासांत स्त्रियांनी केलं आहे. क्वचित् त्यांनी गलितधैर्य पुरुषांची निर्भत्सनाहि केली आहे. पण ही त्यांची खरी शक्ति नव्हे, कीं खरी भूमिकाहि नव्हे. त्यांची खरी भूमिका म्हणजे पुरुषांच्या क्षेत्रापासून दूर असून, त्यांचं मन मात्र अहोरात्र व्यापून टाकणं; स्वतः दुर्बल राहून पुरुषाला शूर कर्माला प्रवृत्त करणं; स्वतःच्या परावलंबित्वानंच पुरुषाच्या कर्तृत्वाला प्रोत्साहन देणं; स्वतःच्या लाजाळूपणानं पुरुषाला शृंगारातुर बनवणं. सारांश, स्त्री जितकी अगतिक आणि अकर्तृक राहील, जितकी अधोमुख आणि पराङ्मुख राहील, जितकी पडद्यामागे (In the back ground) आणि मागील दारीं राहील, तितकी ती पुरुषावर अधिक हुकुमत गाजवील व पुरुषाला अधिक स्फूर्तीहि देईल. उलट जितकी ती पुरुषाशीं सदृश, सम्मुख आणि सन्निध राहील, तितकी तिची शक्ति आणि हुकुमत कमी होईल. ‘अतिपरिचयात् अवज्ञा’ असं म्हणतात. स्त्रीपुरुषांच्या बाबतींत मी असं म्हणेन की, अतिपरिचयामुळे दोघांचाहि सामर्थ्य-नाश होतो. उलट ‘अपरिचया’मुळे आकर्षणमूलक सामर्थ्य वाढतें.

आजच्या अनेक दुःखांचं मूळ मी ‘पडद्या’च्या अभावांत किंवा अतिपरिचयांत आहे, असं म्हणेन. आज विद्यार्थ्याला गुरु दुर्लभ उरलेला नाही, श्रोत्याला वक्ता किंवा गायक दुर्लभ उरलेला नाही. पतिपत्नीला एकमेक दुर्मिळ उरलेले नाहीत. “गुरोस्तु मौनं व्याख्यानम्” ही स्थिति जाऊन गुरूची नित्यनियमानं होणारीं व्याख्यानं टाळायचीं कशीं हा शिष्यापुढे प्रश्न आहे! ज्यांचं गायन ऐकण्याचा योग कधी येईल अशी श्रोते वाट पाहात, त्यांचं गायन घर-बसल्या ऐकूं येऊं लागलं, तर कामांत व्यत्यय नको म्हणून रेडिओ बंद करण्याचा हा

जमाना आहे. (स्वतःच्या पश्चात् आपला असा अवमान होऊं नये, म्हणून रेडीओसारख्या सर्वगामी आणि सर्ववांच्छित माध्यमाला लाथ मारणारी केसरबाई लाखांत एखादीच!)

आधुनिक युगांत प्रत्येक वस्तु सुलभ आणि सन्निध करण्याच्या नादानं आपण दुर्लभतेची आणि दूरतेची महती विसरूं लागलों आहोंत. मीलनाची मौज प्रतीक्षेनंच वाढते. मी माझी जाहिरात करण्यापेक्षा दुसऱ्याला मला शोधावं लागलं तर माझी किंमत वाढेल, गोडीहि अधिक कळेल. मी एखाद्याला कमी भेटलों, तर जेव्हा एकदा भेटेन तेव्हाची भेट अधिक गोड होईल. मी माझं अन्तरंग झाकलं, तर तें जाणवून घेण्याची दुसऱ्याला अधिक उत्कंठा लागेल. ही दृष्टीच आजच्या प्रचाराच्या अन् जाहिरातीच्या युगांत नष्ट झाली आहे. पण माझी किम्मत दुसऱ्याच्या लेखीं वाढावी म्हणूनच केवळ नव्हे, तर माझी मला स्वतःला किंमत वाटते म्हणून देखील मी पडद्यामागे राहीन. लोकांना माझा शोध लागण्यांत जी लज्जत आहे, ती, मी आपण होऊन माझी जाहिरात करण्यांत नाही. पण एका घरावर दहा पाट्या लावणाऱ्या आजच्या युगाला, मौनाची आणि गोपनाची ही महती कळायची कशी ?

सर्वांनीच अबोल आणि गुप्त राहावं, असं मी म्हणत नाही. पण संयम, लज्जा आणि मौन हाच ज्यांचा स्वभाव, — अन् यांतच ज्यांचा प्रभाव, त्यांना मिसळण्याचं, मिरवण्याचं आणि वाचळपणाचं शिक्षण मुद्दाम देण्याची तरी गरज नाही. पाश्चात्य देशांतलीं शेकडों कला-प्रदर्शनं पाहिलेला एक चित्रकार मित्र मला परवाच म्हणाला, “प्राचीन भारतीय कलावन्तांत आणि आधुनिक कलावन्तांत हा फरक आहे. तिकडच्या कलाकृति जणू आपल्या कलावन्ताचं नांव पुकारून तुम्हांला हाका मारीत असतात. “मी पिकॅसो!...

...माझ्याकडे बघाना!" हें एक प्रकारें रस्त्यावर उभं राहून गिऱ्हाईक गांठणंच नव्हे का ? प्राचीन भारतीय कला, कुलीन आणि शालीन होती. तीं आपल्या जनकाचं नांव घ्यायला लाजत असे. रस्त्यावर त्याच्या नांवाचा बाजार मांडणं तिला आवडत नसे. अजंठा आणि वेरूळ या कलेच्या दोन तीर्थक्षेत्रांत कलावंतांच्या पिढ्यांच्या पिढ्या आपले जन्म अर्पून गेल्या. पण त्या कलावंतांनी अज्ञात राहण्यांतच आनंद मानला. अन् नांव सांगून तरी फायदा काय ? कलावंतांनी आपलीं नांवं गुप्त ठेवलीं, तरी कलाकृतींचीं आणि स्थलांचीं नांवं तरी महशूर झालींच. आम्ही त्यांचा आदर कोणता केला ? 'ताजमहाल हॉटेल', 'अजंठा हॉटेल' 'ताजमहाल स्टोअर्स' 'अजंठा सिगारेट्स' 'चार मिनार ब्लेडस्' असा आम्ही त्या नांवांचा बाजारच मांडला ना ?

अखिल सृष्टिसौंदर्याचा निर्माता, कलावंतांचा कलावंत, कवींचा कवि, प्रेमिकांचा सम्राट्...तरी आपला सुगावा कुठे लागूं देतो ? गुप्त, अज्ञात, अज्ञेय अन् पडदानशीन राहण्यांतच त्याला धन्यता वाटते. म्हणूनच त्याची ओढ अन् त्याची 'खौज' कांही थोड्या महात्म्यांना लागून त्यांचं जीवन-धन्य होत असतं. तो प्रकट असतां, तर आजच्या बाजारी दुनियेनं त्याचाहि बाजार मांडला असता !

अति सुंदर, अति पूज्य आणि अत्यंत प्रिय वस्तू पडद्यांत राहण्यांतच स्वारस्य आहे; कधी कधी तर त्यांना शब्दांचा चवाठाहि सहन होत नाही. मनुष्यकृत वर्णनांनीं आणि प्रतिमांनी त्यांचा अवमान होतो. मूर्तिपूजेला असलेल्या विरोधाचं खरं इंगित, या आत्यन्तिक पूज्यभावांत आहे. ज्याच्या दर्शनानं डोळे दिपतील, ज्याच्या चिन्तनानं वाणी स्तिमित होईल, तें तेज आणि तें सौंदर्य अनिर्वचनीयतेच्या पडद्यांतच राहूं शकतं. पडदा ही रूढि नव्हे; पडदा हा एक दैवी कायदा आहे.

पडदा हा सौंदर्यसृष्टीचा नियम आहे. सौंदर्य आणि पडदा यांचं साहचर्य अनिवार्य आहे. थोडीशी चाहूल लागणं आणि बरंचसं लपणं, हें सौंदर्याचं वैशिष्ट्य आहे. थोडंसं हातांत गवसणं आणि बरंचसं हातांतून निसटणं, हें सौंदर्याचं लक्षण आहे. सौंदर्य हातांत पकडून, बाजारांत मांडू पाहणारे लोक वंचित झाल्याशिवाय राहात नाहीत.

आपला यत्न फुकट आहे एवढं जरी त्यांना कळलं, तरी ते सौंदर्याच्या बरेच नजीक पोहोचले, असं समजावं ! मराठींतला सर्वश्रेष्ठ सौंदर्यपूजक म्हणतो—

ज्योतिर्मय सखिची ही कान्ति ।
वाटे की मुरवावी स्वान्तीं ।
झुकाण्डीच दे ! येई न हातीं ।
ही माया निज संहरा, हरा !
घट भरा शिगोशिग भरा भरा ॥

— तांबे —

## १३

# गप्प बसायला काय घ्याल ?

थर्डक्लासमधून प्रवास करणारांच्या हालांचीं वर्णनें आजपर्यंत निरनिराळ्या लेखकांनी इतक्या परोपपरींनीं केलीं आहेत की, एखादे वेळीं वर्णनापेक्षा कमी त्रास झाला तरच चुकल्याचुकल्यासारखें वाटतें. वेटिंगरूममधील घाण, डब्यांतील बेकायदेशीर जमाव, गाडीचें व तिकीट कलेक्टरचें उपमर्दकारक वर्तन, डब्यांतील अशिक्षित व आडदांड वाटसरूंशीं होणारी बाचाबाच अगर ' एकपक्षीं मारामारी वगैरे गोष्टी आतां उतारूंच्या नियमापेक्षाही सर्वांस अधिक परिचित झाल्या आहेत व अंगवळणीं पडल्या आहेत. किंबहुना त्या नसल्या तरच कसेंसें होतें. आणि असेंच मलाहि त्या दिवशीं प्रथम झालें; पण शेवटीं भ्रम नाहीसा झाला.

त्या वेळीं मी पुण्यास फर्ग्युसन कॉलेजांत ज्युनिअर बी. ए. च्या वर्गांत होतों. कॉलेजांत गेल्यापासून दर टर्मला तीन वेळ याप्रमाणे वर्षांतून निदान सहा वेळां तरी सदर्न मराठ्याचा प्रवास अगर गडकऱ्यांच्या हिशेबाप्रमाणे सवाई फाशीची शिक्षा भोगून मी त्या बाबतींत अगदी अमर झालों होतों. थर्डक्लास गेटवर गर्दी असल्यास हमालाच्या डोक्यावर बोजा देऊन, आपण टोपी खिशांत घालून, बूट वाजवीत सेकंडक्लास गेटने पसार कसें व्हावें, गाडी प्लॅटफॉर्मवर लागली नसल्यास, डबे घेऊन निष्प्राण स्थितींत एंजिनरूपी आपल्या वल्लभाच्या भेटीची वाट पहात अंधारांत जेथें उभी असेल तेथें तिला नेमकी ओळखून कशी गाठावी, काबुली मुशाफराशीं सरासरी दोन अडीच हिंदुस्थानी वाक्यें कशीं बोलावीं, साखळी ओढण्याची धमकी केव्हा द्यावी, निजलेल्या राजश्रींच्या कानांत "आम्हीहि पैसेच दिले आहेत" ही भुपाळी कशी आळवावी—किंबहुना वेळ प्रसंगीं मनुष्य पाहून प्रेमाने मानेखाली हात देऊनहि—"सोनेका ये समय नहीं मेहेरबान जागो" हें कसें पटवून द्यावें, निव्वळ बायकांच्या जन्माला आल्याच्या जन्मसिद्ध हक्काच्या जोरावर बेगुमानपणें पसरणाऱ्या धेंडास, बायकांकरिता वेगळा डबा असल्याची आठवण कशी करून द्यावी, वगैरे प्रत्येक गोष्टींत मी अगदी तरबेज झालों होतों!—म्हणजे चुकत नसे असें मात्र नाही! एकदा एका मुसलमान पॅसेंजरच्या पायास माझा चुकून पाय लागला. तो गुरगुरावयास लागावयाच्या आंतच मी माझ्या सवयीप्रमाणे 'सॉरी' म्हणून मोकळा झालों. परंतु त्यासरसा तो जास्तच उसळून "पावपर पाव रखते हैं और गाली देते हैं" करून अंगावर आला! शेवटीं, डब्यांत असलेल्या एका मुसलमान कॉलेज स्टूडंटने 'सॉरी' ही गाली नव्हे हें त्यास दाढीस हात लावून समजावून दिलें, म्हणून अधिक प्रसंग टळला.

पण हो ! विषयान्तर झालें !

त्या दिवशीं कोणतीहि मोठी सुटी वगैरे नसतां, मौजेखातर मी पुण्याहून गावीं निघालों होतों. पावसाळा ऐनरंगांत असल्यामुळे प्रवाशांची संख्या थोडी कमी होती. मला वाटतें कोणतासा सणहि त्याच दिवशीं पडत होता. त्यामुळे गाडी अगदीच भकास दिसत होती. वेळ सकाळची असल्यामुळे जागरण वगैरेचाहि प्रश्न नव्हता. मीहि स्नान वगैरे आटोपून, स्टेशनवरील इराण्याच्या दुकानांत चहाची द्वितीयावृत्ति करून, त्या दिवशींचा ज्ञानप्रकाश घेऊन, त्यांतल्यात्यांत सुंदर डब्यांत बसता झालों. मला एकंदर रेल्वेसृष्टीचा नूरच वेगळा वाटूं लागला ! मला वाटलें, मी चुकून पलीकडल्या प्लॅटफॉर्मवरील बॉम्बे एक्सप्रेसमध्ये तर बसलों नाही ना ? क्षणमात्र, आज डब्यांत चिरपरिचित मारामारी तर राहोच, पण कसलाच त्रास होणार नाही कीं काय, असें वाटून, मनाला ' भाविक हुरहूर ' लागली.

डब्यांत पाहतों तों एका कोपऱ्यांत एक सुशिक्षित—आमच्याच कॉलेजमध्ये प्रीव्हियसमध्ये तिला पाहिल्याचाहि मला भास झाला-- तरुणी खिडकीबाहेर नजर लावून बसलेली ! माझ्या पोटांत धस्स झालें ! डब्यांत गर्दी नसण्याचें वेगळेंच कारण असावें अशी मला बळकट शंका आली. सर्कसमधील सुशिक्षित जनावराप्रमाणे मी ताडकन् डब्याबाहेर उडी टाकली, आणि डब्यावर कोठेतरी इंग्रजी, मराठी, कानडी, तेलगू, बंगाली, कशांतहि ' बायकांकरिता ' असें लिहिलें आहे कीं काय तें पाहिलें. हो ! नाही तर आंत मी, आणि बाहेर ' बायकांकरतां ' अशी पाटी, असा प्रकार व्हावयाचा ! पण तसें कांही केल्या दिसेना. तेव्हा जिवांत जीव आला. पुन्हा, धीर करून आंत शिरलों. सामान व्यवस्थितपणें ठेवलें. डोक्याची टोपी, बाकावर ताजा ज्ञानप्रकाश

आंथरून त्यावर ठेवली. आणि समोर धापा टाकीत उभ्या असलेल्या बॉम्बे एक्सप्रेसजवळ जाऊन टाईम्स, क्रॉनिकल कांही तरी घेण्याकरिता मी निघालों. जातां जातां मी त्या तरुणीकडे, 'सामानाकडे लक्ष ठेवल्यास तुम्हांलाहि वाचावयास मिळेल' अशा दृष्टीने पाहिलें व 'ए क्रॉनिकल' अशी गर्जना करीत निघून गेलों. अपेक्षेप्रमाणे मुंबईच्या गाडींत कित्येक ओळखीची मंडळी भेटली व मी परत आपल्या गाडीकडे आलों. पाहतों तों माझ्या डब्याचें स्वरूप बरेंच पालटलेलें दिसून आलें. तथापि तें नेहमीप्रमाणें झालेलें नव्हतें. आणखी चारदोन मंडळी डब्यांत येऊन बसली होती इतकेंच. सर्वच मंडळी शांतताप्रिय दिसली. त्यामुळे आजचा प्रवास अखेरपर्यंत सुखाचा होतो कीं काय अशीहि मला धास्ती पडली. पण देवाला काळजी !

कां कोण जाणे, नवीन मंडळी डब्यांत येतांच डब्यांतील तरुणीने आपली जागा बदलून माझ्या बाकावर ठाणें दिलें होतें. एका दृष्टीने तिचें करणें सोइस्कर होतें, हें मला मागाहून कळून आलें. एकट्या मुलीने एका कोपऱ्यांत बसणें म्हणजे डब्यांतील पायघोळसंतांच्या कुतूहलाचा विषय होणें होय, हें तिच्या केव्हाच ध्यानांत आलें. व म्हणून तिने साधारण आपल्याच जातीचा प्राणी पाहून व मजजवळच्या वर्तमानपत्रांवरहि नजर ठेवून, माझ्या बाकावर येणें केलें असावें. गाडी सुरू होईपर्यंत जाग्यावर म्हणून बसावयाचें नाही, असा माझा ठराव होता. अखेर गाडीची शीट झाली. मी दार उघडून आंत शिरलों व आपल्या जागेवर अधिष्ठित झालों. क्रॉनिकल उघडून त्यांत डोकें खुपसण्याचे आधी माझे सहचर कोण आहेत हें सहज पहावें म्हणून मी डब्यांतील मंडळींवर दृष्टि फेकली. माझ्या समोरील बाकावर पोक्त वयाचे एक गृहस्थ कानावरून रुमाल बांधून खिडकीचें दार महाप्रयासाने लावून घेऊन बसले होते.

शेजारींच एक तेराचवदा वर्षांची बालिका गप्प बसण्याची शिक्षा भोगीत होती. खिडकीशीं बसती, तर तिची बरीच करमणूक झाली असती. परंतु अपघात टाळण्यासाठीं, तिच्या प्रेमळ मातापितरांनी मुद्दाम तिला आपल्या दोघांच्यामध्ये बसवलें होतें असें मला पुढे कळून आलें. पलीकडे पस्तीस ते चाळीस वर्षांची तिची म्हातारी आई—तिच्या चर्येवरून तिला म्हातारी म्हणणें प्राप्त होतें—चिंताक्रान्त बसली होती. मी त्यांच्याकडें पाहिले मात्र आणि "तिसऱ्या वर्गांतील उतारूंच्या हालांना" सुरवात झाली ! देवा ! यापेक्षा रात्रीच्या वेळीं झोपेने पेंगुळलेल्या मेंढरांच्या गर्दीत बसलों असतों तरी कमी त्रास झाला असता की रे ! पण धुळ्याच्या जावडेकरांच्या अगर गडकऱ्यांच्या कल्पनेंतहि नसेल असा चिवट त्रास सोसण्याचें माझ्या व माझ्या शेजारच्या सुशिक्षित तरुणीच्या पत्रिकेंत आहे हें मला आधी काय ठाऊक ?

"या पावसानं तर अगदी भंडावलं बुवा ! हीं खिडक्यांचीं दारंसुद्धा फुगल्यामुळे लागत नाहीत मला वाटतं." गृहस्थ खिडकीच्या दाराशीं मस्ती करीत म्हणाले.

फार लांबणार नाही या आशेने मीहि "हं" असें किंचित् हंसून म्हटलें व क्रॉनिकलमध्ये फिरून अंतर्धान पावलों. पण छे ! आता कशाचा क्रॉनिकल !

"आपल्याला कुठे जायचं ?" गृहस्थाने माझ्या कानांचा पुरा कब्जा घेतला.

"साताऱ्यास." मी क्रॉनिकलकडे पाहात उत्तर दिलें.

"पुण्यास काय शिकायला असतां वाटतं ?" गृहस्थाने प्रश्नमाला सुरू केली.

"हो." मी नाखुषीने एकाक्षरी उत्तर दिलं.

"काय शिकतां ?"

आता काय करावें या लचांडाला ! मी क्रॉनिकल घेतला कशाला ? "ज्यूनिअर बी. ए."

"मॅट्रिक पास झालं असाल." गृहस्थांनी चाणाक्षपणें प्रश्न केला.

माझ्या शेजारची तरुणी प्रयासाने हास्य आवरून तोंड लपविण्या-करतां, मला न विचारतांच माझा ज्ञानप्रकाश घेऊन वाचूं लागली.

याहि प्रश्नाला मी वर न पाहतांच "हं" एवढेंच उत्तर देऊन पुढे वाचूं लागलों.

"म्हणजे आता बी. ए. व्हायला किती अवकाश आहे ?" गृहस्थांनी प्रश्न केला.

"दोन वर्षं." मी नाखुषीने उत्तर दिलें.

"अन् मग पुढे ?"

'कपाळ तुझें पुढे !' मी मनांत मोठ्याने म्हटलें व उत्तर न देतां वाचूं लागलों.

"एल्.एल्. बी. होऊन वकील व्हायचं असेल मनांत ?" गृहस्थ आपणच अजमास करते झाले.

"हो, पहावं पुढे." मी म्हणालों.

"काय हो, जो उठतो तो वकील होतो; इतक्यांनी पक्षकार कोठून आणावयाचे ?" गृहस्थ आपल्या भाषणांतील खोच मनांत आणून आत्मतृप्त होऊन ऐटींत हसूं लागले.

"हो. तेंहि खरंच."

"लग्न वगैरे झालं असेलच ?"

प्रत्येक प्रश्नाला मोठ्या नाखुषीने उत्तरें देत असूनहि हक्काने एकापुढें एक प्रश्न विचारणाऱ्या त्या गृहस्थाच्या तोंडाला आता काय करावें असें

मला झालें. माझें सामान फेकून देऊन जागा उपटली असती, तर मी त्याला सामानासकट खाली फेकला असता. माझ्या खिशांत हात घालता, तर तोच हात मी चारचौघांसमक्ष समारंभाने पोलीसच्या हातांत दिला असता. पण कुशलप्रश्नावारी, केवळ खाजगी म्हणून गुंडाळून ठेवलेल्या गोष्टींच्या खजिन्यावर हा धडधडीत हल्ला करीत असून, शासन तर राहोच, पण नुसतें तोंडाने "गप्प बसा" असें स्पष्ट सांगणेंदेखील मुष्कील ! मी प्रश्नांनी व्याकुळ होऊन हातांतील क्रॉनिकल बाकावर आपटला व खिडकीच्या बाहेर तोंड करून ओणवा झालों. तरी माझा पारधी माझी पाठ सोडीना.

"लग्न नाही वाटतं अजून झालं ?" गृहस्थाने पुन्हा विचारलें.

आता याला तिरसटासारखीं वाटेल तीं उत्तरें देत सुटावें असें मी ठरविलें. माझी तारांबळ पाहून तरुणी तोंडावर क्रॉनिकल धरून हसूं लागली. इंग्रजी वर्तमानपत्र एका मुलीने वाचण्याकरिता हातांत घ्यावें, हें पाहून उभयतां नवराबायको आश्चर्यचकित झालीं. व आता प्रश्नांची सरबत्ती माझ्या विद्यालयीन भगिनीकडे वळते कीं काय, असेंहि मला क्षणभर वाटलें. तरी माझें उत्तर कसें टळणार ?

"नाही झालं अजून लग्न."

अजून नाही ? मला वाटतं आता तुम्हांला फार नाही तरी एकवीस बावीसावें वर्ष असेल."

"नाही; मला सध्या एकोणिसावें वर्ष आहे."

"छे हो ! जास्त दिसतं तुमच्या चेहऱ्यावरून." मला आतां खरोखरीच त्या गृहस्थाच्या एक श्रीमुखांत द्यावीशी वाटली ! कोण हा उपद्व्याप ! पण करणार काय ?—"लौकर मिशा वगैरे आल्यामुळे मी दोन वर्षांनी जास्त दिसतों खरा."

"किती सालचा जन्म ?"

एखादा असे प्रश्न विचारूं लागल्यास "काय मुलगी बिलगी द्यायची आहे ?" असा टोमणा मारण्याची चाल आहे. पण चुकून बोलायला जावें तर शेजारीच मूर्ति बसलेली ! थट्टेची मस्करी व्हावयाची !

"एकोणीसशें एक दोन."

"म्हणजे सालदेखील नाही का नक्की ?"

"एकोणीसशें एकच्या अखेरीचा नोव्हेंबर, डिसेंबर." माझ्या लक्षांत तारीख देखील होती. पण ह्या उपटसुंभाला काय म्हणून सांगावयाची ?

इतक्या सुमारास जवळजवळ दहा वाजण्याची वेळ आली असेल. 'निरा' कीं 'सालपा' कोणत्याशा स्टेशनवर गाडी बराच वेळ थांबणार होती. डबा सोडून दुसऱ्या डब्यांत जावें, तर तेथे फिरून ह्याच सर्व प्रश्नांचीं उत्तरें द्यावीं लागणार नाहीत कशावरून ?

आमच्या सद्गृहस्थांच्या गृहिणीने एक मोठा डबा फडक्यांतून बाहेर काढला आणि त्यांतून भारदस्त दशम्या काढून, "नाही म्हणजे काय ? दहा वाजले नि भूक नाही कशी म्हणतेस ? चांगलं पाणी आहे स्टेशनवर तोंवर खाऊन घे. पुढं कुठं आणखी यातायात करीत बसूं ?" असें म्हणून शेजारच्या रुष्ट देवतेपुढे दोन दशम्या व कोरडी भाजी असा नैवेद्य ठेवला, व पतिदेवतेच्या आराधनेस सुरूवात केली.

"म्हटलं, आपणहि घ्यायचं होतं थोडंसं खाऊन म्हणजे आपला पाणी प्यायला आधार."

पाणी पिण्यासारख्या क्षुल्लक गोष्टीला आधाराची जरूर नाही असें वाटूनच कीं काय "छे. आपल्याला नाही बोवा भूक; तूंच घे वाटलं तर खाऊन." असें म्हणून गृहस्थ आमचेकडे मताच्या अपेक्षेने पाहूं लागले.

क्रम ...३८२६९.... वि: निबंध
क ...९४२९०..... नों दि २५।७।६३.



मी मनांत म्हटलें, " खा नाही तर उपाशीं मर. तुमच्या नवराबाय-कोच्या अन्योन्य आग्रहांत मला कशाला ओढतोस आणखी ? " पण छेः—तो म्हणजे असा तसा माणूस नव्हता. त्याने मला पुरताच ओढण्याचा निश्चय केलेला दिसला. किंचित् रहस्यपूर्ण आविर्भावाने त्याने बायकोला कायसें सांगितलें. मी लक्ष दिलें असतें तर सर्व माझ्या ध्यानांत आलें असतें; पण, मी शक्य तितका बाहेर पाहात होतों. आमच्या डब्यांत पाहण्यासारखें कांही नव्हतें म्हणून नव्हे, तर बोलण्याचा वीट येऊन. पाहातो तों काय ? आमच्या बाकावर दोन सुकीं वाढणीं तयार ! एक मला व एक आमच्या सुशिक्षित भगिनीला ! मला वाटलें, माझे ग्रहच फिरले.

काय असेल तें असो; लांबचा प्रवास असला तरीहि मी गाडींत म्हणून कधीच खात नसे. वाटलें तर एखादे वेळीं अंजीर वगैरे फळ घेई. पण तें देखील आंब्यासारखें हातावर पाणी घेण्याची आवश्यकता लागणारें फळ मी कधीच गाडींत खात नसे; पण यांना हें सांगून खरें वाटण्याची काय शाश्वती ? आमच्या सुशिक्षित भगिनीनेहि पुष्कळ सबबी सांगून पाहिल्या; पण दर सबबीगणीक त्या पोक्त बाईस मातृ-वात्सल्याचा पान्हा अधिकच फुटूं लागला.

" अहो, त्याला काय झालं ? घरून तोंड धुऊन आलाच आहांत; चूळ भरून टाका नि खाऊन घ्या दोन घास. तुम्हाला काय पोराला ? अहो, मी तरी कुठं अजून तोंड धुतलं आहे ? "

आपलें उदाहरण म्हणजे महाजनांचें उदाहरण, अतएव अनुकरणीय, अशी त्या बाईची समजूत दिसली. तरुणीला तें पटलें नाहीसें दिसलें. परंतु प्रसंग बाका आहे हें जाणून " दोन नकोत मला दशम्या; एकच लहान आहे ती असूं द्या " असें म्हणून तिने एक दशमी बाईच्या

पानांत मोठ्या चलाखीने परत टाकली देखील. बाईने वरपांगीं "अग बाई, हें काय ? मला तीन कशा जातील ?" असें बराच वेळ घोकलें, पण अखेरीस "शिळें उरवून काय वायाच घालवयाचें कीं नाही ?" आणि "पाणी आहे तों डबा धुऊन घ्यावा आपला, नाही तर पुन्हां मागच्यासारखा वास राहील आठ दिवस." असें म्हणून उरलेल्या दशम्याहि निरुपाय म्हणून चट्ट केल्या.

भाजीबरोबर पहिला घास तोंडांत घातला मात्र; तों आम्हां दोघांच्याहि डोळ्यांना, जणु जन्मजन्मांतरींच्या आठवणी होऊन, नुसत्या धारा लागल्या. गोष्ट इतकी साधी होती, तरी बोलायची सोय नाही. भाजी म्हणजे कसलासा पाला आणि मिरची यांचा निवळ एकान्त होता. त्यांत खोबरें, मसाला वगैरे चवचाल मंडळींना नुसतें डोकावण्याचीहि परवानगी मिळालेली नव्हती. अशी भाजी आणि कोरडी पोळी तोंडांत घालण्यापेक्षा प्रत्यक्ष निखारे दाढेला धरणेंहि सोपें! तरी पण शिष्टाचार राखण्याकरितां आम्हीं दोघांनीहि डोळ्यांतलें पाणी लपविण्याचा मनापासून यत्न चालविला होता. मी आधीच त्रासलेलो. त्यांतून ही दुःखावर डागणी. माझें डोकें नुसतें फिरून गेलें. माझी शेजारीण मात्र खरोखर वस्ताद पोरगी. मी तिची एकेक शक्कल पाहून तोंडांत बोट घातलें. हातांत कडीचा कमंडलू घेऊन, चट्‌दिशीं आठवल्यासारखें करून "पाणी घेऊन येतें बाई आधी; गाडी चालू होईल आणखी." असें म्हणून तिने डब्याबाहेर पोबारा केला व पाण्याबरोबरच एक डझन उत्तम केळीं हातरुमालांत घेऊन डोळेबिळे पुसून पुन्हा पूर्ववत् हंसतमुख डब्यांत हजर! याला म्हणतात माणूस! मी आपला ग्रहदशेला बोल लावून भाजीशिवायच पोळी तोंडांत भरीत बसलों होतों. माझी तारांबळ पाहून आता त्या तरुणीला खरोखरीच हसें आवरेना. तिने प्रत्येकाच्या पानावर

ग्रा. क्र. १२२१९



दोन दोन केळीं टाकलीं व माझ्या पानावर माझी स्थिति पाहून तीन ठेवलीं. त्या नवराबायकोप्रमाणे मी नुसतें "अहो कशाला ?" देखील म्हटलें नाही. मुकाट्याने केळें तोंडांत घातलें व कृतज्ञ नेत्रांनी आभार मानले. हो, नुसतें त्रासून काय होणार ? वेळेवर एकेक सुचावें लागतें.

"अहो, आमच्या या महामायेला सांगितलं होतं चांगलं डब्यांत बचकभर गूळ घालायला; पण तिचं चित्त कामावर असेल तर ना ? सगळं खाण्यांत !" पोळी, भाजी, केळीं यांच्या गर्दीत अडखळणाऱ्या जड जिभेने बाई म्हणाल्या.

"असूं द्या. विसरल्यावर बोलून काय फायदा ?" तरुणी मुलीकडे पाहत म्हणाली. मुलगी गालाच्या पुऱ्या करून बसली होती.

फराळाचा समारंभ आटपत आला. अरे राम ? पुन्हा प्रश्न सुरू होणार कीं काय ? पण माझ्या सुदैवाने आता सावज आणि पारधी दोन्हीहि बदलले होते. आमचे सद्गृहस्थ जरा आडवे झाले, आणि ठाकठीक वेणीफणी करून टाइम्स वाचणाऱ्या मुलींतहि मराठी बोलण्याइतकी माणुसकी आहेसें पाहून, बाईंनी तरुणीवर मोर्चा बांधला.

"हे कोण तुमचे ?" माझ्याकडून तोंड फिरवून बाईंनी आमच्या तरुणीला जणूं खाजगी प्रश्न केला. झालें; पुन्हा माझा संताप झाला. "आमच्या लोकांना मॅनर्स नाहीत !" तरुणीने बिलकुल न डगमगतां प्रसंगावर लक्ष देऊन सहज उत्तर केलें, "मावसभाऊ." मी प्रश्नाने जितका गरम झालों तितकाच उत्तराने गार झालों. काय ही सहज विनोदी वृत्ति ! मी नुसता संताप करून घेऊन काय मिळविलें ? प्रश्न चुकत नव्हते व उत्तरेंहि टळत नव्हतीं. मग आणखी मनाविरुद्ध खाजगी माहिती सांगण्याचें दुःख कशाला ? खुशाल थापा मारावयाला मला कोणी नको का म्हटलें होतें !

" पुण्यांत काय सासर वाटतं ? " बाईंनी सहज विचारलें. प्रत्येक प्रश्नागणिक संकट ! त्या तरुणीच्या जागीं मी असतों तर अशा प्रश्नांचीं उत्तरें देणें ही एक शिक्षाच समजलों असतों. पण आमची तरुणी निःशंकपणें वाटेल त्या थापा देत सुटली होती. अथवा त्याशिवाय तिला गत्यंतरच नव्हतें.

" हो, पुण्यांत सासर माझं. " तरुणी किंचित् पोक्तपणाचा स्वर काढून म्हणाली. मी मात्र बॅगवरील " कु. पद्मावती देशमुख " पाहून या उत्तराशीं याचा कसा मेळ घालावा या भ्रमांत पडलों.

" मूलबाळ कांही नाही वाटतं अजून ? " बाईंनी ओघानेच विचारलें.

आता मात्र हसें आवरण्याकरतां तरुणीला तोंडच फिरवावें लागलें. परंतु पुरती बतावणी करण्याचा तिचा निश्चयच दिसला.

" झाला होता बाई एक मुलगा ! " कुमारिकेने अभिनयसर्वस्व खर्चून एक सपशेल खोटा सुस्कारा सोडला.

बाई पांच मिनिटें स्तब्ध झाली. बिचारीला कसलीशी आठवण झालीसें दिसलें. — पण " वाठार, वाठार " अशा स्टेशनवरील आरोळ्यांनी तिची तंद्री मोडली. " अग बाई ! आलं वाटतं वाठार ! ऐकलं का ? उठायचं होतं ! काय करायचं बाई या झोपेला – गाडी मेली जाईल सुद्धा सातऱ्यापर्यंत ! " शेवटीं खरोखरीच तसें होईल या या भीतीने, प्रश्नांच्या सरबत्तीने मला दशदिशा हैराण करून सोडणाऱ्या माझ्या बालबोध दोस्ताला मी गदागदा हालवून जागें केलें. पण त्याची फेड म्हणूनच की काय गृहस्थ दचकून उठून " अग तूं आधी खाली हो —— मग मी देतों गाठोडं ! " म्हणून न पाहतां मलाच लोटूं लागले ! अखेर तिघेहि सामानासह सुखरूप खाली उतरले, तेव्हा माझ्या जिवांत

जीव आला.

मी खिडकींतून तोंड परत फिरविलें मात्र, तों कु. देशमुख इतक्या विलक्षण हावभावांनी खदाखदा हसत होती की मला वाटलें, पोरीला हिस्टेरियाची फिट आली खास !

मी त्रासून म्हटलें, " तुम्हांला कदाचित् अशा लोकांची मौज वाटत असेल; परंतु मला खरोखरच डोकें फिरून गेल्यासारखें होतें, यांच्यांशीं गाठ पडली की !"

" चुकतां आहांत तुम्ही ! त्यांना बोल लावण्याऐवजी तुम्ही तुमच्या एकलकोंड्या स्वभावाला–माफ करा–दोष लावणें योग्य होईल. I really enjoy such talk ! अहो ही एक करमणूक आहे ! "

" तुम्हांला देखील ती सर्वच वेळां करमणूक वाटेल असं नाही. मला तर बुवा गर्दी चालेल, मारामारी देखील पत्करली, परंतु हें ' जबरी संभाषण ' म्हटलें, की गाडींतून उडी टाकावीशी वाटते. परमेश्वरा ! आता एकच स्टेशन आहे, तेवढ्यांत तरी असले सोबती धाडूं नको ! "

" देवा ! असलेच लोक धाड रे बाबा ! तुम्हांला काय, लागलीच उतरायचं. पण मला बुधगांवपर्यंत न बोलतां बसावयाचं म्हणजे जीव नकोसा होईल ! "

माझ्या सोबतिणीलाच देव पावला आणि आमच्या डब्याचें दार " बापू ! तंबोरा दे माझ्या हातांत–तूं बैस–ठीक आहे–नमस्कार मास्तर-साहेब, तुम्ही होतां म्हणूनच—! असें म्हणत एका प्रतिष्ठित वाटसरूंनी उघडलें. मी पाहतों तों—" गंडस्योपरि पीटिका "! मघाच्या लोकांच्याच जातीचे इतकेंच नव्हे, तर आणखी माझ्या जुन्या ओळखीचे !

" अरे वा ! हे तर आपले भाऊराव ! कां कुणीकडे ! " गृहस्थांनी मला माझा थोरला भाऊ समजून बोलण्यास सुरुवात केली. आम्हां उभय-

तांसहि बऱ्याच दिवसांत न पाहिल्याचा हा परिणाम असावा, असें मी ताडलें. परंतु लागलीच चुकीची दुरुस्ती कशाला ? म्हणून " नमस्कार बुवासाहेब–पुण्याहून आलों ! " असें म्हणून मी बुवांचें स्वागत केलें.

" तुम्ही काय आता मोठे लोक बुवा ! गरिबाची आठवण तुम्हांला कसची राहते ! पण तुम्हांला बोटभर चिठ्ठीसुद्धा धाडावीशी वाटली नाही ? तरी देवाला काळजी ! त्यानं उभयतांची भेट एकदम करून दिली. अरे हो, पण इतक्यांतच राजाराणींच्या स्वाऱ्या कुठल्या दौऱ्यावर गेल्या होत्या. अरे आता लाजून काय होतंय ? मीं आता गेल्यावर विचारतोंच तात्यांना आणि वहिनींना की, पिलुबुवांना लग्नचिठ्ठी आली आणि दिगंबरबुवाच तेवढे कां वगळले ! "

मी हा सर्व प्रकार पाहून खरोखरच भांबावून गेलों. तरी काय प्रकार आहे हें मी साधारण ताडलें. पन्नास गावें तिन्ही लोकींच्या देवदानवांच्या कथा सांगणाऱ्या या कथेऱ्याच्या डोक्यांत आमच्या घरून कांही दिवसांपूर्वी गेलेली एक लग्नचिठ्ठी आणि समोर–त्याच्या समजुतीप्रमाणे–जोडपें ! शेवटीं संताप, आश्चर्य, कींव वगैरे बाजूला ठेवून मी अगदी शांत पण कडक स्वरांत सांगितलें, " बुवासाहेब, आपल्याला आलेली चिठ्ठी भाऊरावांच्या लग्नाचीच होती. पण मी भाऊराव नव्हे. मी त्यांचा धाकटा भाऊ बाबू ! " याहून अधिक काय व कसें बोलावें, हेंच मला समजेना. बुवासाहेबहि बरेंच वरमले व " मला वाटलं--मी म्हटलं—" वगैरे म्हणूं लागले.

" I really enjoy such talk ! " म्हणणाऱ्या कु. देशमुखचा चेहरा मात्र माझ्याने पहावेना ! बिचारीला काय ठाऊक, की आचरटपणाची मजल इथपर्यंत जाते म्हणून ! परंतु मला वाटतें, अखेर तिचेंहि मत माझ्याप्रमाणेच झालें असेल खास !

१४

# निधर्मी कुंकू

वास्तविक एखाद्या पुरुष लेखकानं आपल्या लिखाणांत कुंकवाची उठाठेव करणं, म्हणजे थोडा अगांतुकपणाच म्हटला पाहिजे. पण मला लेखनविषयापुरती थोडी अगांतुकपणाची सवय आहे हें मी आधीच कबूल करून टाकतों. स्त्रियांच्या वेषभूषेसंबंधी मी पूर्वी कित्येकदा लिहून स्त्रीराज्यांत परवान्याखेरीज प्रवेश केलेला आहे. अन् या माझ्या अतिक्रमणाकडे माझ्या भगिनींनीहि क्षमायुक्त कानाडोळा केलेला आहे. कदाचित् तें त्याचं ' पुरुषदाक्षिण्य 'हि असेल. पण त्या दाक्षिण्याचा फायदा घेऊनच आज मी ही उठाठेव फिरून करण्याला उद्युक्त झालों आहे.

खरंच, एखादी गोष्ट दैवताच्या पदवीवरून अडगळीच्या पायरीला, केव्हा आणि कशी पोचते, हा एक मोठा कुतूहलजनक प्रश्न आहे. आपले

हिंदुस्थानांतील राजेरजवाडेच घ्या ना ! आज त्यांची केवढी अडगळ होऊन बसलेली आहे ! धड त्यांना बाजूला सरायला येत नाही; धड त्यांना पूर्वीच्या देव्हाऱ्यांत बसवतां येत नाही. तीच स्थिति घरांतल्या वडीलधाऱ्या माणसांचीहि होऊन बसली आहे. त्यांना त्यांची पूर्वीची जागा दिली, तर तीं माणसं पूर्वीचेंच उपद्रव सुरू करतील अशी आम्हांला भीति वाटते; अन् ती जागा न द्यावी, तर त्यांना आपच्या नव्या संसारांत जागाच आहे कुठे ? पण या मानीव दैवतांचंच कशाला ? प्रत्यक्ष आमच्या घरांतल्या पाटीभर देवाचंच घ्याना ! तांब्याचे, पितळेचे चांदीचे, गारगोटीचे असे प्रत्येक जुन्या घरांत शेपाऊणशे तरी अजून शिल्लक असतील. अहो, एखाद–दुसऱ्या देवाची गोष्ट वेगळी. मुंबईच्या आटोपशीर अप्-टु-डेट् गाळ्यांतसुद्धा एखादा गणपति, दत्त, नाहीतर बाळकृष्ण ठेवण्यापुरता कमानीचा कोनाडा सापडतोच. निदान घरांतलाच बाळकृष्ण रांगू लागल्यावर तरी श्रावणी सोमवारीं, शुक्रवारीं पुजायला एखादा देव असावा, असं आमच्या हपीसाला जाणाऱ्या भगिनींनाहि वाटूं लागतं. पण गावीं असलेल्या गाडाभर देवांचं, सासूबाईच्या पश्चात् करायचं काय ? 'हे' म्हणतात, (किंवा 'अविनाश म्हणतो') ते मोडीला घालून टाकावे. पण असला 'पुरुषी' अगोचरपणा आमच्या भगिनींच्या हातून कधी न होणें शक्य नाही. पण म्हणजे एकंदरींत काय ? देवांची देखील अडगळच कीं नाही ?

असलीच नाजुक अडचण आज कुंकूबांगड्यांची होऊन बसली आहे. तसं पाहिलं, तर आजच्या झपाटेबाज स्त्रियांना असल्या बारीक सारीक गोष्टींचं मोठं ओझं होईल अशांतला भाग नाही. ज्या मुंबई–पुण्याच्या आधुनिक भगिनी जुन्या बायकांच्यापेक्षा पावपट वेळांत सगळं घरकाम उरकून 'ऑफिस'ला नाहीतर क्लासला जातात, अन् येतांना

बंड्याला मॉंटेसरींतून घरीं आणतात, ज्यांची वेणीफणी, स्नो-पावडर जुन्या बायकांच्या वेणीच्या दशांश वेळांत दसपट सुंदर होते, ज्या मनीबॅग अन् छत्री घेऊन सफाईनं बस चढूं-उतरूं शकतात, त्यांना कुंकू बांगड्यांचं मोठं अवघड आहे अशांतला भाग नाही. पण एकदा एखाद्या गोष्टीकडे नव्या दृष्टीनं पाहायचं ठरलं, म्हणजे तो प्रश्न नुसत्या सोईचा उरत नाही. कुंकूं–बांगड्यांचंहि तसंच झालं.

मला वाटतं, बांगड्यांचं स्तोम आमच्या मेडिकल–भगिनींनीं कमी केलं. आधुनिक हॉस्पिटलच्या राज्यांत सोवळं फार कडक! विशेषतः ऑपरेशनच्या टेबलजवळ जातांना तर फारच कडक सोवळं पाळावं लागतं. या मेडिकल सोवळ्याकरिता प्रथम बांगड्यांना जी रजा मिळाली, ती पुढे पुरोगामित्वाच्या लक्षणांत जमा झाली. अर्थात् कित्येक कॉलेज-कुमारी, ‘ डॉक्टरणी ’ ‘ ऑफीसरणी ’ बांगड्यांना रजा देऊं लागल्या. अन् खरं सांगायचं, म्हणजे बांगड्या घातलेले हात अगदीच ‘ घरेलू ’ आणि बायकी दिसतात, नाही का ? अँग्लोइंडियन्, पारशी, युरोपियन् स्त्रियांचे हात किती सुटसुटीत–कांहीसे ‘ बॉयिश् ’ देखील दिसतात. मोठे ‘ स्मार्ट् ’ दिसतात! शिवाय परीक्षेच्या वेळीं रिस्टवॉचवर बांगड्या घासून लिहिण्यांत व्यत्यय येतो. एक ना दोन! अन् शिवाय उपयोग काय या काचेच्या तुकड्यांचा ? एखादे वेळीं गंमत म्हणून सेल्यूलॉइड्चा चुडा देखील भरतां येईल; पण अगदी व्रत आणि धार्मिक चिन्ह म्हणून काचेच्या बांगड्या भरणं, मुंबई–पुण्याच्या राहणींत तरी अशक्य आहे.

आमच्या आधुनिक कुमारिकांचं कुंकू प्रथम कसं आणि कुठें अंतर्धान पावलं, मला तरी माहीत नाही. कुंकवाचा आणि मेडिकल सोवळ्याचा कांही संबंध आहे असंहि दिसत नाही. साधारणपणें पुष्कळशा धाडसी उपक्रमांचं समर्थन सौंदर्यवर्धनाच्या भूमिकेवरून केलं जातं. कुंकू पुस-

ण्याचं—माफ करा !—न लावण्याचं, समर्थन नेमकं कोणत्या भूमिकेवरून केलं जातं, मला नक्की माहीत नाही. नुसत्या पांढऱ्या फटक कपाळापेक्षा कुंकुममंडित भालप्रदेश सुंदर दिसतो, असं जुने लोक म्हणतील, हें मला माहीत आहे. पण हा सौंदर्यसंकेतच पाळायचा असेल, तर आधुनिक भगिनी तो जुन्यांहून दसपट पाळतात, असं मी सिद्ध करून देईन. अधर-लेप आणि नखविलेपन दोन्ही मिळून आजच्या स्त्रिया जेवढा रक्तिमा वापरतात, तेवढा खरोखर मळवट भरणाऱ्या, स्त्रियांना देखील लागत नसेल. रक्तिम्यानंच जर वर्ण खुलणार असेल, तर तो रक्तिमा ओठांवर आणि नखांवर लावला म्हणून कुठं बिघडलं ? बाकी जुन्या लोकांनी तरी आपल्या शुभाशुभाच्या कल्पना बोलून मोकळं व्हावं हें बरं ! एकदा कां तें सौंदर्यवर्धनाच्या भिन्नरुचि-शासित अराजकांत शिरलें, की आम्ही त्यांना शंभर वाटांनी आडवूं ! म्हणे पांढरं फटक कपाळ वाईट दिसतं ! जसं कांही आमच्या कृष्णवर्णीय भगिनींना कुंकवांतून 'एक्झेम्पशन्'च असतं ! खरी गोष्ट अशी आहे की, केवळ रूढि म्हणून जुन्या स्त्रिया कुंकू लावीत, अन् ती रुढि चांगली घट्टमुट्ट करण्याकरिता तिलाच कुणी शास्त्रकारांनी सौभाग्याचा डबा जोडून दिला ! आणि म्हणूनच ही रूढीची 'जंजीर' तोडण्यांतला पहिला 'कदम' आमच्या कुमारिका भगिनींनी टाकला. 'त्या मेल्या' अज्ञात आणि अदृष्ट नवऱ्याच्या आयुष्याची काळजी करायची कुमारिकांना मुळीच गरज नसल्यानं, त्यांच्यांतल्या मर्दानी मुली ती रूढि ताडकन् तोडून मोकळ्या झाल्या !

पण रूढीला सुरुंग केवळ अशा स्वच्छन्द्र कुमारिकांनीच लावला असं नव्हे. जीवनाकडे गंभीरपणें पाहणाऱ्या विधवांनीहि अगदी वेगळ्याच कारणांकरिता कुंकवाची रूढि झुगारून दिली. विधवांना दुर्दैवी समजून त्यांच्यावर कथाकादंबऱ्या, खंडकाव्यं लिहिण्याचं युग आता उरलं नाही,

हें मला माहीत आहे. तथापि महाराष्ट्रांतल्या कित्येक धीट आणि बुद्धिवादी विधवांनी ज्या कारणाकरितां कुंकू 'न लावण्याची रूढि झुगारून दिली, त्या कारणाची थट्टा करण्याइतका अहृदय लेखक आजतरी कोणी असेल असं मला वाटत नाही. सर्वच लोक विधवांकडे सहानुभूतीनं आणि आदरानं पाहतात, असं नाही; आदरशून्य नजरेचा विषय होण्यापेक्षा, ही रूढीच मोडून टाकावी, असा कांही विधवांनी विचार केला, तो योग्यच केला, असं माझंहि मत आहे.

पण आदरानं आणि गांभीर्यानं मी विधवांच्या कुंकवाचा विषय आटोपता घेतला खरा; पण त्यावरून अलीकडेच कानांवर आलेली एक थोडी अवघड गोष्ट आठवली! स्त्रियांच्या एका मंडळापुढे व्याख्यान देण्याकरतां मी गेलों होतों. (माझ्या व्याख्यानाच्या विषयाचा अर्थात् कुंकवाशीं कांहीच संबंध नव्हता) पण व्याख्यानानंतर त्या मंडळांतल्या पोक्त व तरुण कार्यकर्त्यांनी कॉफीच्या वेळीं माझ्या परवानगीनं 'एक नाजुक विषय' चर्चेकरिता अन् माझ्या सल्ल्याकरितां काढला–"अशा भगिनी मंडळांनी सार्वजनिक हळदीकुंकवाचे समारंभ करावेत कीं करूं नयेत?"

मी म्हणालों "जरूर करावेत."

"पण अशा मंडळाच्या समारंभांना इतर धर्मांच्याही स्त्रिया येतात. पारशी बायका येतात; बोहोरी बायका येतात; इतर मुसलमान स्त्रियाहि क्वचित् येतात. मग कुंकवाचं कसं करायचं? मला खरंच ही अडचण म्हणजे जुन्या म्हणींतल्या 'वरणाखालीं भात अडकला–काढायचा कसा?' या अडचणींसारखी वाटली. यांत कसली अडचण? पण 'इतर धर्मांच्या स्त्रियांच्या भावना दुखावल्या तर?...त्यापेक्षां आपणच आपल्या हळदी कुंकवांतून कुंकू वगळावं' किंवा 'अजिबात हळदीकुंकूच करूं नये' हा 'निधर्मी' विचार मला निराधार वाटला. आम्हां पुरुषांच्या पान-

सुपारीच्या समारंभांत सिगारेटचं पॅकेट् पुढें केलं जातं, उत्तरेंतील दरबारी समारंभांत गुडगुडी फिरवली जात असे, म्हणून माझ्यासारख्या धूम्रपान न करणाऱ्या पुरुषाच्या भावना कुठें दुखावतात? नाही! पण हा प्रश्न इतका साधा नाही, हें माझ्या कार्यकर्त्या भगिनींनी लगेच चेहरे गंभीर करून आणि सूर चढवून माझ्या ध्यानांत आणून दिलं. "पण प्रश्न नुसता इतर धर्मांच्या बायकांचा नाही. त्यांच्या भावना नाही दुखवायच्या, त्यांच्या देखत इतरांनी कुंकू लावलं तर! पण प्रश्न आहे आपल्यांतल्याच कुंकू न लावणाऱ्या या स्त्रियांचा!"

त्या भगिनींनी इतकं सांगितलं, तरी माझ्या भाबड्या मनाला उमज पडेना. कारण सहज माझी पाहुणी म्हणून मी जी एक सुशिक्षित आप्त-कन्या माझ्याबरोबर त्या मंडळांत नेली होती, ती अशीच कुंकू हा "ऐच्छिक विषय" समजणारी होती. मी तिच्याकडे पाहून हसूं लागलों. कारण त्या सुशिक्षित कुमारिकेच्या भावना कुंकू लावलं तरी दुखावत नसत; न लावलं तरीहि दुखावण्यासारख्या नव्हत्या! मग मात्र त्या भगिनींनी माझं अजाणपण जाणून संकोच बाजूला करून जरा स्पष्टच सांगितलं, "अहो तसं नव्हे! आपल्यांतल्याच ज्या विधवा, अशा समारंभाला येतात त्यांच्यांतल्या कांहींनी तक्रार केली. त्यांना म्हणे वाईट वाटतं!......"

विषय पडला नाजुक. मी चांगलाच बुचकाळ्यांत पडलों. पारशी, मुसलमान स्त्रियांचा प्रश्न मला इतका अवघड वाटत नव्हता. पारशी समाजांत तर लग्नकार्यांत स्त्रियांनी कुंकू लावण्याची रूढीच आहे. मुसलमान स्त्रियांतहि कांही आधुनिक स्त्रिया सार्वजनिक कुंकवाकडे 'निधर्मी' दृष्टीनें पाहणाऱ्या निघूं शकतील. मुसलमान कॉलेज कुमारिकांनी कॉलेजच्या नाटकांतल्या कामापुरतें कुंकू लावून, नऊवारी नेसून, वाकून

...२८२६१ वि: निबंध
...१५२९० नौ दि: २५।१।६३.


पाहुण्यांना नमस्कार केलेला मला माहीत आहे. अर्थात् आमच्यांतल्या विधवांच्या भावना मी नाजुक आणि पवित्र समजतों. पण कुंकू लावणाऱ्या विधवांच्या भावना सार्वजनिक ठिकाणीं कुंकू लावून घेण्यानं दुखावतील, हें माझ्या डोक्यांतच आलं नव्हतं. मी गप्पच झालों.–किंवा कांही लेखकांचा लाडका शब्द वापरायचा म्हटल्यास "मी अगदीच अवाक् झालों !"

नाहीतर मला हा सार्वजनिक कुंकवाचा प्रश्न अगदी सुटल्यासारखा वाटत होता... मला तर आमच्या अधवांचे आणि विधवांचे आभार मानावेसे वाटत होते. कारण त्यांनी आजच्या काळांत एक अवघड कामगिरी चुटकीसरशी पार पाडली आहे. नव्या लोकांना, चटकन् समजण्यासारखा शब्द वापरायचा म्हटला, तर या आमच्या भगिनींनी कुंकवाच्या निमित्तानं एक 'क्रांती'च केली आहे. कुमारिकांनी कुंकू लावण्याची रूढि मोडून क्रांति केली; तर विधवांनी कुंकू न लावण्याची रूढी मोडून क्रांति केली. कांही दिवसांमागे पुण्यांतल्या एका दैनिकानं एक व्यंगचित्र काढलं होतं. त्याचं नांव "अद्ययावत् कुमारिका; अद्ययावत् विधवा." अर्थात् त्यांतली कुमारिका जुन्या लोकांना विधवा वाटली असती; तर विधवा बहुधा सधवा वाटली असती. (अद्ययावत् सधवेचं चित्र द्यायचं राहूनच गेलं होतं !) पण या कुंकवाच्या स्थलांतराला मी क्रान्ति म्हणतों याचं कारण तुमच्या बहुधा लक्षांत आलं नसेल ! आमच्या शूर भगिनींनी कुंकू 'निधर्मी' करून टाकलं, ही मोठी 'क्रांतीच' नव्हे का ?

वास्तविक कुंकवाचा आणि वैदिक हिंदु धर्माचा संबंध कितपत आहे, हें मला एखाद्या शास्त्र्यालाच विचारावं लागेल. पाकिस्तानी मुसलमानांच्या अत्याचारांमुळं धर्मरक्षणार्थ ज्या भगिनी उत्तरेंतून दक्षिणेंत

उतरल्या, त्यांपैकी बहुतेकींना कुंकवाची ओळख नव्हती. दक्षिणेंत आल्यावर हिंदु स्त्रिया, जेव्हा त्यांचे पायजमे आणि त्यांचीं पांढरीं फटफटीत कपाळं पाहून त्यांना मुसलमान समजूं लागल्या तेव्हा त्यांनी बाजारांत जाऊन कुंकू विकत आणलं ! एवढ्यांत, या दुर्दैवी निर्वासित भगिनी आणि आपण यांच्यांतलं अंतर कमी व्हावं, म्हणून आमच्या कित्येक महाराष्ट्रीय भगिनींनी कुंकवाचा 'सिंपथेटिक स्ट्राइक' पुकारला ! तात्पर्य काय, मेडिकल सोवळ्यामुळं असो कीं निर्वासित–संसर्गामुळं असो, कुंकवाचा कडकपणाहि कमी झाला आणि धार्मिक अर्थहि कमी झाला. कुंकू ही एक, लिपस्टिक्सारखी प्रसाधनाची बाब होऊन बसली. अन् कुंकू हें धार्मिक चिन्ह नव्हे, असं ठरल्यानं, भिन्न धर्मीय भगिनींना हळदीकुंकवाचे दरवाजेहि खुले झाले ! निधर्मीपणा आणि भावनात्मक ऐक्य या दोन्ही गोष्टी ज्या कुंकुम–स्वातंत्र्यामुळे एकदमच साधल्या तें स्वातंत्र्य क्रांतिकारक नव्हे, असं कोणं बरं म्हणेल ?

ही सर्व उपपत्ति मी लावून दाखवली, माझ्या भगिनींना ती कदाचित् अभिनवहि वाटेल, हें सर्व ठीक आहे. पण त्या 'भगिनी–मंडळा'च्या स्त्रियांना 'भावना दुखावण्याची' जी भीति वाटत आहे, तिच्यावर इलाज मी सुचवलाच नाही ! परधर्मी भगिनींचा प्रश्न देखील मी सोडवून दाखविला, पण आमच्या भगिनींच्या भावनांसंबंधी मला विचारण्यांत आलेला प्रश्न मात्र मला अखेर सुटलाच नाही !

उलट भावनांच्या नाजुक प्रांतांत शिरल्यावर मला आणखीच एक नाजुक प्रश्न सुचला. ज्या सधवा स्त्रिया कुंकू लावीत नाहीत,— अथवा अधून मधून लावतात,— त्यांच्या नवऱ्यांच्या भावनांचं काय ? हा प्रश्न मी भीतभीत अशा एका स्त्रीच्या पतीला विचारला देखील ! पण त्या पतीची प्रकृति ठणठणीत असल्यानं कुंकवाचा आणि सौभाग्याचा

कांही संबंध आहे, हें तो मानायलाच तयार नव्हता ! पण त्याच्याच शेजारीं राहणारा एक सिंधी निर्वासित मात्र त्या दोहोंचा संबंध फार घनिष्ट मानतो असं मला दिसून आलं. मुंबईच्या लोकल गाडींतून प्रवास करीत असतां, गर्दीत धक्का लागून झालेल्या बाचाबाचींत त्याला मुसलमान समजून, दोन दूधवाले मध्ये एकदा त्याच्या डोक्यांत दुधाचे मोकळे हंडे घालायला धावले होते ! मुसलमान समजायला कारण काय ? तर त्याच्या बरोबर असलेली त्याची पायजमावाली बिनकुंकवाची सौभाग्यवती !

१५

# एक नूतन विलास

मी प्रथम मुंबईस राहूं लागलों, त्यावेळीं मला अनेक गोष्टींविषयीं कोडें वाटे. त्यांतल्यात्यांत मुंबईच्या कायमच्या रहिवाश्यांची आजारीपणाविषयींची चर्चा ऐकून सर्वांत अधिक अचंबा वाटे. एक तर हवापाण्याऐवजीं, मुंबईत कुशल प्रश्नच रोगराईविषयीं होतात, हें पाहून पोटांत धस्स होई. तर उलट मोठमोठ्या दुखण्याविषयीं बोलतांनाचा मुंबईकरांचा उल्हसित चेहरा पाहून, हंसावें कीं रडावें समजत नसे. मला वाटे, मुंबईकर मंडळी एक तर स्थितप्रज्ञ असली पाहिजेत, नाहीतर मुंबईच्या निकस हवापाण्यानें, इतर गावीं पुंडाई करणारे रोग तरी नरम आले असले पाहिजेत. एरवीं पुढील संवादासारख्या संवादाची संगती कशी लावणार ?

“ काय, कुठें फिरायला कीं काय ? ”

" छे, छे! जातों आहे थोडा डॉ. कपाडियाकडे. ती आमची पुतणी विल्सन्मध्यें असते, तिचे दांत थोडे ' हे ' झाल्यासारखे वाटूं लागले आहेत. सांगितलं कपाडियानं तर लगेच आज काढून टाकूं. नाहीतर उगीच बाकीचे ' अॅफेक्ट ' व्हायचे. "

माझे स्नेही त्यांच्या तरुण पुतणीच्या दांताविषयीं, ते जणू ढेकूण, डांस, असल्याप्रमाणेंच बोलत होते. दांत थोडे ' हे ' झाले आहेत — आणि " घेऊं कपाडियाकडून काढून " हें बोलणें ऐकून मला अचंबाच वाटे. एक म्हणतो, " आमच्या ' सिस्टर 'चं डोळ्याचं ऑपरेशन् करायचं आहे ", तर दुसरा म्हणतो " अपेंडिसायटिसचं ऑपरेशन मी लवकरच उरकून घेणार आहे — म्हणजे आपलं बरं असतं ! " मला वाटे अरे आहे काय ? हे लोक रोगाविषयीं आणि शारीरिक कापाकापीविषयीं केवळ लग्नमुंजीविषयीं बोलल्याप्रमाणें बोलत आहेत ? आणि हीं बोलणीं सर्वत्र चालत. पण त्यांतल्यात्यांत सुखवस्तु मंडळींत अधिक हौसेनें चालत. नाटक, सिनेमा, चौपाटी, याप्रमाणें डॉक्टर, रोग आणि दवाखाना याविषयींही या मंडळींत कशानें कोण जाणे एक प्रकारचा लोभ उत्पन्न झाला होता. कधीं कधीं तर मला वाटे, मी स्वतःहि आजारी नाही व माझ्या घरीही कोणी आजारी नाही, त्या अर्थी ही मंडळी मला खेडवळ तर समजत नसतील ?

हळूहळू मला मुंबईच्या कायम रहिवासी रोगांपैकीं मुख्य रोगांचीं नांवें सफाईनें म्हणतां येऊं लागलीं. व निदान शस्त्रक्रिया, दांतांचे रोग, स्त्रियांचे रोग वगैरे विभागांचे अधिपति असलेले डॉक्टर व त्यांच्या पदव्याही पाठ झाल्या. लवकरच स्वतःच्या नाही, तरी स्नेह्यासोबत्यांच्या रोगराईविषयीं मी दर्दीपणानें बोलूं लागलों. " भय्यासाहेबांच्या पायाची जखम ' सेप्टिक् ' ठरली. डॉ. * * म्हणाले, विशेष कांही नाही —

पाय कमरेपासून कापला म्हणजे झालें." असें मी सहज म्हणूं लागलों. तरी स्वतः आजारी पडेपर्यंत मला मुंबईत आजारी पडण्यांतील लज्जत कळणें शक्य नाही म्हणून वाईट वाटे. अखेर सर्वत्र समदृष्टी परमेश्वरानें माझ्याकडे दृष्टि वळविली. माझा आहार हळुहळु मुंबईफॅशन होऊं लागलाच होता, पण अखेर एक दिवस मी ऑफिसमधून साहेबाला विचारून दोनच्या सुमाराला घरीं आलों. झाली अखेर या ' नूतन विलासा 'ला सुरवात एकदाची ! मध्येंच घरीं आलेला पहातांच घरांतील व चाळींतील मंडळींनीं उशीरां कां होईना, एक इष्ट गोष्ट घडून आली एकदांची, अशा तऱ्हेचे चेहेरे करून " काय ? फीवर का ? किती आहे टेंपरेचर ?— कांही खाऊं नका, उतरल्यावर क्विनाईन घ्या." इत्यादि सरबत्ती सुरू केली. प्रत्येकजण यापैकीं एकहि प्रश्न किंवा सूचना न विसरतां कशा पाठ म्हणतो, हें पाहून मला कौतुक वाटे. ठरल्याप्रमाणें दुसरे दिवशीं डॉक्टरना पाचारण होऊन आतां माझ्या आजारीपणास एक प्रकारची मंजूरी अथवा प्रतिष्ठा प्राप्त होणार, आता ' इन्फ्लुएंझा ', ' न्युमोनिया ', ' मलेरिया ' यासारखें एखादे गोंडस नांव डॉक्टर उच्चारणार या विचारांत माझा तापाचा त्रास हलका होऊं लागला.

मुंबईत ' रोग अधिक कीं डॉक्टर अधिक ' याचा अद्याप एखाद्या शोधकानें शोध लावलेला नाही. पण संख्येंत तरी डॉक्टरांनी रोगास मागे हटविले आहे खास. पण याहून त्यांची खरी बहादुरी रोगासंबंधींच्या त्यांच्या धीरवृत्तींत दिसून येईल. अहाहा ! मुंबईचे डॉक्टर ! बस् आपण तर खूष आहों या शूर लोकांवर. " मरण यावें तर यांच्याच हातून यावें ! " असें माझा एक मुंबईकर मित्र म्हणतो तें उगीच नव्हे. तुम्हाला वाटेल तो रोग झाला, तरी यास त्यांत " तसें कांही विशेष " वाटतच नाही. आणि हंसतमुख तर विचारूंच नका ! – ते जणू जन्मालाच

हंसत येतात ! निदान मरणाला पाहून हंसतात, हें तर प्रत्यक्ष अनुभवावरून सिद्ध आहे. यावरून आठवलें म्हणून सांगतों. माझ्या आजारीपणा आधीं तीन महिने, आमच्या चाळींतील एक स्त्री बरेच दिवस आजारी होती. दोन तीन दिवसांनी डॉक्टरांची फेरी होई. कधीं पोट पाहून, तर कधीं हात पाहून, तर कधीं नुसती जीभच काढावयास सांगून, " विशेष कांही नाही. " म्हणून सांगून डॉक्टर जात. पुढें पुढें तर त्यांना त्या बाईचा इतका विश्वास वाटूं लागला कीं, तिच्या खोलीच्या शेजारच्या खोलींत तिच्या नवऱ्याच्या तोंडाकडे पहात चहा पीतपीतच ते सांगूं शकत कीं, " कांही विशेष नाही. गोळ्या धाडून देतो. " एक दिवस आमच्याच चाळींत दुसऱ्या एका ' व्हिजिट्'साठी आले असतां, त्या बाईचे यजमान त्यांस जिना उतरतांना दिसले. डॉक्टर पाहातांच तें कांहीसे अस्पष्ट बोलले वाटतें. डॉक्टर घाईत होते व आज दुसऱ्या व्हिजिट्चा दिवस होता. गाडींत चढतां चढतां डॉक्टर म्हणाले, " काही विशेष नाही, गोळ्या धाडून देतो, " पण डॉक्टरांच्या आधल्या दिवशींच्याच गोळ्या लागू पडून बाईचें दुखणें व आयुष्य एकदमच सरलें होतें !

पण जगणें मरणें काय कोणाच्या हातचें आहे ! मुख्य मुद्याची गोष्ट म्हणजे डॉक्टरांची उल्हसित वृत्ति व रोग्याविषयींची निर्भयता. त्याहूनहि त्यांची बोलण्याचालण्याची ढब ! डॉक्टरनीं हंसत हंसत माझ्या खोलींत पाऊल टाकलें आणि माझें मुंबईच्या दुखण्याविषयींचे कोडें उलगडलें ! रोगनिदान, औषधयोजना, इतकेच काय, पण शस्त्रक्रियासुद्धां या मंडळींनीं इतक्या परिणत अवस्थेस येऊन पोहोचविली आहे कीं, रोगी म्हणंजे या नवीन ललित कलेंतील नैपुण्य दाखविण्याचें एक साधनच आहे असें त्यांस वाटूं लागतें. व त्या निर्विकार बुद्धीनेंच ते सर्व

विकारांकडें पाहतात. अशा स्थितींत विकृतींतहि सौंदर्य दिसूं लागल्यास व रुग्णावस्थेबद्दल रोग्यास एकप्रकारचा गुप्त गर्व वाटूं लागल्यास आश्चर्य काय ?

" विशेष कांही नाही, सिंपल् मलेरिया " असें म्हणून डॉक्टर निघाले. सुमारे एक महिना ताप व डॉक्टर सारख्याच नियमितपणें येत. मी अधिकाधिक क्षीण होत चाललो. तेव्हा हाच क्रम किती दिवस चालवावयाचा, अशा विचारानें, मी डॉक्टरापुढें थोडी चर्चा सुरू केली. डॉक्टरनीं नखशिखांत फिरून तपासून मला सांगितलें, " अहो, याचा अर्थ एवढाच कीं तुमच्या मलेरियाचा जोर क्विनाइनहून अधिक आहे ! तथापि ' ट्रीटमेंट ' हीच ! वाटल्यास आपण डॉ० * * * ना दाखवूं. " असें म्हणून त्यांनीं ज्यांच्या केवळ " नामोच्चारण भेषजात् नश्यन्ति सकला रोगाः " अशी मुंबईच्या सर्व धर्मांच्या लोकांची श्रद्धा होती, असें एक नांव घेतलें.

डॉ. * * सोळा नंबरच्या खोलींत येणार म्हणून आमच्या चाळींत कोण धांदल, केवळ एडक्यासारखे टणटणीत पुरुष व हरिणीसारख्या चपळ स्त्रियादेखील " नाही तर एकदा डॉ. * * ना घ्यायंचं दाखवून ! " असें म्हणूं लागल्या ! माझी ' एंगेजमेंट् ' सकाळीं आठला ठरली होती. प्रसिद्ध डॉ. * * आपल्या अनेक डिग्र्यांसह केवळ माझा ' सिंपल मलेरिया ' पहावयास येणार हे ऐकूनच माझी नाडी जोरानें उडूं लागली. व एवढ्या बड्या डॉक्टरांचा हेलपाटा फुकट ठरूं नये म्हणून केवळ शिष्टाचार म्हणून देखील माझ्या अंगांत एखादा प्रतिष्ठित रोग शिरतो कीं काय, अशी मला धास्ती वाटूं लागली ! अखेर डॉ. * * आले, व त्यांच्या समवेत माझे पहिले डॉक्टरहि आले. नवीन डॉक्टरनी माझ्यासंबंधीचे विचार मला न सांगतां, माझ्या पहिल्या डॉक्टरनांच

सांगण्यास सुरवात केली. जणूं माझा त्यांत संबंधच नाही. अजाण अर्भकाप्रमाणे मी दोघांच्याहि तोंडाकडे आळीपाळीनें पाहूं लागलों. अखेर डॉक्टरांनी खिशांतील पेन काढून, कांही मंत्राक्षरें लिहून दिलीं, व भोवतालच्या माझ्या सग्यासोयऱ्यांची आतुरता ध्यानांत घेऊन त्यांतल्या त्यांत पोक्त अशा गृहस्थाकडे पाहून म्हटलें, "कांही नाही! पर्निशस ॲनीमिया आहे!" — आणि डॉक्टर पहिल्याहून अधिक गोड हंसून म्हणाले, "आणि थोड्या 'टी. बी.'च्या साइन्स आहेत!"

डॉक्टर गेले व ते जातांच मी मोठ्यांत मोठी डिक्शनरी जवळ ओढून त्यांत तिन्ही शब्द काढून पाहिले व तर्कास सुरुवात केली! इतक्यांत गल्लीच्या टोकापर्यंत त्यांच्याबरोबर गेलेले माझे डॉक्टर परत आले. आमच्या सर्वांचें कुतूहल चर्येवर एकवटलें होतें.

"काय? काय म्हणाले?"

"कांही विशेष नाही — आठ 'क्विनाइन'चीं व आठ 'आर्सेनिक्'चीं इंजेक्शनस् घ्या व शक्य तर हवा बदला."

मला हवा बदलणें शक्य होतें, पण इंजेक्शन्स् घेण्याची कल्पना मला माझ्या मुंबईकर स्नेह्यांइतकी रम्य वाटेना. व इंजेक्शन्स्च्या संख्येइतकेहि दिवस आयुष्य उरलें नसल्यास डॉक्टरांचे श्रम फुकट जातील या भीतीनें मी मुंबई सोडली — व लगेच बरा झालों!

पण मुंबईतील एका अपूर्व विलासाचा सोहळा मात्र माझ्या आयुष्यांत अपूर्णच राहिला!

१६

# परनिंदेची लज्जत

"What's the latest scandal?"
(इंग्रजी वाक्प्रचार)

मानवी समाजांतले कित्येक दोष आणि कित्येक सुखं आधुनिक सुधारणेबरोबर जन्माला आलीं आहेत. परनिंदेसंबंधीची आवड आधुनिक सुधारणेबरोबर जन्माला आली, असं मी म्हणूं शकत नाही. कारण ती निदान रामायणकालाइतकी जुनी आहे. पण परनिंदा हें सामाजिक व्यंग म्हणावं, कीं सामाजिक सुख म्हणावं यासंबंधीं मात्र माझा अद्याप निश्चय होत नाही. जागेचा अभाव, मनःस्वास्थ्याचा अभाव, स्वतःच्या पसंतीच्या सहचरांचा अभाव, फार काय, स्वतःला मानवेल अशा हवा-पाण्याचा देखील अभाव! अशा स्थितींत आजच्या शहरी राहणींत

चार लोक एकत्र आल्यावर जर कोणतं हुकमी सुख असेल, तर तें त्या बैठकींत हजर नसलेल्या माणसांच्या निंदेचंच, असं नाही का तुम्हांला वाटत ? ‘ श्रीयुत ब. द. जोशी ’ यांनी सी. ई. सोसायटींतली नोकरी ‘ सोडली ’ कीं ती ‘ सुटली ’; ‘ र. ड. वैद्य यांनी परवा सुटींत जो प्रेमविवाह केला तो त्यांना पुढे ढकलणं अशक्य झालं ’; ‘ मंगेशराव कामत यांनी नुकतंच बांधलेलं घर विकायला काढलंय म्हणे ? ’...इ. इ. विषय निघाल्यावर माणसं उकाड्याची हवा, निकडीचीं कामं नीतीचे नियम, इतकंच काय, पण परस्परांतले हेवे-दावे देखील कशीं झटकन् विसरतात ! आणि या सदा गोड अशा विषयांत कशीं रमून जातात ! खरंच, हें पाहिलं म्हणजे परनिंदा हें एक सुलभ सामाजिक सुख आहे असं कबूल केल्यावाचून गत्यंतर नाही.

‘ परनिंदा वाईट ’ हें वडील माणसांचं मत शाळकरी पोरांनादि पाठ आहे. पण प्रत्यक्षांत काय दिसतं ? परनिंदेंत–अर्थात् समोर नसलेल्यांच्या निंदेंत — तरबेज असलेल्या मनुष्याला जितकी लोकप्रियता मिळतें, तितकी सज्जनाला मिळत नाही, कीं एखाद्या महापंडितालाहि मिळत नाही. लोकांचीं वर्मे जवळ बाळगणारा मनुष्य ‘ वस्ताद ’ असावा असं आपलं मत बनतं; लोकांचीं वर्मे सांगणारे व ऐकणारे एक प्रकारें, “ आपल्याला तसलीं कांही वर्मे नाहीत ! ” असा ठरावच त्या छोट्या लोकसभेंत मंजूर करून घेत असतात ! लोकांचीं गुपितं खिशांत बाळगणारा मनुष्य, कां कोण जाणे, धोरणी आणि कार्यक्षम भासतो. नुसती लोकांची निरुपयोगी माहिती खिशांत बाळगणारा मनुष्य देखील मोठा तरतरीत आणि हरकामी असल्याचा आपल्याला भास होतो. वास्तविक डॉक्टर, प्रोफेसर, जज्ज यांसारख्या लोकांचा जर इतर व्यवसायांतल्या लोकांना कशामुळे हेवा वाटत असेल, तर तो त्यांच्या स्वतंत्रपणामुळे. पण अशा

लोकांच्या बैठकी देखील दुसऱ्यांच्या रहस्यांनीच अधिक रंगतात, असं दिसून येईल. मला वाटतं, दुसऱ्याची खाजगी माहिती गोळा करणं ही मनुष्याला एक खोडच असते. त्यांत आपल्या हातीं दुसऱ्याच्या नाड्या आल्याचा अथवा कांही हत्यार हातीं गवसल्याचा आनंद होतो कीं काय, कोण जाणे! पण निरर्थक माहिती गोळा करण्याची खोड विशेषतः सत्ताभिलाषी माणसाच्या ठिकाणीं अधिक दिसून येते, एवढं मात्र खरं. या वेडपट उद्योगाबद्दल नाना फडणिसाची ख्याति होती, अशी आद्य सुधारक लोकहितवादींची टीका आहे. ते म्हणतात, शहाणा मानल्या गेलेल्या या माणसाला जवळच्यांची बातमी जितकी महत्त्वाची वाटे, तितकी लांबच्यांची वाटत नसे! आणि म्हणून भिकार बातम्या गोळा करण्यांत त्याची शक्ति फार खर्च होई. इंग्रज वकिलाच्या बंगल्यावर काल चहाच्या वेळीं कोणते जिन्नस फराळाला केले होते त्याची बातमी त्याला असे; पण इंग्रज ज्या देशांतून येतो तो देश नकाशांत कुठे आहे, याची बातमी नसे! कारण यांतली पहिली माहिती 'बातमी' या सदरांत मोडल्यामुळे चुरचुरीत ठरे; तर दुसरी माहिती 'ज्ञान' या सदरांत मोडल्यामुळं पौष्टिक पण बेचव वाटे!

दुसऱ्याबद्दलच्या निरर्थक माहितीला ज्या स्वभावामुळं महत्त्व आलं, त्याच स्वभावामुळं दुसऱ्याच्या बिंगासंबंधींच्या माहितीला सवाई महत्त्व प्राप्त झालं, अशी ती मानसिक साखळी असावी! 'माणसाला कुत्रं चावलं' ही 'बातमी' होऊं शकत नाही; पण 'कुत्र्याला मनुष्य चावला' ही जाड ठशांतली बातमी होऊं शकते, हा वृत्तपत्रसृष्टींतला न्याय प्रसिद्धच आहे.

दुसऱ्यांचीं वर्मं संग्रहीं ठेवणारे स्त्रीपुरुष आपल्याला नीतिमानहि वाटतात का? कधी कधी आपली तशी समजूत होते, खास! माधवराव

पटवर्धनांनी 'सुधारक' काव्यांत जें सुशिक्षित जग रंगवलं आहे, त्या जगांत दुसऱ्याच्या वर्तनावर गुप्त नजर ठेवणं हा स्वतः नीतिमान ठरण्याचा राजमार्ग होता, असं दिसून येईल. कित्येक प्रतिष्ठित अन् सोवळ्या व्यवसायांतदेखील, स्वतः धुतल्या तांदळासारखं राहिलं, म्हणजे मग बाकीच्या चौकश्या करायला नकोत, अशी समजूत करून घेणारे भाबडे लोक पुष्कळदां अखेर भ्रमनिरास होऊन वैतागलेले आढळतात. अब्रू कमावण्याच्या या मोहिमेंत बचावाची आणि चढाईची अशी दुहेरी लढाई करावी लागते. स्वतः भिऊन वागणं आणि दुसऱ्याच्या उच्छृंखल वागण्याच्या हकीगती चोरट्या आणि भयचकित आवाजांत सुयोग्य 'मंडळींत' सांगण्याची तयारी ठेवणं! एखाद्या मनुष्याचं स्वतःचं वर्तन निरपवाद आहे, पण तो लोकनिंदेपासून मात्र अलिप्त आहे, तर तो संशयातीत ठरण्याचा संभव कमी. तो कांही तरी लपवीत आहे, असंच वाटण्याचा संभव फार. ज्याअर्थी तो दुसऱ्याचीं बिंगं उल्हासानं आणि चविष्टपणानं सांगत नाही, त्या अर्थी त्याचीं बिंगं कुणी काढील, ही भीति त्याला असावी, असाच कुणी झाला तरी अर्थ काढणार!

एका पाश्चात्य लेखकानं तर 'दुसऱ्याच्या वर्तनावर पहारा करणं म्हणजे नीति' अशीच व्याख्या केली आहे. दुसऱ्यावर पहारा करण्याच्या या व्यसनांत कुठलाच फायदा नाही, असं मात्र मला म्हणायचं नाही. कारण इथं मला पुन्हा हें सांगितलं पाहिजे की, आधुनिक माणसाची मुख्य अडचण वेळ घालवण्यासंबंधीची आहे. दुसऱ्याच्या वर्तनावर नजर ठेवण्यांत मनुष्य स्वतःचे दोष, स्वतःच्या काळज्या आणि मानवी जीवनाचा कंटाळवाणेपणा थोडा वेळ विसरतो, हा तर फायदा आहेच; पण त्याहूनहि अधिक लाभ झाल्याचीं उदाहरणं मी पाहिलीं

आहेत. मी कांही पुरुष व विशेषतः स्त्रिया 'नैतिक पहारा ठेवण्या'च्या नादामुळे खरोखरच स्वतः निर्लेप राहिल्याचं पाहिलं आहे!—आणि मला त्यांचं नवलहि वाटलं आहे. स्खलनहीन मनुष्य पाहिला, म्हणून नाही मला नवल वाटलं! कारण त्यांचा आणि निष्पापपणाचा मला तर कांहीच संबंध दिसत नसे. निष्पाप माणसांच्या मानानं मला तीं जास्त सावध आणि 'बेरकीं' दिसत, अन् मग मला नवल वाटे!

मग हीं माणसं 'पाक' राहिलीं कशीं? आपण स्वतःच जर मोहांत सापडलों, तर दुसऱ्याला पकडण्याचा आनंद आपल्याला मिळणार नाही, या भीतीनं हीं माणसं मोह निक्षून टाळतात असं जेव्हा मी पाहिलं, तेव्हा मला खरोखरच नवल वाटलं! पापपुण्याच्या भीतीनं सामान्य माणसं जेवढा निग्रह दाखवितात, तेवढा निग्रह हीं माणसं परनिंदेच्या लोभामुळं दाखवीत असलीं, तर परनिंदेची लज्जत खास सामान्य नव्हे!

पण परनिंदेचा परवाना मिळावा म्हणून अनीतीपासून दूर राहणारीं माणसं आणि खरीखुरीं नीतिमान् माणसं यांच्यांतला फरक मला बरेच दिवस कळत नसे. उलट खरीखुरीं नीतिमान् माणसं मला नरम आणि 'मोहवश' वाटत; तर परनिंदेकरतां स्वतःला निर्लेप ठेवणारीं माणसं कडक आणि निर्मोह वाटत. खरं सांगायचं तर हीं माणसं मला प्रायः जितेंद्रिय वाटत! या माझ्या समजुतीला माझ्या एका तरुण आप्ताच्या हकीकतीनं धक्का बसला.

त्याच्याकरता आम्ही मुली पाहात होतों. मुलीसंबंधींच्या आणि लग्नासंबंधींच्या विचित्र कल्पनांमुळे तो बत्तिशीच्याहि पुढे अविवाहित राहिला होता. अशा स्थितींत एक साल त्यानं 'यंदा करायचं!' असं जाहीर केल्यामुळें विविध प्रकारच्या मुली सांगून येऊं लागल्या. अर्थात् त्याला अनुरूप म्हणजे पंचविशीच्या आंतबाहेरच्या मुली सांगून येणार!

पण याचं मन तर कांक्षेखोर! मुलीच्या वयापासून रूपापर्यंत, आणि स्वभावापासून विवाहपूर्व चरित्रापर्यंत सर्वच बाबतींत हा शंका काढणार! अशाहि स्थितींत शिक्षण, रूप, वगैरेंत त्याने दोन मुली पसंत केल्या. आणि प्रत्यक्ष मुलाखतींत स्वभाव वगैरेंची परीक्षा सुरू झाली. दोघीहि रूपानं सारख्या असल्या, तरी त्यांतली कोणती तो पसंत करील, याचा अंदाज मी आधीच बांधला होता. कारण त्यांतल्या एकीचं निदान दोन तरी ठिकाणीं, प्रेम जुळून लग्न मात्र झालेलं नाही, हा इतिहास मला माहीत होता. तर दुसरी प्रेमाच्याच नव्हे तर अखिल पुरुष-जातीच्या आसपास देखील फिरकणं टाळणारी होती. अर्थात् या दोघींतली दुसरीच माझा मित्र पसंत करणार हें ठरल्यासारखं होतं. रूपानं तितकीच फक्कड आणि शिवाय विवाहपूर्व इतिहास नसलेली मुलगी सोडून आधीची थोडी 'हिस्टरी' असलेली मुलगी कोण पत्करणार? निदान माझा हा 'लोकभीरु' मित्र तर पसंत करणं शक्यच नाही.

पण नवलाची गोष्ट म्हणजे त्यानं ती निर्दोष आचरणाची मुलगी न निवडतां दुसरीच निवडली. माझा तर विश्वासच बसेना त्याच्या निर्णयावर! बरं रूपावर भाळला म्हणावं, तर दोघी रूपानं सारख्याच. अशा स्थितींत पूर्वेतिहास असलेली मुलगी यानं कां पसंत करावी?

माझं त्याचं बोलणं झालं, तेव्हा त्यानं दोनच वाक्यांत आपल्या वधूपसंतीचा खुलासा केला. तो म्हणाला, 'दोघी रूपानं सारख्या; पण एकीला जगांतल्या शंभर गोष्टींपासून आनंद घेण्याची पात्रता आहे; दुःख काय तें थोडंसं आपल्याबद्दलच्या लोकापवादासंबंधी तेवढं आहे. पण दुसरीला फक्त दुसऱ्याची भानगड कळली तरच आनंद आहे. इतर कुठल्याच गोष्टीपासून आनंद नाही. जिच्याबद्दल लोकापवाद आहेत अशी प्रेमळ आनंदी मुलगी, आणि जिला लोकांच्या भानगडी ऐकूं

आल्या तरच दिवस बरा जातो अशी मुलगी, या दोहोंपैकी प्रेमळ पण लोकनिंदित मुलगीच मला पसंत वाटते."

माझ्या मित्राच्या या निवडीचं मला नवल वाटलं असलं, तरी वाईट वाटलं नाहीं. मला दोघींच्याहि रूपाबद्दल कौतुक असलं, तरी दोघींबद्दलहि अनुकंपा वाटे. एकीबद्दल अकारण प्रवाद उठल्यामुळे अनुकंपा वाटे; तर दुसरीला ऐन पंचविशींतच लोकनिंदेची चटक लागावी याबद्दल अनुकंपा वाटे! कांही कांही गोष्टी आधुनिक जीवनांत अपरिहार्य असल्या, तरी त्या अकालीं वाटणीला आल्या तर खेद वाटणारच. मधुमेह, अर्धांगवायु, कॅन्सर, हृद्रोग यांसारखे विकार अनेकांना होतात. आपण ते जगांत असायचेच असं धरून चालत असलों, तरी ऐन तारुण्यांत कुणाला त्यांनी गाठलेलं ऐकलं म्हणजे आपल्याला रोगाबरोबरच त्या विपरीततेचंहि वाईट वाटतं. लोकनिंदाभिरुचि ही मी समाजांत अपरिहार्य अशी गोष्ट समजायला शिकलों असलों, तरी ऐन तारुण्यांत एखाद्या मुलीला अगर मुलाला ती जडली, तर मला थोडं वाईट वाटतंच. मी माझ्या मित्राकरतां पाहून आणलेल्या दोघी मुलींपैकी लोकनिंदित मुलीपेक्षाहि, मला लोकनिंदक मुलीची कीव येई. माझ्या मित्रानं तिची निवड करावी असं जेव्हा मी सूचित केलं, तेव्हा आम्हां उभयतांच्या कांही आप्तेष्टांची समजूत वेगळीच झाली. त्यांना वाटलं जिच्याबद्दल वाईट प्रवाद आहेत ती मुलगी माझ्या मित्राच्या गळ्यांत पडूं नये अशी माझी दृष्टि असणारच. पण माझी दृष्टि वेगळीच होती. जिला ऐन तारुण्यांतच परनिंदेची चटक लागली होती, तिचा विवाह प्रथम व्हावा असं मला वाटे. वैवाहिक सुखामुळे तरी तिचा हा अस्वाभाविक नाद सुटेल अशी मला अंधुक आशा वाटत होती!

तिच्या घरांतलं सगळंच वातावरण इतकं 'दुरुस्त' असे की कुणी

घरांत पाऊल ठेवलं तर एखाद्या मध्यवर्ती सरकारच्या कचेरींत पाऊल ठेवल्यासारखं वाटे ! तिच्या घरांत आईनं मुलांचे फाजील लाड करणं मना होतं; नवऱ्यानं बायकोशीं जास्त बोलणं मना होतं ! फार काय, मोठ्यानं हसणंसुद्धा गैरशिस्त वर्तनांत जमा होई. वेळच्यावेळीं जेवणं, जागच्याजागीं बसणं, कुठलाहि जिन्नस वाया जाऊं न देणं हे त्या घरांत प्रमुख सद्गुण समजले जात. हे सद्गुण नव्हेत, असं मीहि म्हणत नाही. पण हे प्रमुख सद्गुण आहेत कीं नाहीत याची बरीक मला शंका आहे. या सर्व शिस्तीचा आणि 'सद्गुणाचा' अखेर परिणाम काय म्हणून विचाराल, तर सबंध घरच्या घर रुक्ष, काकदृष्टि आणि परनिंदक बनलं होतं ! आपलीं जेवणं लवकर झालीं याहीपेक्षा शेजारच्या गोखल्यांचीं जेवणं अद्याप झालीं नाहीत, या गोष्टींत त्यांचा जीव अधिक रमे. आपला रमेश फर्स्ट क्लासमध्ये आला, यापेक्षा शेजारचा सतीश हा पहिल्या वर्गात येऊनहि अखेर डिप्लोमाकडेच गेला, या गोष्टीवर त्या घरांत अधिक चर्चा होई. कौटुंबिक प्रेम, मित्राशीं हास्यविनोद या गोष्टींना सक्त मना असल्या-मुळे छिद्रान्वेषण एवढी एकच त्या टापटिपीच्या घराला अखेर करमणूक उरली होती. बिचारी सुनंदा—माझ्या मित्राला मी सुचवलेली या घरांतली मुलगी—या तालमींतच तयार झालेली असल्यावर, या दोषांतून कशी सुटणार ? गोरीगोमटी असल्यामुळे जी एव्हांना एखाद्या उदयोन्मुख कवीचा प्रेमविषय बनली असती,—उफाड्याची असल्यामुळे जी स्वतःच एव्हांना एखाद्याच्या प्रेमांत सांपडली असती, ती दुसऱ्यांच्या प्रेमसंबं-धांवर काकदृष्टि ठेवीत दिवस काढीत होती !

पण परनिंदेवर जगणाऱ्या या हतभागी जातीबद्दल मला राग येण्या-ऐवजी अनुकंपा वाटण्याचं आणखी एक कारण आहे. सोवळ्या समाजांत परनिंदेचं खरं स्थान कोणतं हा खरोखर फार नाजुक प्रश्न

आहे. दुसऱ्यांच्या प्रेमाविषयक भानगडी किंवा व्यवसायविषयक लफडीं गोळा करणारे लोक, स्वतःला खरोखर नैतिक दृष्ट्या श्रेष्ठ समजत असतील का ?—मला शंकाच आहे! पुष्कळदा ज्यांच्या भानगडी सांगण्यांत वा ऐकण्यांत आपणास धन्यता वाटते, त्याच्यांसंबंधीं आपणाला गुप्त असूया असेल अशी आपल्याला शंकाहि येणार नाही! ज्याच्यावर बदफैलीचे, लाचलुचपतीचे आरोप आहेत, अशा माणसांबद्दल देखील समाजाला गुप्त आकर्षण वाटतं कीं काय, अशी मला शंका येते! पुण्याला आणि मुंबईला या वर्षांत जे खटले गाजले, त्यांत बदफैली, खून, खोटे कागद करणें इ. आरोप होते, आणि तेहि प्रतिष्ठित समाजांत मोडणाऱ्या व्यक्तींवर होते. या खटल्यांच्या वेळीं मुग्धता, सभ्यता व विद्वत्ता यांचं आगर समजण्यासारख्या व्यक्तींनी—विशेषतः सभ्य स्त्रियांनी !—कोर्टांत जी गर्दी करून सोडली तिजवरून सभ्य लोक आणि गुन्हेगार यांच्यासंबंधीं फेरविचार करण्याची वेळ आली आहे, असं नाही का वाटत ? आणि प्रतिष्ठित समाजांत जेव्हां आपण प्रतिष्ठित व्यक्तींच्याच भानगडी चोरट्या आवाजांत, चोरट्या हास्यासह काढतों, तेव्हा आपण त्या भानगडीसंबंधी निखालस नापसंती दाखवतों की चोरटी गोडी दाखवतों, हा एक प्रश्नच आहे! या प्रतिष्ठित व्यक्तींनी व्यभिचार, खून वगैरेंच्या आरोपांत सापडून जणूं निंदाप्रिय शिष्ट समाजावर एक प्रकारचा अनुग्रहच केल्याचा भास व्हावा, इतक्या कृतज्ञतेनं, उल्हासानं अन् औत्सुक्यानं सभ्य समाजांत त्यांचे विषय घोळवले जात असतात!

लोकापवादाचे आणि फौजदारी खटल्याचे विषय झालेले लोक समाजाला कौतुकाचे विषय वाटतात, ही माझी शंका कांहींना निष्ठुरपणाची वाटत असेल तर ती मी मागे घेतों. ज्यांची आपण त्यांच्या गैरहजेरींत निंदा करतों त्यांच्याबद्दल आपणांला एक लाचार कुतूहल असतं, हें मात्र कबूल

करावंच लागेल. मी एक पाऊल पुढे जाऊन असंहि म्हणेन की, ज्यांच्याबद्दल कांहीच भानगड, अथवा 'स्कॅंडल' नाही, त्यांच्यांत समाजाला कांहीच 'अर्थ' किंवा 'इंस्टरेस्ट्' वाटत नाही. कारण समाजांत कित्येकदा प्रत्यक्ष दिसणाऱ्या प्रकाराची दुसरी संगतीच लागत नाही !

आमच्या शहरांत एक परप्रांतीय अधिकारी बदलून आले. ते अधिकारी विलायतेंत शिक्षण घेतलेले व मोठा पगार मिळवणारे होते. मोठमोठ्या सरकारी व खाजगी समारंभांना ते सपत्निक आलेले पुष्कळांनी पाहिले होते. पण परप्रांतीय असल्यामुळे त्या शहरांत त्यांचे स्नेहीसोबती मात्र असणे शक्य नव्हतं. समारंभांत इंग्रजी पद्धतीनं 'ओळख' करून देण्यांत येई. पण 'मिस्टर , असुक...अमक्या खात्यांतले अधिकारी' ... 'मिसेस् असुक, त्यांच्या पत्नी' या पलीकडे ही ओळख जात नसे. अशा अधिकाऱ्यांसंबंधी आम्ही महाराष्ट्रीय मंडळी—ओळख करून दिल्यावरहि 'सिंधी आहेत वाटतं ?' 'यू. पी.तले आहेत म्हणे' असं कुजबजण्यापलीकडे कांही करीत नाही हें प्रसिद्धच आहे. मी त्या अधिकाऱ्याला सहज विचारलं... "काय कसा काय वाटला आमचा महाराष्ट्र ? ... आमचं शहर ?' तो म्हणाला, 'आपका मुल्क और आपका शहर तो ठीक है ! लेकिन यहाँ कुछ आना जाना कम है."
त्याच्या म्हणण्याचा मतलब, तुमच्या शहरांत नव्या माणणाशीं ओळख वाढविण्याची प्रवृत्ति नसल्यानं एकमेकाकडे येणंजाणं विशेष नाही. अन् येण्याजाण्यानं तर ओळख वाढणार !

मला माझ्या नगरबंधूंची नस माहीत होती. त्या अधिकाऱ्याची आणि माझी घसट दोघांच्याहि एका समान आवडीमुळं—संगीताच्या आवडीमुळं—वाढली असल्यानं, मी थोडा खोडकर प्रयोग करायचं

ठरवलं. पण तो खोडकरपणा थोडासा त्या अधिकाऱ्याच्या 'खर्चानं' होणार असल्यानं, मी त्याची आधी परवानगी घेतली. मी त्याला म्हटलं, "सरदारजी! मी या शहरच्या मंडळींना आपल्या संबंधीं अधिक 'इंटरेस्ट' दाखवायला लावूं का? तें काम सोपं आहे!"

सरदारजी म्हणाले, "आपला मतलब ध्यानांत नाही आला. आपण काय करणार माझ्या संबंधीचं 'इंटरेस्ट' वाढवयाला?"

मी माझी योजना सरदारजींना सांगितली. त्यांनी ती हास्यगर्जनेसह मंजूर केली!

सरदारजींच्या पत्नी उंच, गोऱ्यापान, तकतकीत कर्पूरवर्णा होत्या. त्यांच्या डोळ्यांत एक प्रकारचं पंजाबी पाणी खेळत होतं. डोक्याच्या जवळ जवळ मध्यावर त्यांनी सफाईनं बांधलेला त्यांचा पिंगटकाळा प्रचंड केशप्रबंध त्यांच्या शरीरवैभवावर जणूं कळस चढवीत असे. पण याहि सुंदर पुरंध्रीकडे एखाद्या समारंभाच्या वेळीं गांठ पडल्यास टकमक पाहण्यापलीकडे कुणी 'इंटरेस्ट' दाखविलेलं नव्हतं!

मी माझ्या एका 'भानगडप्रेमी' सहकाऱ्याच्या कानांत एका रजिस्टर लग्नाच्या मंडपांत कुजबुजलों, "ती पुरुषमंडळींतच बसली आहे ना? — ती कोण आहे माहिती आहे का? —मिसेस प्रीतम्‌सिंग!"

"हां! मला वाटलंच कुणीतरी पंजाबी असेल म्हणून!" माझा सहकारी म्हणाला.

"नुसती पंजाबी नव्हे! अरे यांचा हा मिश्रविवाह आहे म्हणे! त्या फाळणीच्या गडबडींत जुळवला बहाद्दरानं! गाजला होता बराच त्यावेळीं तिकडच्या भागांत! अन् कांही कांही मंडळी तर या लग्नाला जरा कांही 'हिस्टरि' आहे म्हणतात!..." मी शेवटचं वाक्य जरा

इकडे तिकडे पहात आणि हलक्या आवाजांत कुजबुजलों.

त्या दिवसापासून लहानमोठ्या सर्व मंडळींत त्या पंजाबी अधिकाऱ्या-संबंधीं एकदम ' आस्था ' उत्पन्न झाली! जी ' हिस्टरि ' मलाहि माहीत नव्हती, ती कित्येक कल्पक मंडळींनी स्वतःच जुळवली. कांहींनी तिला पाकिस्तानी ठरविली; कांहींनीं तिला हिंदु ठरविली. कांहींनी त्यांचं लग्न अद्यापझालेलंच नाही, अशी कल्पना वसवली. कांहीनी तिचं याहि पूर्वी एक लग्न झालं आहे, अशी पंजाबांतल्या आपल्या मित्रांची म्हणून खास बातमी सांगितली. प्रीतमसिंगांना समारंभांचीं निमंत्रणं अधिक येऊं लागलीं. शाळा कॉलेजांतील बक्षिससमारंभांचीं अध्यक्षस्थानं देण्यांत येऊं लागलीं. मिसेस प्रीतमसिंगांचे ढालीं, पेले देत असतांनाचे फोटो येऊं लागले.

सारांश, सरदारजींचा अज्ञातवास संपून झगझगीत प्रकाशाचा काळ सुरू झाला. सरदारजींना या चमत्काराचं नवल वाटलं; पण मला नवल वाटलं नाही. आपल्यासंबंधी वेड्यावाकड्या अफवा प्रसृत झाल्या, तर नवखीं माणसं संत्रस्त होतात. पण लोकस्वभावाची थोडीफार माहिती असलेलीं माणसं मुळीच संत्रस्त होत नाहीत. मी तर म्हणेन एखाद्या माणसासंबंधींची समाजांतली उपेक्षा झटकून टाकून लोकांचं लक्ष वेधायचं असेल, तर त्याच्यासंबंधीं थोडी वेडीवाकडी अफवा प्रसृत होण्यासारखा दुसरा खासा इलाज नाही !

मिसेस ॲस्क्विथसारखी लोकस्वभावाची दर्दी स्त्री म्हणे — " लोक तुमच्याविषयी चांगलं बोलतात कीं वाईट, याला महत्त्व नाही. लोकांच्या चर्चेचा विषय होणं, याला महत्त्व आहे ! Get discussed ! "

म्हणजेच लोकनिंदेचा विषय बनण्याची तयारी ठेवा ! !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३४२८१ वि: निबंध
क्रमांक १४२५ नों दि: ३५/१९६३

# आमची नवीं प्रकाशनें

**कथासंग्रह**

पाळणा
गंगाधर गाडगीळ

लाटा
शांताराम

पूर्वस्मृति
गो. रा. दोडके

आकार आणि रेषा
बाळ गाडगीळ

वैरी
पु. भा. भावे

**कादंबरी**

आग
पु. भा. भावे

समरभूमि
ना. सी. फडके

**पद्यानुवाद**

श्री कबीरवचनावलि
भ. श्री. पंडित

मालिनी
दा. ल. अडोगी

**प्रवासवर्णन**

गोपुरांच्या प्रदेशांत
गंगाधर गाडगीळ

चिनारच्या छायेंत
श्रीपाद जोशी

**लघुनिबंध**

खुणेचीं पानें
सरोजिनी बाबर

वादे वादे...
श्री. के. क्षीरसागर

**लेखसंग्रह**

साहित्याच्या दरबारांत
श्री. के. क्षीरसागर

आकाशलहरी
श्री. ना. बनहट्टी

मणिकांचन
सेतुमाधवराव पगडी

**चरित्र**

टिळक आणि आगरकर
श्री. ना. बनहट्टी

## सुविचार प्रकाशन मंडळ

धनतोली, नागपूर-१. ४६१/४, सदाशिव, पुणें २.

क्र. १२२२१

आनुक्रम 28289 वि: निबंध
क्रमांक 14827 नों दि: 25/7/63
REFBK-0012291
REFBK-0012291

मूल्य पांच रुपये

आगामी प्रकाशनें

**विघ्नहर्ती**
अरविंद गोखले

**बंडू, नानू आणि गुलाबी हत्ती**
गंगाधर गाडगीळ

**विचक्षणा**
रा. श्री. जोग

**स्पर्श**
द. मा. मिरासदार

**पाण्यावरल्या रेषा**
अनंत काणेकर

**मराठी निबंध**
म. मा. आळतेकर

**मराठी विनोद**
म. ना. अदवन्त

**चिंतन आणि चर्चा**
श्री. ना. बनहट्टी